# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १०/२००५.** **दिनांक १८.०७.२००५**

**स्थळ - मुंबई कार्यालय.** **वेळ दुपारी-४.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा मुंबई येथे सोमवार दिनांक १८ जुलै, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील एसएसएस -वशी-०४-७५१७-२००५ ,दिनांक १४ जुलै,२००५ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक १८ जुलै, २००५ रोजी दुपारी ४.०० वाजता संस्थानचे मुंबई येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०४ | मा.श्री.प्रकाश रामदास काळे |
| ०५. | श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०६. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे |
| ०७. | मा.श्री.समि खतीब | ०८. | मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९ | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | १०. | मा. श्री. कृष्णचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय |
| ११. | मा. डॉ. पी. एल. तिवारी | १२. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२)नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री.राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील, मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांचे दूरध्वनी निरोपाची व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे आलेल्या पत्राची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१.** **सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता खरेदी करावयाचे कॅथलॅब इक्विपमेंट, व्हेंटिलेटर्स, मॉनिटर्स, इ. खरेदीसाठी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३३२.** श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु करावयाचे कार्डीओलॉजी / नेफ्रॉलॉजी विभागासाठी खरेदी करावयाची मोठी मशिनरी / उपकरणे (उदा.कॅथलॅब इक्वीपमेंट, व्हेन्टीलेटर्स, मॉनीटर्स ) साठी अंदाजे रु. ८,९७,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरची मशिनरी/उपकरणे खरेदीचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०४/२००५ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदरची खरेदी ही वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व रु.८,९७,००,०००/- चे खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

सदर मशिनरी/उपकरणे खरेदी कामी दिनांक २५/०३/२००५ चे मंजूर टिपणी अन्वये सकाळ, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, टाईम्स ऑफ इंडिया इत्यादी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन दि. १५/०४/२००५ अखेर सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन मुंबई व शिरडी येथील संस्थानच्या कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. दि. १५/०४/२००५ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात मिळून एकूण ३२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे :-

**Big Machinery/Equipments – Part "A"**

| *Sr.No.* | *Name of Company* |
|---|---|
| 01. | M/s Trivitron Diagnostics Pvt.Ltd., Mumbai |
| 02. | M/s Nasan Medicals, Pune |
| 03. | M/s Siemens, Mumbai |
| 04. | M/s Omron Medical Pvt.Ltd.,New Delhi |
| 05. | M/s Compact Diagnostics (I) Pvt.Ltd., New Delhi |
| 06. | M/s Pharm Deal, Pune |
| 07. | M/s Shimadzu (India) Pvt.Ltd., Mumbai |
| 08. | M/s Philips Medical Systems (I) Pvt.Ltd., Mumbai |
| 09. | M/s Vaibhav Agency, Pune |
| 10. | M/s Analytical Automation (I) Pvt.Ltd., Mumbai |
| 11. | M/s Cyronics Instruments Pvt.Ltd.,Mumbai |
| 12. | M/s HL Medical Systems Pvt.Ltd., Mumbai |
| 13. | M/s Advanced Micronic Devices Ltd., Mumbai |
| 14. | M/s Roche Diagnostics India Pvt.Ltd., Mumbai |
| 15. | M/s Criticare Systems, Mumbai |

| | |
|---|---|
| 16. | M/s Empire Instrumentation, Mumbai |
| 17. | M/s Minitech Equipment Co., Mumbai |
| 18. | M/s Esbee Dynamed Pvt.Ltd., Mumbai |
| 19. | M/s Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai |
| 20. | M/s Hospitech, Mumbai |
| 21. | M/s Datex Ohmeda India Pvt.Ltd., Mumbai |
| 22. | M/s Wipro GE Medical Systems Pvt.Ltd., Mumbai |
| 23. | M/s Philips Medical Systems India Pvt.Ltd., Mumbai |
| 24. | M/s Biomedicaon Systems (I) Pvt.Ltd., Mumbai |
| 25. | M/s Janak Manufacturing Works, Mumbai |
| 26. | M/s Life Care Medical Systems, Mumbai ( 2 Packets) |
| 27. | M/s Spandan Enterprises, Nashik |
| 28. | M/s Global Medicare Systems, Nashik |
| 29. | M/s QualiSurge Surgical Pvt.Ltd., Pune |
| 30. | M/s Larsen & Toubro Ltd., Pune |
| 31. | M/s Om Agencies, Shrirampur |
| 32. | M/s Devi Surgicals, Ahmednagar |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०७.२००५ चे स्थानिक विश्वस्त समिती सभेत उघडण्यात आल्या. या निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो सर्व सदस्यांना पुरविणेत आला होता. तसेच निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले.

या तक्त्यातील पार्ट A मधील ३२ निविदाधारकांना आजचे सभेपुढे बोलविण्यात आले होते. यातील १९ पैकी १० मशिनरी संबंधी खरेदीचा निर्णय वाटाघाटीव्दारे झाला. उर्वरित ९ मशिनरीसाठी व पार्ट B (General Machinery/Equipments–Part"B),C (Hospital Furniture & Mattresses – Part "C), D (Office Furniture–Part D)च्या निविदाधारकांना खास सभेत बोलविण्यात यावे व त्यातील B, C व D च्या निविदाधारकांस त्यांच्या मालाचे नमूने सोबत आणावे म्हणजे प्रत्यक्ष पहाणी करुन निवड करणे सोपे जाईल असे सांगणेत आले.

रुग्णालयासाठी लागणा-या या सर्व वस्तूंची निवड त्यांचे गुणवत्तेप्रमाणे असणा-या त्यांचे श्रेष्ठतेवर अवलंबून होती. त्यामुळे किमान दराचे घेणे रुग्णाच्या जीवाशी खेळल्या सारखे होऊ शकते. त्यानुसार वस्तूची उत्तमता पाहून परंतु; सारख्या श्रेष्ठता असणा-या वस्तूला अनावश्यक किंमत न देता पुरवठादारांकडून किंमतीबाबत योग्य ती सवलत घेऊन खरेदी करण्यात यावी असा निर्णय झाला. तांत्रिकदृष्टया कुठल्याही प्रकारची तडजोड कमी किंमती खातर मान्य करण्यात येऊ नयेत असा कटाक्ष होता. यानुसार खालील १० वस्तूंची निवड त्याची आवश्यकता, त्यासाठी लागणारी वस्तूची तांत्रिकक्षमता व योग्य भाव असा समन्वय साधून करण्यात आली आहे.

**<u>१) मल्टीपल पॅरामीटर मॉनिटर</u>**- एकंदर पुरवठाधारक १२ पैकी तांत्रिकदृष्टया उत्तम अशा फिलिप्सची निवड करण्यात आली आहे. १२ मॉनिटर्स व १ सेंट्रल मॉनिटर अशा १३ नगांसाठी त्यांनी रु.४०,५०,०००/- चे दर सादर केले होते. वाटाघाटीनंतर हा दर फक्त रु.३९,००,०००/- असा मान्य करण्यात आला आहे. त्याचे खरेदीस मान्यता देण्यात आली.

**<u>२) बेडसाईड मॉनिटर</u>** - यासाठी एकुण ०९ पुरवठाधारकां पैकी उच्च तंत्र ज्ञानावर आधारीत प्लॅनेट-५० या मॉडेलची निवड करण्यात आली. याचे पुरवठाधारक एल अँड टी आहेत. ८ मॉनिटर्स व १ सेंट्रल स्टेशन अशा ९ नगासाठी रु.१२,३७,०००/- चा दर सादर केला होता. वाटाघाटीनंतर हा दर रु.११,२५,०००/- असा मान्य करण्यात आला. त्याचे खरेदीस मान्यता देण्यात आली.

**<u>३) कॅथलॅब इक्विपमेंट</u>** - यासाठी एकूण पुरवठाधारक ६ होते. त्यातील अपेक्षित तंत्रज्ञानाचे फक्त दोन होते. १) फिलिप्स २) सिमेन्स.

फिलिप्सने त्यांचा अंतिम दर रु.३,४०,००,०००/- सादर केला. सिमेन्सने हा दर रु.२,९५,००,०००/- व त्या सोबतच्या ऐच्छिक उपकरणासाठी रु.१५,००,०००/- असा दर सादर केला. दोन्ही तंत्रज्ञानात जवळपास असल्यामुळे दोघांपैकी न्यूनत्तम दर स्वीकारण्यात आले. यातील सिमेन्सचा दर तांत्रिक समकक्षता असून कमी आहेत. याकरिता सिमेन्सची निवड करण्यात आली आहे. याकामी १ मशिन खरेदीकामी मान्यता देण्यात आली.

**<u>४) व्हेन्टिलेटर (अडल्ट) व ५) व्हेन्टिलेटर (चाईल्ड)</u>** - यासाठी ७ पुरवठाधारकांनी निविदा सादर केल्या होत्या. तांत्रिकदृष्टया श्रेष्ठ पाहून व वाटाघाटीच्या दरानंतर त्यातील खालीलप्रमाणे निवड करण्यात आली. एकूण १६ नग खरेदीसाठी खालीलप्रमाणे वाटाघाटीनंतरचे दरात ३ कंपनीचे खरेदीसाठी मान्यता देणेत आली.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | अ)मॅक्वेट सर्वो-एस मॉडेल (संख्या ८) | रु.१०,००,०००/- | रु.८,७५,०००/- |
| | ब) सर्वो-आय मॉडेल (संख्या ४) | रु.१२,४७,०००/- | रु.१०,००,०००/- |
| ०२. | लाईफ केअर-बेअर कॅप ७५०(संख्या २) | रु.६,३१,१२५/- | रु.५,८५,०००/- |
| ०३. | हॉस्पीटेक, मुंबई व्हर्सा (संख्या २) | रु.६,५०,०००/- | रु.६,००,०००/- |

**६) डिफिब्रिलेटर** - ४ निविदा या विषयात सादर झालेल्या आहेत. त्यापैकी तांत्रिकदृष्टया अद्यावत् अशा २ च होत्या. त्या खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | फिलिप्स | रु.३,७८,०००/- | रु.३,५०,०००/- |
| ०२. | एल अँड टी | रु.३,६५,६२५/- | रु.३,००,०००/- |

वरील कंपन्या तांत्रिकदृष्टया अद्ययावत असून त्यांचे किंमती कमी असल्यामुळे एल अँड टी ची ३ व फिलिप्सचे १ अशी ४ डिफिबिलेटर उपकरणे सध्या खरेदी करावीत असा निर्णय झाला.

**७) अटो अनालायझर पॅथॉलॉजी** - यासाठी २ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | ट्रिव्हिट्रॉन, मुंबई | रु.१७,००,०००/- | रु.१६,५०,०००/- |
| ०२. | कॉम्पैक्ट, न्यू दिल्ली | रु.१८,००,०००/- | रु.१७,००,०००/- |

वरीलपैकी मे.ट्रिव्हिट्रॉन,मुंबई यांचे दर कमी असल्यामुळे व तांत्रिक क्षमतेत समतूल्य असल्यामुळे १ मशिन खरेदीसाठी त्यांची निविदा मान्य करण्यात आली.

**०८) ETO Steriliser with Aereator** - यासाठी २ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| अ) | वैभव,पुणे | रु.४,४९,०००/- | रु.४,४०,०००/- |
| ब) | स्पंदन,नाशिक | रु.२४,८०,०००/- | रु.२४,००,०००/- |

'अ' मध्ये भारतीय तंत्रज्ञान असून 'ब' हे विदेशी आहे.दोन्हीच्या किंमतीतील तफावत खूपच असल्यामुळे या मशिनचा वापर किमान करावयाचा असल्यामुळे वैभव, पुणे यांचेकडून १ मशिन घेण्याचा निर्णय झाला.

**९) स्ट्रेस टेस्ट मशिन** - यासाठी ५ पुरवठाधारकांनी निविदा सादर केल्या होत्या. यातील ३ तांत्रिकदृष्टया सक्षम आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | नासान,पुणे | रु.७,५०,०००/- | रु.७,५०,०००/- |
| ०२. | वैभव,पुणे | रु.११,७०,०००/- | रु.११,७०,०००/- |
| ०३ | विप्रो,मुंबई | रु.११,००,०००/- | रु.९,००,०००/- |

वरील ३ पैकी नासान पुणे यांचे मशिन तांत्रिकदृष्टया उत्तम असून किंमतीतही कमी आहे. यामुळे नासान पुणे यांचेकडून १ मशिन खरेदी करण्याचा निर्णय झाला आहे.

**१०) २-D ECHO Machine** - यासाठी ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. ज्या तांत्रिकदृष्टया समकक्ष असतील.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | सिमेन्स,मुंबई | रु.५५,००,०००/- | रु.५५,००,०००/- |
| ०२. | विप्रो,मुंबई | रु.४९,५४,०००/- | रु.४९,५४,०००/- |
| ०३ | फिलिप्स,मुंबई | रु.४०,००,०००/- | रु.४०,००,०००/- |

वरीलपैकी फिलिप्सची मशिन तांत्रिकदृष्टया समकक्ष असून किंमतीतही कमी आहे. या कारणाने फिलिप्स कंपनीची निविदा निवडीचा अंतिम निर्णय झाला आहे व एक मशिन खरेदीस मान्यता देण्यात आली.

उपरोक्तप्रमाणे निवड झालेल्या दहा आयटेम्ससाठी पुरवठाधारकांना खरेदी आदेश देण्यात यावा असे ठरले.

वरील निर्णया व्यतिरिक्त आणखी ९ मशिनसाठी वाटाघाटी बाकी असून लवकरच यासंबंधी योजना आखून निर्णय घेतला जाईल असे ठरविण्यात आले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.०२. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता खरेदी करावयाचे स्टरलायझर्स, ऑटोक्लेव्ह इ. उपकरणे खरेदीसाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३३३.** श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु करावयाचे कार्डीओलॉजी / नेफ्रॉलॉजी विभागासाठी खरेदी करावयाची मोठी मशिनरी/उपकरणे (उदा. स्टरलायझर, ऑटोक्लेव्ह, ब्लडप्रेशर ॲप्रटस, बेडपॅन, युरीनल्स) साठी अंदाजे रु. १६,३४,८००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरची मशिनरी/उपकरणे खरेदीचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १७/०४/२००५ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदरची खरेदी ही वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व रु.१६,३४,८००.०० चे खर्चास मंजूरी मिळालेली आहे.

सदर मशिनरी/उपकरणे खरेदी कामी दिनांक २५/०३/२००५ चे मंजूर टिपणी अन्वये सकाळ, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, टाईम्स ऑफ इंडिया इत्यादी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि. १५/०४/२००५ अखेर सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन मुंबई व शिरडी येथील संस्थानच्या कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. दि. १५/०४/२००५ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात मिळून एकूण ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे-

**General Machinery / Equipments – Part "B"**

| Sr.No. | Name of Company |
|---|---|
| 01. | M/s Warden Surgicals Co.Pvt.Ltd., Navi Mumbai |
| 02. | M/s M.Shah & Company, Pune |
| 03. | M/s Johnson & Johnson Ltd., Mumbai |
| 04. | M/s S.R.Traders & Surgicals, Pune |
| 05. | M/s QualiSurge Surgical Pvt.Ltd., Pune |
| 06. | M/s Maureen Surgical Co., Aurangabad |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.०३. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता खरेदी करावयाचे हॉस्पिटल फर्निचर व मॅट्रेसेस साठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३३४.** श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु करावयाचे कार्डीओलॉजी / नेफ्रॉलॉजी विभागासाठी खरेदी करावयाचे हॉस्पिटल फर्निचर व मॅट्रेसेस साठी अंदाजे रु. ४०,२३,०५२/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचे हॉस्पिटल फर्निचर व मॅट्रेसेस खरेदीचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०४/२००५ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदरचे खरेदीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व रु.४०,२३,०५२/- चे खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

सदर हॉस्पिटल फर्निचर व मॅट्रेसेस खरेदी कामी सकाळ, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, टाईम्स ऑफ इंडिया इत्यादी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि. १५/०४/२००५ अखेर सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन मुंबई व शिरडी येथील संस्थानच्या कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. दि.१५/०४/२००५ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात मिळून एकूण १४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे-

**Hospital Furniture & Mattresses – Part "C"**

| Sr.No. | Name of Company |
|---|---|
| 01. | M/s Metalbeds India Pvt.Ltd., Mumbai |
| 02. | M/s Warden Surgicals Co.Pvt.Ltd., Navi Mumbai |
| 03. | M/s Navakar Industries, Nashik |
| 04. | M/s Swaraj Industries, Kopargaon |
| 05. | M/s Yashodeep Marketing, Nashik |
| 06. | M/s Hospicare Engineers, Nashik |
| 07. | M/s Quali Surge Pvt.Ltd., Pune |
| 08. | M/s Auto Foam (I) Co., Aurangabad |
| 09. | M/s S.S.I.D.C.Ltd., Ahmednagar |
| 10. | M/s Goldline Enterprises, Nashik |
| 11. | M/s Rajseva Enterprises, Pune |
| 12. | M/s Satpuda Engineering Pvt.Ltd., Nashik |
| 13. | M/s S.R.Traders & Surgicals, Pune |
| 14. | M/s Century Coolers, Nagpur – ***Late on 16/04/2005*** |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.०४. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता कार्यालयीन फर्निचरसाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३३५.** श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु करावयाचे कार्डीओलॉजी / नेफ्रॉलॉजी विभागासाठी खरेदी करावयाचे कार्यालयीन फर्निचरसाठी अंदाजे रु. २०,६४,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदर फर्निचर खरेदीचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७/०४/२००५ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदरचे खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व रु. २०,६४,०००/- चे खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

सदर कार्यालयीन फर्निचर खरेदी कामी सकाळ, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, टाईम्स ऑफ इंडिया इत्यादि वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि. १५/०४/२००५ अखेर सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन मुंबई व शिरडी येथील संस्थानच्या कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. दि. १५/०४/२००५ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात मिळून एकूण १० निविदा प्राप्त झालेल्या आहेत-

**Office Furniture – Part "D"**

| Sr.No. | Name of Company |
|---|---|
| 01. | M/s National Agency, Mumbai |
| 02. | M/s Magnum Office Aids, Mumbai |
| 03. | M/s Atul Enterprises, Mumbai |
| 04. | M/s Abhay Steel Industries, Nashik |
| 05. | M/s Arihant Industries, Nashik |
| 06. | M/s Abhaykumar Bafna, Shrirampur |
| 07. | M/s Jaidurga Collections, Yeola |
| 08. | M/s S.S.I.D.C.Ltd., Ahmednagar |
| 09. | M/s S.R. Furniture & Interior, Pune |
| 10. | M/s Century Coolers, Nagpur – ***Late on 16/04/2005*** |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.०५. श्री.पंढरीनाथ सावंत व श्री पांडूरंग कृष्णा कदम, मुंबई यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत**

**निर्णय क्र.३३६. अ)**श्री.पंढरीनाथ सावंत, कार्यकारी संपादक, दैनिक सामना यांनी त्यांची पत्नी सौ.नीला सावंत यांचे गुडघ्यावरील शस्त्रक्रियेकरिता संस्थानतर्फे वैद्यकीय आर्थिक अनुदान मिळणेबाबत मा.श्री शंकरराव कोल्हे,उपाध्यक्ष यांचेकडे अर्ज केलेला असून सदरचा अर्ज इकडील कार्यालयास दि.०४.०७.२००५ रोजी मिळालेला आहे.

सौ.नीला सावंत यांचे गुडघ्यावर के.ई.एम.हॉस्पिटल, मुंबई या रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार असून त्याकरीता रुपये १,२०,०००.०० खर्च अपेक्षित असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार सौ.सावंत यांचे आजाराकरिता अनुदान देता येत नाही. तसेच श्री सावंत यांनी अनुदान मागणी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत.

ब) श्री कदम पांडूरंग कृष्णा, मुंबई यांनी त्यांचा मुलगा चि.संदिप यांचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे आर्थिक अनुदान मिळणेबाबत दिनांक २८.०३.२००५ चे अर्जाने मागणी केलेली आहे.

चि.संदिप हा मणका (Spine Disease) या आजाराने पिडीत असून त्याचेवर पी.डी.हिंदूजा नॅशनल हॉस्पिटल, मुंबई या रुग्णालयात उपचार चालू असून त्यांची शस्त्रक्रिया दिनांक ०८.०१.२००५ रोजी करण्यात आलेली आहे. सदर शस्त्रक्रियेसाठी रुपये १,१०,०००.०० खर्च आल्याचे श्री कदम यांनी इकडील कार्यालयास कळविलेले आहे.

श्री कदम यांनी त्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये २,००,४२५.०० असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

श्री कदम यांनी अर्जासोबत रुग्णालयाचे प्रमाणपत्र व उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र (मूळप्रत) सादर केलेले नाही.

संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार चि.संदीप यांचे आजाराकरीता वैद्यकीय आर्थिक अनुदान देता येत नाही.

श्री कदम यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ९०,०००/- पेक्षा जास्त असल्याने संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार अनुदान देता येत नाही.

श्री कदम यांचे अनुदान मागणी अर्ज उशिरा म्हणजे शस्त्रक्रियेच्या तारखेपासून एक महिन्यानंतर आलेला असल्याने वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार अनुदान देता येत नाही.

श्री कदम यांना वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेबाबत मा.श्री.दिग्विजय खानविलकर यांनी शिफारस पत्र दिलेले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत उपरोक्त आजारावर वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याची तरतूद नाही, परंतू एक विशेष बाब म्हणून श्री पंढरीनाथ

सावंत, यांना त्यांचे पत्नीचे गुडघ्यावरील शस्त्रक्रियेसाठी व श्री पांडूरंग कृष्णा कदम यांना त्यांचा मुलगा चि. संदिप यांचे मणका शस्त्रक्रियेसाठी संस्थान वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन संस्थान नियमानुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात यावे असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.०६. नर्सिंग स्कूल सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३७.** श्रीसाईबाबा या महान संताचे शिर्डीमध्ये सन १८५६ ते सन १९१८ अखेर वास्तव्य होते. त्यांचे हयातीत "रुग्णसेवा" हे त्यांच्या त्रिसुत्री तत्वांपैकी एक तत्व असल्यामुळे श्रीसाईबाबांच्या हयाती नंतरही हे कार्य चालू रहावे म्हणून व्यवस्थापन मंडळाने सन १९४४ चे दरम्यान साईनाथ छाया या इमारतीत डॉक्टर रुस्तमजी यांच्या देखरेखीखाली लहानसा होमिओपॅथीक दवाखाना सुरु करणेत आला होता. पुढे चालून ही जागा कमी पडत असल्यामुळे बसस्टॉपच्या समोरील इमारतीचे फेब्रुवारी,१९६४ मध्ये उद्‌घाटन होऊन श्रीसाईनाथ रुग्णालय उभे राहिलेले दिसून येते. बाबांच्या पेटीत जमा होणाऱ्या देणग्यांवर आपले रुग्णालयात अद्ययावत वैद्यकीय सेवा दिली जाते. आपल्या रुग्णालयामध्ये उत्कृष्ट प्रतीचे साहित्य असून अद्ययावत मशिनरी आहेत. त्या वापरण्यासाठी प्रशिक्षीत डॉक्टर्स आहेत.

श्रीसाईनाथ रुग्णालय हे ग्रामीण भागात कार्यरत असून या रुग्णालयात शिर्डी व शिर्डी परिसरातील येणाऱ्या गरीब रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार दिले जातात. या भागात राहणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिती सर्वसामान्य असून बहूतांशी कुटूंबे शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. श्रीसाईनाथ रुग्णालयाच्या जवळपास कोठेही १५ किलोमीटरच्या आत नर्सिंग स्कूलची सुविधा उपलब्ध नाही. नर्सिंग स्कूलची सुविधा जवळपास उपलब्ध नसल्याने स्थानिक नागरिकांना यासाठी बाहेरगावी जाऊन प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यामध्ये प्रशिक्षणार्थीचे व त्यांचे कुटूंबियांचे विनाकारण वेळेचा अपव्यय होऊन आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

श्रीसाईनाथ रुग्णालयात रुग्णांकरिता २४ तास वैद्यकीय सेवा तीन शिफ्टमध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या रुग्णालयात दररोजची ओपीडी ८०० ते ९०० चे जवळपास असते. रुग्णालयात दररोज साधारण २० ते २५ मेजर व मायनर ऑपरेशन्स केली जातात. याशिवाय रुग्णालयामार्फत परिसरातील ३ गावांना (पिंपळस, कोऱ्हाळे, देर्डे-कोऱ्हाळे) फिरते वैद्यकीय पथक पाठवून गरजू रुग्णांना मोफत सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

श्रीसाईनाथ रुग्णालयात सध्या सर्जरी विभाग, मेडिसिन विभाग, ऑर्थोपेडीक विभाग, गायनिक विभाग, बालरोग विभाग, आयुर्वेदीक विभाग, होमिओपॅथीक विभाग, सोनोग्राफी विभाग,रेडिओलॉजी विभाग, नेत्ररोग विभाग, दंत विभाग,ई.एन.टी विभाग, मेडिकल स्टोअर्स, ब्लड बँक,ऑपरेशन थिएटर, प्रयोगशाळा विभाग तसेच ६ खाटांचे आय.सी.सी.यू.विभाग हे विभाग कार्यरत आहेत.

रुग्णालयात येणाऱ्या अत्यंत गरीब व गरजू रुग्णांना त्यांच्या होणाऱ्या एकूण बीलात सवलत देऊन त्यांना उपचार दिले जातात. याशिवाय श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये ज्या आजारांवर उपचार होत नाहीत अशा गरीब व गरजू रुग्णांना त्यांच्या उपचाराकरिता वैद्यकीय आर्थिक अनुदान म्हणून वार्षिक रुपये ६ कोटीचे वाटप ठराविक आजारांच्या शस्त्रक्रियेसाठी व उपचारासाठी केले जाते.

रुग्णालयातील (जैविक केरकचरा) बायो मेडिकल वेष्ट नष्ट करण्यासाठी इंन्सिनरेटर खरेदी करुन तो कार्यरत आहे. तसेच रुग्णालयात सी.टी.स्कॅन मशिन, कलर डॉपलर, डायलेसिस युनिट, यांसारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

श्रीसाईनाथ रुग्णालयात विस्तारीकरण करुन २०० खाटांचे रुग्णालयाचे आता २२५ खाटांचे रुग्णालय म्हणून कार्यान्वीत होणार आहे. त्यासाठी अंदाजे साडेतीन कोटी रुपये खर्च करणेत आलेला आहे. संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांना व त्यांचेवर अवलंबितांचा सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा/उपचार मोफत देत असून बाहेरील रुग्णालयात उपचार घेण्यास पाठविल्यास त्यासाठी येणारा रुग्णालयाचा खर्च संपूर्णरित्या कर्मचाऱ्यांना परत देण्यात येतो. नर्सिंगचा अभ्यासक्रम सध्या संस्थानच्या आय.टी.आय. विभागात सुरु करुन ज्या ठिकाणी आय.टी.आय.चे विद्यार्थी शिक्षण घेतात त्याठिकाणी शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र हॉलची/रुमची सुविधा उपलब्ध करुन देता येईल. या करिता प्रत्येक बॅचला साधारण ५० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी ठेवता येतील व त्यांच्यासाठी जनरल मिडवाईफ ह्या साडेतीन वर्षाच्या अभ्यासक्रमाची सुविधा उपलब्ध करुन देता येईल. सदर प्रशिक्षणार्थ्यांना राहण्याकरिता होस्टेलची सुविधा उपलब्ध होईपर्यंत भक्तांच्या सोईकरिता वापरण्यात येणाऱ्या धर्मशाळा इमारत नं.०१ च्या रिकामे हॉल्स/खोल्यांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात करता येईल. सदरच्या प्रशिक्षणार्थ्यांना कमवा व शिका या योजनेअंतर्गत विना मोबदला तत्वावर मोफत भोजनाची व्यवस्था संस्थानच्या प्रसादालय विभागात करता येईल. नर्सिंग स्कूल सुरु करणेसाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नर्सिंग स्कूल सुरु करणेस शासनाची मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन घेता येतील. याबाबतचा सविस्तर अभ्यास करुन प्रस्ताव बनविण्याकामी सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकडे नियुक्त असलेले डॉ.कोठारी (प्रोजेक्ट रिपोर्टर) यांचेकडून सदरचा प्रोजेक्ट तयार करुन घेता येईल.

सदर नर्सिंग स्कूलचे प्रशिक्षणार्थी यांना विनामोबदला श्रीसाईनाथ रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या सेवेसाठी आणता येईल. तसेच रुग्णालयात दैनंदिन कामकाजात त्यांचा उपयोग करुन घेता येईल. त्यामुळे रुग्णालयात परिचारिका यांची अडचण भासणार नाही व सदर प्रशिक्षणार्थी यांना त्यांच्या प्रशिक्षण कालावधीमध्येच आपल्या रुग्णालयात नर्सिंग कामाचा चांगल्या प्रकारे अनुभव घेता येईल. यामध्ये स्थानिक मुली/मुलांना प्रामुख्याने सामावून घेता येईल.

नर्सिंग स्कूल ही सेवा प्रामुख्याने महिला वर्गासाठी उपलब्ध करुन दिली जाते. श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत नर्सिंग स्कूल सुरु केल्यास परिसरातील रहिवास्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या शिक्षणाने स्त्री स्वावलंबी होणार असून बाबांच्या तत्वाप्रमाणे विद्यादान केले जाणार आहे. म्हणजेच बाबांच्या त्रिसुत्री तत्वापैकी एक तत्व आचरणात आणले जाणार आहे. नर्सिंग स्कूलच्या प्रशिक्षणार्थ्यांच्या सरावासाठी श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये आवश्यकतेप्रमाणे सोयी-सुविधा उपलब्ध करुन देता येतील.

तरी श्रीसाईनाथ रुग्णालयास संलग्न असे नर्सिंग स्कूल सुरु करणेस व त्याअनुषंगाने प्रिन्सीपॉल व त्याखालील कर्मचारी वर्गाची नेमणूक करणे तसेच शासन स्तरावर मान्यता घेणे व फर्निचर इत्यादीकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका/अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.०७. संस्थानच्या वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थान बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.३३८.** सेवाधाम इमारत ही मूलत: साईभक्तांचे निवासासाठी बांधलेली आहे. परंतु संस्थान कर्मचारी संख्येत वाढ झाल्याने त्यांची निवासाची गैरसोय दूर व्हावी याकरिता सेवाधाम इमारत वर्ग -४ कर्मचाऱ्यांचे निवासासाठी देण्यात आलेली आहे. या इमारतीतील खोल्या साधारणत: प्रत्येकी १० फूट x १० फूट या लहान आकाराच्या असून त्यामध्ये संलग्न संडास, बाथरुम नाहीत व फक्त लहान मोरी आहे. एवढ्या लहान व सोयीविरहित खोलीत एका कुटूंबाच्या निवासाची फारच अडचण होते. तसेच बऱ्याच वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना निवासाचे उपलब्धतेअभावी संस्थानच्या खोल्या देण्यात आलेल्या नाहीत. शिरडी गावात भाडोत्री खोल्याही सहसा मिळत नाहीत व त्यामुळे बरेच कर्मचारी बाहेरगांवी राहतात.

सेवाधाम ही इमारत मंदिरापासून जवळच असल्यामुळे या इमारतीतील खोल्यांमध्ये संलग्न संडास बाथरुमची सोय करुन या खोल्या साईभक्तांच्या निवासासाठी उपयोगात आणता येतील व वर्ग-४ कर्मचाऱ्यांकरिता नवीन निवासस्थान बांधकाम करता येईल. असे व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.३३४ दि.९-१०/०८/२००३ अन्वये ठरले होते. त्यानुसार साईप्रसाद भाडेकरु मालकी गृह निर्माण संस्थेची स.नं. १६९ मधील ६० आर जागेत आर्किटेक्ट श्री.भालचंद्र चावरे, नाशिक यांनी सादर केलेल्या प्लॅन व एस्टिमेटला त्याचप्रमाणे याकामासाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेसाठी कार्यवाही करण्यात आली होती. अधिनियम २००४ अन्वये व्यवस्थापन समिती अस्तित्वात आल्याने सदरचा प्रस्ताव दि. २१/१०/२००४ रोजीचे विद्यमान व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करण्यात आला होता. याबाबत चर्चा होउन नियोजित कर्मचारी निवासस्थानासाठी निश्चित करण्यात आलेल्या वरील जागेच्या जवळपास अद्याप वीज,पाणी,रस्ते अशा पायाभूत सुविधा संस्थानतर्फे निर्माण करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या जागेऐवजी इतर ठिकाणी असलेल्या संस्थान मालकीचे जागेमधून अथवा नव्याने भूसंपादन करण्यात येत असलेल्या संस्थान मालकीचे जागेमधून योग्य अशी जागा सदर प्रकल्पासाठी निवडणे संयुक्तीक होईल, त्यासाठी सध्या निम्नतम दराची मे. नितीन बी. औताडे यांचे निविदेसह वरील कामासाठी आलेल्या सर्व निविदा रद्द कराव्यात असे ठरले. सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट श्री.मधू खोकळ, पुणे यांची नेमणूक करण्यात यावी. सुधारित आराखडा व एस्टिमेट तयार करुन सभेपूढे सादर करावे असे ठरले.

आर्किटेक्ट श्री मधू खोकळ यांना याबाबत दि.०७/१२/२००४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते. मात्र त्यांचेकडून प्लॅन प्राप्त झालेला नाही. वर्ग - ४ कर्मचारी निवासस्थान बांधकामासाठी शेती महामंडळाकडून ताब्यात घेतलेल्या जागेतही वरीलप्रमाणे मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागतील त्यामुळे स.नं. १६९ मधील ६० आर जागेत रहीवास वस्तीजवळ निवासस्थानांचे बांधकाम करणे योग्य होईल असे मत आहे.

आजचे सभेपूढे आर्किटेक्ट श्री.भालचंद्र चावरे यांनी तयार केलेला प्लॅन सादर करण्यात आला. सदरहू बांधकामासाठी अपेक्षित खर्चाचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) एकूण सिव्हिल वर्क | - रु. २,२२,७२,३२६.०० |
| २) पाण्याची साठवण टाकी | - रु. १०,८८,०२५.०० |
| ३) अंतर्गत रस्ते | - रु. २,१८,९५२.०० |
| ४) विद्युतीकरण | - रु. ३६,५२,६००.०० |
| एकूण | - रु. २,७२,३१,९०३.०० |

उपरोक्त एस्टीमेट हे DSR २००२ - २००३ दरानुसार तयार केलेले आहे. त्यामध्ये प्रचलीत DSR दरानुसार सुधारणा करावी लागेल. आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या प्लॅननुसार इमारतींचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१)	एका सदनिकेमध्ये २.८७ मी. x २.९१ मी. (९.४१ फुट x ९.५४ फुट ) आकाराच्या तीन खोल्या व सलग्न संडास बाथरुम आहे.

२)	एका सदनिकेचा बिल्टअप एरिया ३८.५० चौ.मी.(४१४.२६ चौ.फुट) इतका आहे.

३)	एका इमारतीचा बिल्टअप एरिया ५७० चौ.मी. (६१३३.२० चौ.फुट) इतका असून अशा एकूण ८ इमारती प्रस्तावित केलेल्या आहेत.

४)	एका इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर ४ सदनिका व तळमजला अधिक दोन मजले (G+२) प्रस्तावित करण्यात आले आहेत.

५)	एका इमारतीमध्ये १२ सदनिका व अशा एकूण ०८ इमारती याप्रमाणे एकूण ९६ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन मौजे निमगांव -को-हाळे गट नं.१६९ मधील ६० आर जागेत आर्किटेक्ट भालचंद्र चावरे यांचे प्लॅननुसार कर्मचारी निवासस्थाने एकुण आठ इमारती बांधकामासाठी व त्यासाठी येणारे खर्चास मंजूरी देण्यात आली. सदर नियोजित बांधकामासाठी प्रथम सध्या प्रचलित असलेल्या डी.एस.आर दरांनुसार तपशिलवार एस्टिमेट तयार करुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत याव्यात असे ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०८.	स.नं.१२४/१ मध्ये मंगलकार्यालय तथा बहुउद्देशिय हॉल बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.३३९.** संस्थानचे सर्व्हे नं. १२४/१ अ मधील आरक्षण क्र. ३९ खालील ७८ आर क्षेत्रावर मध्यवर्ती भांडार व मंगल कार्यालय इमारत बांधकामासाठी निर्णय क्र. २५३ दि. १२-१३/०७/२००३ अन्वये तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली होती. सदर नियोजीत मंगल कार्यालय इमारत बांधकामासाठी आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांनी सादर केलेल्या रु. ४५,८२,०५१/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चाच्या एस्टीमेट नुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा सादर कर्त्यांचे निविदेतील देकार असलेला लिफाफा क्र.२ उघडणेसाठी व्य.समितीच्या सभेपूढे दि. २१/१०/२००४ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होउन सदर कामासाठी आलेल्या सर्व निविदा रद्द कराव्यात व सुधारीत आराखडा, एस्टीमेट तयार करावे तसेच या बांधकामासाठी आर्किटेक्ट श्री शैलेश सालेहीट्टल, पुणे यांची नेमणूक करावी असे ठरले.

आर्किटेक्ट श्री.शैलेश सालेहीट्टल, पुणे यांनी आरक्षण क्रं. ३९ मधील सर्व्हे क्रं. १२४/अ मधील जमिनीची तसेच शेतीमहामंळाकडून घेतलेल्या सर्व्हे क्र. ८०,८५ निमगांव येथील जागेची पहाणी केली. सर्व्हे नं.१२४ मधील क्षेत्र कमी असल्याने सर्व्हे क्र. ८०,८५ निमगांव येथील जमिनीत मंगल कार्यालय बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट शैलेश सालेहीटल, पुणे यांनी प्लॅन तयार केला होता. सदर प्लॅन बाबत दिनांक ०८/०२/२००५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे बैठकीत संमत करण्यात आलेल्या निर्णय क्रमांक ७० अन्वये शेती महामंडळाकडून ताब्यात घेण्यात आलेल्या जमिनीवर पुढील २५ वर्षापर्यंतच्या गरजा निश्चित करुन मास्टर प्लॅन तयार करण्यात यावा. त्यामध्ये नियोजित बहुउद्देशीय संकूल तथा मंगल कार्यालयासाठी योग्य अशी जागा ठरवून त्यानुसार प्लॅन तयार करण्यात यावा असे ठरले.

आता निमगांव गट नं. ८० व ८५ मधील जागेत नियोजित प्रसादालय इमारतीचे बांधकाम करणेसाठी व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर जागेवर मंगल कार्यालयाचे बांधकाम करता येणार नाही. त्यासाठी पुर्वीचे प्रस्तावाप्रमाणे शिर्डी सर्व्हे नं. १२४/१ अ मधील जागेत नियोजित मंगल कार्यालयाचे बांधकाम करता येईल. याकरिता आर्किटेक्ट शैलेश सालेहिट्टल, पुणे यांचेकडून नव्याने प्लॅन तयार करुन घेता येईल अथवा आर्किटेक्ट भालचंद्र चावरे यांनी यापुर्वी सादर केलेल्या प्लॅन व एस्टीमेटनुसार नियोजित बांधकाम हाती घेता येईल तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी सर्व्हे नं.१२४/०१ अ मधील आरक्षण क्र.३९ खालील जागेत आर्किटेक्ट भालचंद्र चावरे यांचे प्लॅननुसार नियोजित मंगलकार्यालय-तथा-बहुउद्देशीय हॉल बांधकामास व त्यासाठी येणारे खर्चास मंजुरी देण्यात आली. या बांधकामामध्ये एक हजार ते बाराशे व्यक्तींची असनक्षमता असलेला हॉल जेवणासाठी स्वंतत्र कक्ष दहा निवासी खोल्या, जनरल टॉयलेट यांचा व इतर अनुषंगिक सुविधांचा समावेश असावा. सदर नियोजित बांधकामासाठी प्रथम सध्याचे प्रचलित डी.एस.आर दरांनुसार तपशिलवार एस्टिमेट तयार करावे व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०९.	श्री साईबाबांचे जीवनावर आर्ट गॅलरी तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियमातील कलम १७ (ठ) नुसार श्री साईबांबाचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार कर्तव्यांचा समावेश समितीच्या कार्यात करण्यात आलेला आहे.

त्यास अनुसरुन श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत पेंटिंगची अद्ययावत अशी आर्ट गॅलरी नामांकित कलाकारांकडून तयार करुन घेण्यात यावी असे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र. १५० दि. २७/१२/२००४ अन्वये ठरले आहे.

श्रीसाईबाबांचे जीवन चरित्रावर आधारित आर्ट गॅलरी तयार करणेकामी श्री. इंदूलाल शहा, मुंबई यांचेकडून तसेच तीन नामांकित आर्टिस्टकडून संकल्पना चित्रे मागविण्यात यावीत असे निर्णय क्र. १४१ दि. १३/०३/२००५ रोजीचे बैठकीत ठरले आहे. श्री. इंदूलाल शहा, मुंबई हे चित्रपट निर्माते आहेत त्यांचेकडून मार्गदर्शन घेता येईल याकामी खालील आर्टिस्टकडून संकल्पना चित्र मागविण्यात आली आहेत.

०१) श्री. सुनील शेगावकर, पुणे

०२) श्री. प्रमोद कांबळी, अहमदनगर

०३) श्री. सपार, मुंबई

पैकी आजचे सभेत श्री सुनील शेगावकर, पुणे व श्री सपार, मुंबई हे उपस्थित होते, त्यांनी तयार केलेली संकल्पना चित्रे सभेत सदस्यांना दाखविण्यात आली.

आर्ट गॅलरी तयार करणेसाठी प्रस्तावीत असलेल्या हॉल मध्ये ३'x४' या आकाराचे पेटींगची संख्या निश्चित करुन वरील दोन्ही आर्टिस्टना सम प्रमाणात काम विभागून देण्यात यावे. पेटींग तयार करण्यासाठी येणाऱ्या एकूण खर्चाचा तपशील दोन्ही आर्टिस्टकडून घेण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१०.** **शिरडी येथे भक्तांना ध्यान करणेसाठी मेगा पिरॅमिडचे बांधकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४१.** पिरॅमिड स्पिरीच्यूअल सोसायटी (इंडिया) हैद्राबाद / पुणे यांनी शिर्डी येथे १६०'x१६०' आकाराचे मेगा पिरॅमिडचे बांधकाम ध्यान करणेसाठी संस्थानमार्फत करावे, असे कळविले आहे.

**<u>पिरॅमिडचे महत्व व उपयोग :-</u>**

पिरॅमिड मध्ये देऊळ, ज्योती उभारणी अशाप्रकारे होते कि; ज्यात एकमेव मध्यबिंदू असतो जो की आकाशाला शीवू पहातो तो म्हणजे शिखर. अशा ठिकाणचा सर्व सामान्य अनुभव म्हणजे येथे येताच आपले ताणतणाव थोडेसे दूर झाल्यासारखे वाटते. येथे ध्यान करणे बरेच सोपे जाते. पिरॅमिडचे आकार असे आहे की, जाच्या कुठल्याही अंगावर पडलेले प्रकाश किरण, विश्वचैतन्य शक्तीचे झोत वगैरे सरळ आपल्या चौरसावर पडतात आणि तेथे ते पृथ्वीच्या गरुत्वाकर्षण शक्तीशी एकरुप होवून एक नवीन शक्ती जन्मास येते हिच पिरॅमिड उर्जा असते.

**पिरॅमिड आणि ध्यानाचे महत्व :-**

**पिरॅमिडचे उपयोग :-**

१. अध्यात्मिक उन्नती ध्यान.

२. वैद्यकिय उपचार व झीज भरुन काढणे.

३. शक्ती संपन्नता

**अ) अध्यात्मिक उन्नतीसाठी ध्यान :-**

१. पिरॅमीड मध्ये ध्यान केल्याने आंतरीक जागृतता आणि अध्यात्मिक उन्नती निम पट जास्त वेगाने होते.

२. **सुक्ष्मशरीर यानाचे अनुभव :-** सुक्ष्मशरीर यानालक सुरुवात होते आणि या सुक्ष्मशरीर यानाच्या योगे आपण वेगवेगळया लोकात प्रवेश करु शकतो ज्यामुळे उच्च स्पंदन लहरीशी तादात्म्य साधू शकतो. ह्या क्रियेने आपल्या ज्ञानात अप्रतीम वाढ होते. आंतरीक जागृतता वाढते.

३. आपल्या शरीराचे सप्तचक्र शक्ती संपन्न होतात आणि कुंडलिनी शक्तीची जागृती होते. तृतीय नेत्र उघडले जाते.

४. आपल्या जन्माचे कारण आणि उद्देश समजते व इह लोकीचे कार्य संपन्न करण्यास आपल्याला मदत होते.

**ब) वैद्यकिय उपचार :-**

१. पिरॅमीड हा प्राण उत्पादक आहे. हे प्रात्रिक उर्जा प्रक्षेपित करते जी कि शारिरीक आणि मानसिक पातळीवर रोगांचे निरसन करण्यास उपयोगी ठरते.

२. पिरॅमीड मध्ये ध्यान करताना विश्वचैतन्य शक्तीचा शक्तीशाली प्रवाह निर्माण होवून ते कारण देह आणि सुक्ष्म देह या दोन्हीतले दोष दूर करते.

३. आपले सगळेच अस्तित्व पुनर्जीवीत होते, चैतन्यमय होते.

४. पिरॅमिड ध्यानाने स्मरणशक्ती वाढते, प्रज्ञा वाढते. एकाग्रतेत वाढ होते. हया सर्वामुळे मनुष्याची लौकिकरित्या जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलून सामान्य मनुष्य सुध्दा पूर्ण पुरुष बनतो.

**क) शक्ती संपन्नता आणि टिकाऊपणा :-**

१. पिरॅमिड मध्ये ठेवलेले अन्न दीर्घकाळापर्यंत खराब होत नाही, चविष्ट बनते, शक्तीसंपन्न होते. ह्या अन्नाच्या सेवनाने रोग प्रतिकारकता वाढते; हे अन्न अगदी शक्ती संपन्न असते.

२. साधे पाणी सुध्दा पिरॅमीड मध्ये ठेवल्याने उर्जासंपन्न बनते. हे पाणी शारिरीक प्रक्रियेला उपयोगी पडते.

वरीलप्रमाणे पिरॅमिडच्या बांधकामाचा उपयोग साईभक्तांना करुन देणेसाठी, भक्तांच्या सर्वांगीण विकासासाठी पिरॅमिडचे बांधकाम करावे यासाठी आवश्यक सहाय्यतेसाठी बांधकामाकरीता तांत्रिक मदतीसाठी, देखरेखीसाठी पिरॅमिड स्पिरीच्यूअल सोसायटीचे कार्यकर्ते केंव्हाही उपलब्ध होतील. तसेच पिरॅमिडची पूर्तता झाल्यावर आमचे कार्यकर्ते भक्तांना ध्यान शिकविण्याचे कार्य पण करतील व वेळोवेळी कार्यशाळा पण आयोजित करतील तसेच हे सर्व काम संपूर्ण निःशुल्क असेल असेही त्यांनी कळविले आहे.

फेरो सिमेंट बांधकाम तंत्रानुसार पिरॅमिड उभारणीकामी अंदाजे **रु. १.००** कोटी मात्र खर्च अपेक्षित असल्याचे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत पिरॅमिड स्पिरीच्यूअल सोसायटी (इंडिया) हैद्राबाद/पुणे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी पिरॅमिडची तयार केलेली प्रतिकृती दाखवून त्याबाबत सविस्तर माहिती सभेस करुन दिली. तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा करुन मा.सदस्यांनी पिरॅमिड स्पिरीच्यूअल सोसायटी (इंडिया) हैद्राबाद / पुणे यांनी बेंगलोर येथे तयार केलेल्या पिरॅमिडची पहाणी करावी व त्यांनतर अंतिम निर्णय घेण्यात यावा असें ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.११.** **श्री साईबाबा संस्थान शिर्डी मार्फत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विविध रस्त्यांची कामे हाती घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३४२.** मुख्याधिकारी; शिर्डी नगरपंचायत यांनी शिर्डी नगरपंचायत हद्दीतील खालील रस्त्यांची कामे शिरडी शहराच्या तसेच साईभक्तांचे सोयी-सुविधांच्या दृष्टीने विकसीत करणे कामी अंदाजीत किंमत रु.४२२.३६ लक्ष इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत उपलब्ध करुन कामे करुन द्यावी अशी विनंती केली आहे.

खालील रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्याचे मुख्याधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे.

| अ.नं. | रस्त्याचे नाव व तपशील | अंदाजीत खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी निमगांव शीव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे<br>(न.म.रोड ते पुर्वेस १ कि.मी.) | रु. ११.७१ लक्ष |
| ०२ | शिर्डी रुई रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे<br>(पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शीव रस्ता) | रु. ६.१९ लक्ष |
| ०३ | नांदुर्खी रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे<br>(२०० रुम ते नांदुर्खी शीव रस्ता) | रु. ६५.३५ लक्ष |
| ०४ | कनकुरी रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे<br>(न.म.रस्ता ते नाला रस्ता पर्यंत) | रु. २२.०० लक्ष |
| ०५ | नाला रस्ता डांबरीकरण करणे<br>(लुटे वस्ती ते साईबंधारा पर्यंत) | रु. १५.२५ लक्ष |
| ०६ | बिरेगांव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे<br>(शिर्डी ते चौफुली ते बिरोबा मंदीर) | रु. २९.१८ लक्ष |
| ०७ | १२ क्रमांक चारी पुढील रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | रु. १७.६८ लक्ष |
| ०८ | विकास योजनेतील नगर मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटी पर्यंतच्या प्रस्तावित २४ मी. रस्ता पहिल्या टप्यात १२ मी. रुंदीचा विकसीत करणे. (जमीन भूसंपादनासह ) | रु. ८०.०० लक्ष |
| ०९ | ५०० रुम भक्तनिवास ते साकुरी शीव पर्यंत नगर मनमाड रस्ता ६ पदरी करुन डांबरीकरण, फुटपाथ, दुभाजक, स्ट्रीटलाईट, भूयारी गटारीसह करणे. | रु. १.७५ कोटी |

(प्रस्तावाची एकूण अंदाजित रक्कम रु. ४२२.३६ लक्ष )

उपरोक्तप्रमाणे अ.नं.२ रस्त्याचे कामास यापुर्वी मान्यता देण्यात आली आहे. तसेच अ.नं.४ चे रस्त्याच्या कामाचा शिर्डी - कनकुरी - डो-हाळे रस्त्याचे कामामध्ये (५.५० मि. रुंदीचा ) समावेश करण्यात आला आहे व सदर रस्त्यास व्यवस्थापन समितीने मान्यता दिली आहे. वरील प्रमाणे रस्त्याचे प्लॅन व एस्टीमेट शिरडी नगरपंचायत यांचेकडून मागविण्यात येत आहे. नगरपंचायत हददीतील रस्त्यांची कामे शिर्डी शहराच्या तसेच साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टीने विकसीत करणेकामी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील खालील पोट कलम २१(२) च्या तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

" पोट - कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीकडून पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात व खर्च करण्यात येईल :-

(एक ) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी किंवा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय किंवा धार्मिक संस्था किंवा कला व साहित्य या श्रेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बिगरवाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी यांची नोंदणीकृत विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत संस्था यांच्याकडून स्थापना करुन घेण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी ; किंवा

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे :

परंतू राज्य शासन, या पोट - कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या, मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील ; आणि तिचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल "

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील वरील प्रमाणे विविध रस्त्यांची कामे शिर्डी शहराच्या तसेच साईभक्तांच्या सोयी-सुविधांच्या दृष्टीने विकसीत करणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१२. नगर-मनमाड राज्य महामार्गावरील शिर्डी नगरपंचायत कार्यक्षेत्रातील हॉटेल ऋषिकेश शेजारील पूल विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४३.** शिरडी नगरपंचायत यांनी शिर्डी शहराची रहदारी नियंत्रीत करणेसाठी नगर-मनमाड राज्य महामार्गावरील हॉटेल ऋषीकेश शेजारील पूल विकसीत करण्यासाठी तसेच साईभक्तांची व शिर्डी येथील नागरिकांची कायम स्वरुपाची समस्या दूर होण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत सहकार्य मिळणेस विनंती केलेली आहे.

सदरचा पूल विकसीत करणेकामी शिरडी नगरपंचायत यांनी याकामी प्लॅन, एस्टिमेट सादर करणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

उपरोक्तप्रमाणे नगरपंचायत हद्दीतील पूल विकसीत करणेचे कामास शहराच्या तसेच साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टीने संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील खालील पोट कलम २१(२) च्या तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

"पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीकडून पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात व खर्च करण्यात येईल :-

(एक ) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी किंवा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय किंवा धार्मिक संस्था किंवा कला व साहित्य या श्रेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बिगरवाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी यांची नोंदणीकृत विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत संस्था यांच्याकडून स्थापना करुन घेण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी ; किंवा

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे :

परंतू; राज्य शासन, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या, मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील; आणि तिचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल "

यावर सविस्तर चर्चा होऊन, नगर-मनमाड राज्य महामार्गावरील शिर्डी नगरपंचायत कार्यक्षेत्रातील हॉटेल ऋषिकेश शेजारील पूल विकसित करणेबाबत शासनाची मान्यता घेण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१३. नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण कामाबाबत.**

**निर्णय क्र.३४४.** शिर्डी शहरातून जाणारा नगर- मनमाड रस्ता (लांबी - १६०५ मि. ) रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम ठेकेदार मे. न्यू महावीर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेमार्फत चालू आहे. सदर कामापैकी डांबरीकरणाचे

मुख्य काम पूर्ण झालेले आहे. फूटपाथ स्लॅब व डिव्हायडरचे काम चालू असून पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम बाकी आहे. सदर कामाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | शिरडी शहरातून जाणारा नगर-मनमाड रस्ता (लांबी १६०५ मि.) विकसीत करणे. |
| ठेकेदाराचे नांव | मे. न्यू महावीर कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| व्यवस्थापन मंडळ निर्णय | क्रमांक ५२ दि.२१-२२/०२/२००४<br>क्रमांक २२७ दि. २९-३०/०५/२००४<br>क्रमांक १४९ दि. २७/१२/२००४ |
| मंजूर निविदा रक्कम | रु. २,०७,१६,२००/- |
| मंजूर सुधारित एस्टीमेट क्र. १ | रु. २,५६,४०,८५०/- |
| मंजूर सुधारित एस्टीमेट क्र. २ | रु. २,९७,४०,३००/- |
| कार्यादेश क्रमांक | जा.नं.एसएसएस/वशी-बांधकाम/४७३८/०४ दिनांक ०६/०५/२००४ |
| काम पूर्ण करण्याची मूदत | पाच महिने ०८/१०/२००४ अखेर |
| कामाची सद्यस्थिती | डांबरीकरण काम पूर्ण. फूटपाथ स्लॅब व डिव्हायडरचे काम प्रगतीपथावर, पेव्हींग ब्लॉकचे काम बाकी. |
| झालेल्या कामाची रक्कम | रु. २,५२,३०,९३५/- (१२ वे रनिंग बिल ) |

मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १४९ दि. २७/१२/२००४ अन्वये रस्त्यांच्या कामासाठी होणा-या वाढीव खर्चासह एकूण अपेक्षित रू.२,९७,४०,३००/- मात्रचे सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर दि. ०४/०२/२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत शिर्डी शहराचे विकास आराखड्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे समवेत चर्चा करण्यात आली. त्याबाबत सदरहू सभेत संमत करण्यात आलेल्या निर्णय क्र. ६५ अन्वये सध्या चालू असलेल्या रस्त्यांच्या कामांची पाहणी करुन आवश्यक योग्य मार्गदर्शन संस्थानला देण्यात येईल असे रस्ते विकास महामंडळ यांचेतर्फे सांगण्यात आले. त्यानुसार रस्ते विकास महामंडळ यांचे तर्फे मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि. यांचे प्रतिनिधींनी नगर-मनमाड रस्ता व पिंपळवाडी रस्ता कामांची पाहणी केली.

रस्ते विकास महामंडळ यांनी दि. १७/०३/२००५ चे पत्रान्वये त्याबाबतचा अहवाल पाठविला. त्यानुसार रस्त्याचे धावपट्टीचे रुंदीत प्रस्तावित केलेल्या ६० मिमी. जाडीचे पेव्हींग ब्लॉक ऐवजी ८० मिमि जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे सुचविण्यात आलेले आहे.

रस्ते विकास महामंडळ यांचे सल्ल्यानुसार पिंपळवाडी रस्त्यासाठी धावपट्टीमध्ये ८० मिमी. जाडीचे M२५ पेव्हींग ब्लॉक बसविणेत आलेले आहेत.

नगर - मनमाड रस्त्यावर सदर ब्लॉक बसविणेचे काम अद्याप बाकी आहे. सदर पेव्हींग ब्लॉक्स बसविणेसाठी अपेक्षित खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| S.No | Item | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | P/F 80 mm thick interlocking c.c. paving blocks of M25 grade | 3300 | Sqm | 585/- | 19,30,500/- |

सदर बाब निविदेत समाविष्ठ नसल्यामुळे आर्किटेक्ट मे. निकम पा. यांनी पिंपळवाडी रस्त्याच्या कामासाठी प्रमाणित केलेल्या रु. ५८५/- प्रती चौ.मी. हा दर प्रमाणित केलेला आहे. या दराने येणारा एकूण अपेक्षित खर्च रुपये १९,३०,५००/- हा ६० मि.मी. जाडीचे M१० चे पेव्हर ब्लॉकचे तुलनेत रु. ३,९५,६०४/- ने जास्त आहे.

ब) नगर- मनमाड रस्त्याचे कामाबाबत श्री एम व्ही. पाटील (निवृत्त सचिव) सा.बां. विभाग यांचाही सल्ला घेण्यात आला होता. त्यांनी दि. ०२/१२/२००४ चे पत्रान्वये रस्त्याचे कामाबाबत मार्गदर्शनपर सूचना केल्या होत्या. त्यानुसार डिव्हायडर्स मध्ये प्रस्तावित केलेप्रमाणे फुलझाडे लावू नयेत. त्याऐवजी डिव्हायडर्स सिलबंद करण्यात यावेत कारण त्यामध्ये पाणी झिरपून रस्त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. फुलझाडे लावायची झाल्यास मोठ्या कुंड्यांमध्ये लावण्यात यावीत असे त्यांनी सुचविले आहे. मूळ निविदेनुसार डिव्हायडर्सचे काही भागात रफ शहाबाद टाईल्स व काही भागात फुलझाडे प्रस्तावित करणेत आली होती. तरी श्री. एम.व्ही. पाटील यांचे सूचनेनुसार संपूर्ण डिव्हायडर्ससाठी पाणी झिरपू नये म्हणून मूळ निविदेनुसार रफ शहाबाद टाईल्स बसविता येतील त्यासाठी अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| S.No | Item | Qnty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | P C C 1:3:6 | 174.00 | Cum | 1130.00 | 1,96,620/- |
| 02 | Rough Shahabad tiles | 2310.00 | Sqm | 154.00 | 3,55,740/- |
| | | | | Rs. | 5,52,360.00 |

Add 2% tender persentage Rs. 11047.00

**Total Amount Rs. 5,63,407.00**

रफ शहाबाद टाईल्स ऐवजी ६० मी.मी. जाडीचे पेव्हींग ब्लॉक्स बसवायचे झाल्यास त्यासाठी खालील प्रमाणे खर्च येईल.

| Sr.N | Item | Qnty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | P/F 60 mm thick M10 - paving blocks | 2310.0 | Sqm | 456.00 | 10,53,360.00 |
| | | | | Add 2% tender percentage | 21067.00 |
| | | | | Total - Rs | 10,74,427.00 |

अशाप्रकारे रफ शहाबाद ऐवजी पेव्हींग ब्लॉक्स बसविणेकामी रु. ५,११,०२०/- मात्र इतका जादा खर्च येईल . तरी यापैकी योग्य तो पर्याय निवडणे आवश्यक आहे.

तरी याबाबत खालील मुद्यांविषयी निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

अ) रस्त्याचे धावपट्टी मध्ये ६० मिमि. जाडीचे M१० पेव्हींग ब्लॉक ऐवजी ८० मि.मी. जाडीचे M२५ पेव्हींग ब्लॉक बसविणे व त्यासाठी येणा-या रु. १९,३०,५००/- मात्र इतक्या एकूण अपेक्षित खर्चापैकी रु. ३,९५,६०४/- मात्र इतके जादा येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर काम रु. ५८५/- प्रती चौ.मी. दराने रस्त्याचे ठेकेदार मे. न्यु महावीर कंन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

ब) रस्त्याचे मध्यभागी असलेल्या डिव्हायडर्ससाठी रफ शहाबाद टाईल्स (अपेक्षित खर्च रु. ५,६३,४०७) अथवा ६० मि.मी. जाडीचे M १० पेव्हींग ब्लॉक्स (अपेक्षित खर्च रु. १०,७४,४२७.००)

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तपैकी परिच्छेद 'अ' खालील प्रस्तावास मान्यता देणेत आली. रस्त्याचे मध्यभागी असलेल्या डिव्हायडर्समध्ये पूर्णपणे ब्लॉक /रफ शहाबाद फरशी बसवून सिलबंद करण्याऐवजी पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य त्या तरतूदी करुन फुलझाडे/लॅण्ड स्केपिंग/ सुशोभिकरण करण्यासाठी योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१४. सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.३४५.** श्री साईनाथ रुग्णालयासाठी नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या इमारतीमध्ये सुपर स्पेशालीटी सेवा सुरु करणेसाठी नवीन व जुन्या इमारतींमध्ये काही अंतर्गत फेरबदल करणे, दोन जादा लिफ्ट, कॅन्टीन, फार्मसी व टॉयलेट ब्लॉकसाठी नवीन बांधकाम करण्याचे ठरले होते. दिनांक ०८/०२/२००५ रोजी मुंबई येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेपुढे मे. नितीन बी. औताडे, पोहेगांव यांची निम्नतम दराची निविदा मान्य करण्यात येउन त्यांना निर्णय क्र.९२ अन्वये (जा.नं.२७५८ दि.१४/०३/२००५) कार्यादेश देणेत आलेला असून ठेकेदार यांनी कामास सुरुवात केलेली आहे.

मा.सदस्य डॉ.तिवारी यांनी दि. १३/०३/२००५ रोजी नवीन रुग्णालय इमारतींची पहाणी केली. त्यावेळी त्यांनी कॅन्टीन व फार्मसी या नियोजित तळमजला बांधकामावर दोन मजल्यांचे अधिक बांधकाम करुन त्यामध्ये डॉक्टरांसाठी निवासी खोल्यांची (Bachelor Accommodation) सोय करावी अशी सूचना केली आहे. त्यानुसार नियोजित पहिल्या व दुस-या मजल्यावर प्रत्येकी चार याप्रमाणे एकूण आठ डबल रुम्स (संलग्न टॉयलेटसह) तयार होतील. सदर कामासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार अपेक्षित अंदाजे खर्च रु.१३,५२,१२०/- मात्र इतक्या रकमेस व सदरहू बांधकाम सध्या वाढीव बांधकाम करीत असलेले ठेकेदार मे. नितीन बी. औताडे यांचेकडून करुन घेणेस मंजूरी मिळणेसाठीचा प्रस्ताव दि. १७/०५/२००५ चे सभेत विषय क्र. ६ अन्वये ठेवण्यात आला होता. त्यावर सभेमध्ये सविस्तर चर्चा होउन सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत आली होती. परंतू सभेच्या इतिवृत्तामध्ये मान्यतेचा उल्लेख आलेला नाही. सदर प्रस्तावावर खालील प्रमाणे निर्णय क्र. १४७ ची दप्तरी नोंद झालेली आहे.

" श्री साईनाथ रुग्णालयासाठी नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या इमारतीमध्ये सुपर स्पेशालिटी सेवा सुरु करणेसाठी नवीन व जुन्या इमारतींमध्ये काही अंतर्गत फेरबदल करणे, दोन जादा लिफ्ट, कॅन्टीन, फार्मसी व टॉयलेट ब्लॉकसाठी नवीन बांधकाम करण्याचे ठरले होते. याकामाचे प्लॅन व एस्टीमेट काबरे चौधरी आर्किटेक्ट, नाशिक यांचे मार्फत तयार करण्यात आले होते. दिनांक २९/०१/२००५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत वरील प्रमाणे वाढीव सुविधा निर्माण करणेकामी कमी मुदतीची निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. सदर

निर्णय क्रमांक ६१ अन्वये रुपये ६८,८६,६००/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय रकमेच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या दिनांक ०८/०२/२००५ रोजी मुंबई येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मे. नितीन बी. औताडे, पोहेगांव यांची निम्नत्तम दराची निविदा मान्य करण्यात येवून त्यांना निर्णय क्रमांक ९२ अन्वये (जा.क्र. २७५८ दि. १४/०३/२००५) कार्यादेश देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला त्यास मान्यता देण्यात आली "

आर्किटेक्ट मे. काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.१६/०५/२००५ चे पत्रान्वये उपरोक्त कामाचे तपशिलवार अंदाजपत्रक आता सादर केले असून त्यानुसार कॅन्टीन व फार्मसी इमारतीचे पहिला व दुसरा मजला बांधकामासाठी अंदाजे रु. १८,५५,४२९/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

यापुर्वी दि. १७/०४/२००५ रोजीचे सभेतील वर नमूद केलेल्या निर्णय क्र. १४७ मध्ये खर्चाचे मान्यतेविषयी उल्लेख आलेला नाही. त्यामुळे तपशिलवार अंदाजपत्रकानुसार अपेक्षित खर्चाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

तरी कॅन्टीन व फार्मसी इमारतीचे पहिला व दुसरा मजला बांधकामासाठी काबरे चौधरी आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या तपशिलवार एस्टिमेटनुसार अंदाजे रु. १८,५५,४२९/- मात्रचे अपेक्षित खर्चास तसेच ठेकेदार मे.नितीन बी औताडे यांचेकडून ४.५% कमी या मंजूर निविदा दराने बांधकाम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१५. समाधी मंदिर परिसरात कॅन्टीनचे दक्षिण बाजूस देणगी काऊंटर, पुस्तक विक्री व माहिती केंद्राकरीता फर्निचर तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४६.** समाधी मंदीर परिसरात कॅन्टीनचे दक्षिण बाजुस देणगी कांउन्टर, पुस्तक विक्री व माहिती केंद्राकरिता फर्निचर तयार करण्याची मे.एस.आर फॅब्रिकेटर्स, पुणे यांची निम्नतम दराची रु. १,०९,५८९/- ची निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि. २९/०१/२००५ चे सभेतील निर्णय क्र.१० अन्वये मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार ठेकेदार यांना जा.नं. एसएसएसटी/वशी-बांध/१९५१/०५ दि. २२/०५/२००५ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

कार्यादेश दिल्यानंतर ठेकेदार यांनी वेळोवेळी काहीतरी कारणे सांगून काम सुरू केले नाही. त्यामुळे त्यांना जा.नं. एसएसएसटी/वशी-बांधकाम/५६११/०५ दि. ३०/०५/२००५ अन्वये काम सुरु न केल्यामुळे व विलंबाबाबत दंड आकारणी बाबत पत्र दिले. त्यानंतर ठेकेदार यांनी आज - उद्या काम सुरु करतो असे सांगितले. तसेच वारंवार दूरध्वनीवर विनंती करुनही ठेकेदार यांनी काम सुरु केले नाही. यावरुन ठेकेदार यांची काम करण्याची इच्छा दिसून येत नाही. त्यामुळे ठेकेदार यांची निविदे सोबत भरलेली अनामत रक्कम रुपये ९०० जप्त करुन  या कामाकरिता नव्याने निविदा मागविणेत याव्यात असे मत आहे. कॅन्टीनचे दक्षिण बाजूस तीन गाळ्यांमध्ये देणगी कांउन्टर, पुस्तक विक्री व माहिती केंद्र करण्याचे प्रस्तावित आहे. देणगी कांउन्टर मध्ये देणगीदार साईभक्तांना सुलभपणे उभे राहाणे / बसता यावे याकरिता पुरेशी जागा नाही . त्यासाठी बुक स्टॉलचीही जागा देणगी काउन्टरकरीता वापरता येईल व बुकस्टॉल नवीन साईनाथ छाया इमारतीचे गाळ्यामध्ये करता येईल. याप्रमाणे नियोजित कामासाठी सुधारित आराखडा व एस्टीमेट तयार करुन त्यानुसार निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१६. माहे जुलै- २००५ साठी प्रसादालय किराणा माल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३४७.** सन २००५-२००६ मध्ये किराणा माल खरेदीकामी निविदा मागविण्यात येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०४.२००५ चे सभेत निविदाधारकांनी निवीदेसोबत सादर केलेल्या मालाचे स्विकारार्ह नमूने निवडणे वेळेअभावी शक्य न झाल्याने माहे मे-जून २००५ या दोन महिन्यांसाठी आवश्यक किराणा व इतर माल पूर्वीचेच (सन २००४-२००५ चे)  मान्य दराने खरेदी करणेस मान्यता मिळालेली असल्याने पुरवठादारांना पूर्वीचेच दराने माल पुरविणेबाबतची विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांनी विनंती मान्य करुन मे व जूनमध्ये मालाचा पुरवठा केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८.०५.२००५ मध्ये स्विकारार्ह मालाचे नमूने निवडून बाजूला ठेवणेत आलेले आहेत. संबंधित निविदाधारकांना दिनांक ०९.०७.२००५ चे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आलेले होते. संबधितांशी चर्चा होऊन पुरवठा आदेश देऊन माल पुरवठा होईपर्यन्त अंदाजे १०-१५ दिवसांचा कालावधी लागेल. त्यामुळे जूलै २००५ साठी माल खरेदी करणे आवश्यक असल्याने पुर्वीचेच पुरवठादारांकडे मागणी करुन पुर्वीचेच मान्य दराने खरेदी करण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- खरेदी अधिकारी)

**विषय नं.१७.** **सर्व्हे नं.१२४ मध्ये उभारण्यात येणाऱ्या गोडाऊनला वीजपुरवठा करणेकामी केबल खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४८.** साईनगरच्या जवळ स. नं.१२४ मध्ये उभारण्यात येणा-या सेंट्रल गोडाऊनचे ऊभारणीचे काम प्रगतीपथावर असून या गोडाऊन व परिसराला वीजपुरवठा करण्यासाठी खालीलप्रमाणे केबल वगैरे मटेरीअल लागणार आहे. हा वीजपुरवठा साईनगर परिसरातील सबस्टेशन - जनरेटररूममधून करण्यात येईल. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | पॉलीकॅब / अॅव्होकॅब / फिनोलेक्स मेक आर्मरड् अॅल्युमिनीअम कंडक्टर केबल साईज - ३.५ X ५० स्क्वे एमएम ग्रेड - ६६० / ११०० व्होल्ट आय.एस.आय अॅप्रुव्हड | ५५० मीटर | ०१५०.०० | ८२,५००.०० |
| ०२) | एचपीएल सोकोमेक मेक एनर्जी मीटर टाईप - PPEMOI(PB) क्षमता:-५०-१०० अॅम्प सी.टी.ऑपरेटेड विथ बॉक्स | ०००१ नग | ६०००.०० | ०६,०००.०० |
| ०३) | ह्युम पाईप कॉलरसह | २०० मीटर | ०११०.०० | २२,०००.०० |
| ०४) | नाली खोदाई, भराई व इतर खर्च | ५०० मीटर | ००४०.०० | २०,०००.०० |
| | | | एकुण खर्च | ०१,३०,५००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व्हे नं.१२४ मध्ये उभारण्यात येणाऱ्या गोडाऊनला वीजपुरवठा करणेकामी केबल नामांकित कंपन्यांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,३०,५००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.१८.** **श्री समाधी मंदीरात नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये फ्लोअरस्टॅडींग टॉवर टाईप एअर कंडीशनर बसविणे.**

**निर्णय क्र.३४९.** श्री समाधी मंदिरात " श्रीं " चे दर्शनाला येणा-या व आरतीकरिता उभे राहणाऱ्या भक्तांना नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये "सफोकेशन" जाणवते. भक्तांची गर्दी, त्यांचे श्वासोच्छवास, बाहेरील तापमान यामुळे हॉलमधील तापमानात आणखी वाढ होते. भक्तांना गुदमरणे, श्वासाला त्रास होणे, चक्कर येणे, उलटी होणे हे प्रकार होऊ लागतात. हे प्रकार टाळण्यासाठी या हॉलमधून थंड हवा खेळती राहावी म्हणून फ्लोअरस्टॅडींग टॉवर टाईप एअरकंडीशनर बसविणे गरजेचे असल्याने एअरकंडीशनर बनविणाऱ्या संबंधित कंपन्यांच्या इंजिनिअर्सकडून समक्ष पाहणी करून घेऊन त्यानुसार एअरकंडीशनरची संख्या, टाईप व जागा निश्चित करून नंतर त्यांचेकडून कोटेशन्स मागविणेसाठी मे.व्होल्टास लि., मुंबई व मे.ब्लू स्टार लि, मुंबई यांचे कडे लेखी संपर्क साधला होता.

मे.ब्लू स्टार, मुंबई यांचे मार्फत त्यांचे अधिकृत डिलर मे.गारवा एन्टरप्राईझेस, नासिक यांनी समक्ष पाहणी करून दिनांक १९.०५.२००५ चे पत्रानुसार अहवाल पाठविला आहे. त्यांनी उपरोक्त हॉलसाठी ४.५ टन क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे ०३ नग - एकुण १३.५ टन (४.५ टन X ०३ नग ) क्षमतेचे एअर कंडीशनिंग युनिट लागेल व या युनिटसचा डक्टींगसह खर्च मिळून रु. ०२,६६,८१५.०० कळविला आहे.

नियमानुसार तीन कोटेशन तुलनात्मक दरासाठी घेणे आवश्यक असल्याने इतर दोन उत्पादकांची कोटेशन्स बोलावून आलेल्या कोटेशन्सवर निर्णय घेऊन कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.१९.** **श्रीसाई समाधी मंदिरातील बाबांनी हाताळलेल्या वस्तूंचे संग्रहालयात नवीन ए.सी. बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३५०.** श्री साई समाधी मंदिरातील बाबांनी हाताळलेल्या वस्तूंच्या संग्रहालयात सद्गुरू परब्रम्ह श्री साईंच्या पादुका ठेवलेल्या असून त्याठिकाणी विंडो टाईप ए.सी.बसविण्यात आलेला आहे. सदर ए.सी. हा देणगी मिळालेला असून अॅसेंबल्ड आहे. हा ए.सी. १० ते १२ वर्षा पूर्वीचा असून ब-याच वेळा दुरूस्त केलेला आहे.

हा ए.सी. सर्व्हिसेबल राहिलेला नाही. तेव्हां आता श्री साई समाधी मंदिरातील बाबांनी हाताळलेल्या वस्तूंच्या संग्रहालयात असलेल्या अमूल्य व पवित्र वस्तूंच्या संरक्षणासाठी नवीन १.५ टनी विंडो टाईप ए.सी. बसविणे गरजेचे आहे. त्यासाठी तो खालीलप्रमाणे खरेदी करावा लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | व्होल्टास / ब्लु स्टार / सॅमसंग विंडो एअरकंडीशनर - १.५ टन | ०१ नग | ३०,०००.०० | ३०,०००.०० |
| | | | अंदाजे एकुण रक्कम रुपये- | ३०,०००.०० |

असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्यतेसाठी सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तप्रमाणे ए.सी. कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रू.३०,०००.०० चे खर्चास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-विद्यूत् विभाग प्रमुख/अधिक्षक-मंदीर विभाग)

**विषय नं.२०. सुरक्षा तपासणीसाठी स्कॅनर मशिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५१.** दिनांक १४.०५.२००५ रोजी मा.श्री.विश्वासराव नांगरे, जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर व मा. श्री.महाजन,सी.आय.डी.,असि.कमिशनर, अहमदनगर यांनी श्रींचे समाधी मंदिर व परिसराचे सुरक्षिततेबाबत पाहणी केली आहे.

साईभक्तांचे तपासणीसाठी त्वरीत स्कॅनर मशिन खरेदी करणेबाबत मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी सूचना केली आहे.स्कॅनर मशिनमुळे साईभक्तांची त्वरीत तपासणी होऊन मोठी दर्शनरांग लागणार नाही. अनावश्यक वस्तू मशिनमुळे ताबडतोब डिटेक्ट होऊ शकतील असे त्यांनी सुचविले आहे.

नाशिक येथील रिलायन्स इलेक्ट्रॉनिक कं.कडे दूरध्वनी वरुन संपर्क साधला असता त्यांनी खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ) | भारतीय बनावटीचे साधे स्कॅनर मशिन खरेदीसाठी प्रति मशिनकरीता अपेक्षीत खर्च | रुपये ६,५०,०००/- |
| ब) | परदेशी बनावटीचे उत्कृष्ठ दर्जाचे मध्यम मॉडेलचे स्कॅनर मशिनसाठी प्रति मशिनकरीता अपेक्षीत खर्च | रुपये १५,००,०००/- |
| क) | परदेशी बनावटीचे उत्कृष्ठ दर्जाचे मोठया मॉडेलचे मशिन खरेदीसाठी प्रति मशिनकरीता अपेक्षीत खर्च | रुपये २५,००,०००/- |

समाधी मंदिर, परिसर व साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी खालील ठिकाणी स्कॅनर मशिन्स बसविणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| | |
|---|---|
| ०१. | शांतिनिवास प्रवेशव्दार |
| ०२. | गुरुस्थान गेट |
| ०३. | व्ही.आय.पी.गेट प्रवेशव्दार |
| ०४. | शनिमंदीर गेट |
| ०५. | नविन भक्तनिवासस्थान |
| ०६. | दक्षिणापेटी मोजणी हॉल |

यावर सविस्तर चर्चा होऊन, भारतीय बनावटीचे दोन साधे स्कॅनर मशिन निविदा मागणी करुन खरेदी करण्यास व योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख/अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.२१. सुरक्षा तपासणीसाठी मेटल डिटेक्टर्स खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५२.** दिनांक २.१२.२००२ रोजी देणगी मिळालेले व दि.४.१२.२००२ रोजी खरेदी केलेले डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर व हँड हेल्ड मेटल डिटेक्टर श्रीं चे समाधी मंदिर, परिसर व साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी खालील ठिकाणी बसविण्यात आले असून ते सध्या वापरण्यात येत आहेत.

**डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर**

| | | |
|---|---|---|
| ०१. | गुरुस्थान गेट | ०१ नग |
| ०२. | अभिषेक गेट | ०१ नग |
| ०३. | व्ही.आय.पी.गेट | ०१ नग |
| ०४. | शनि मंदिर गेट | ०१ नग |
| ०५. | शांतिनिवास प्रवेशव्दार | ०१ नग |
| ०६. | नवीन भक्तनिवास प्रवेशव्दार | ०१ नग |

**मंदिर व परिसरातील विविध प्रवेशव्दारांवर सुरक्षा रक्षकांकडे सध्या वापरात असलेले हँड हेल्ड मेटल डिटेक्टर** -१० नग.

वरीलप्रमाणे कार्यरत असलेले धातू शोधक यंत्र (मेटल डिटेक्टर) अत्यंत कमी पडत असून त्यामुळे दर्शन रांगेतील भक्तांचे तपासणी कामी उशीर होतो व दर्शन रांग वाढत जाते त्यामुळे साईभक्तांनाही त्रास सहन करावा लागत आहे.संरक्षणाचे दृष्टीने सदरची तपासणी यंत्रणा अत्यंत कमी पडत आहे.त्यामुळे आणखी खालील तपशीलाप्रमाणे धातू शोधक मशिनरी खरेदी करणे आवश्यक आहे.

**अ) <u>डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | समाधी मंदिर व परिसर | १० नग |
| ०२. | अतिथीगृह | ०२ नग |
| ०३. | प्रसादालय परिसर | ०४ नग |
| ०४. | चौकशी कार्यालय | ०१ नग |
| | एकुण- | १७ नग. |

**ब) <u>हँड हेल्ड मेटल डिटेक्टर</u> -** ५० नग.

वरीलप्रमाणे एकुण १७ नग डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर खरेदीसाठी अपेक्षीत खर्च रुपये ४,७६,०००/- व हँड हेल्ड मेटल डिटेक्टर ५० नग खरेदीसाठी अपेक्षित खर्च रुपये १,२५,०००/- असा एकूण रुपये ६,०१,०००/-(रुपये सहा लाख,एक हजार मात्र) खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आवश्यक असणारे डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर १७ नग व हँड हेल्ड मेटल डिटेक्टर ५० नग सध्या खरेदी करण्यात यावे असे ठरले त्याचप्रमाणे याकामी दरपत्रके मागवून येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही - संरक्षण विभागप्रमुख/खरेदी अधिकारी)

**विषय नं.२२. प्रसादालय लाडू प्रसाद मजूरी दराबाबत.**

**निर्णय क्र.३५३.** दि.१३/३/२००५ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१२३ (अ) नुसार श्री माधव गंगाराम - नाईकवाडी रा.अंदरसूल यांना मोतीचूर लाडू बनविण्याचा प्रति हजारी रु.११०/- मजूरी दर मंजूर करण्यात आलेला आहे. पुर्वीपासून प्रत्येक लाडू ५० ग्रॅम वजनाचा बनवित आलेलो आहोत. त्यामुळे प्रति नग ५० ग्रॅम वजनाचे १ हजार नग लाडूस मजूरी दराबाबत टेंडरमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३/५/२००५ मध्ये मोतीचूर लाडू ५० ग्रॅम ऐवजी ७५ ग्रॅमचा बनविणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु केलेली आहे. मात्र उपरोक्त प्रमाणे प्रति लाडूचे वजन २५ ग्रॅमने वाढल्यामुळे लाडूची संख्या कमी झालेली आहे व त्यामुळे ठेकेदार यांना मजूरीची रक्कम कमी मिळणार असल्यामुळे लाडू ठेकेदार यांनी दि.३०/५/२००५ रोजी मजूरी दरात वाढ मिळणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. लाडू ठेकेदार यांनी विनंती अर्जात नमूद केलेली वस्तूस्थिती खरी आहे.

<u>साधारणतः १ क्विंटल साखरेच्या लाडूचा मजूरीचा तपशील खालीलप्रमाणे</u> ः

-- पूर्वीचे ५० ग्रॅम वजनाप्रमाणे सुमारे ४५०० नग तयार होतात.
-- आताचे ७५ ग्रॅम वजनाप्रमाणे सुमारे ३००० नग तयार होतात.
-- पूर्वीचे ४५०० नगास रु.११०/- (प्रति हजारी) प्रमाणे ४९५/- मजूरी होते.
-- आताचे ३००० नगास रु.११०/- (प्रति हजारी) प्रमाणे पूर्वीचा दर दिल्यास ३३०/- मजूरी होते.

कमी मिळणारी रक्कम रु. १६५/-

साधारणतः १ क्विंटलचे लाडू मागे रु.१६५/- मजूरी कमी होते. वर्षभरात सुमारे ५२६१ क्विंटलचे लाडू तयार केले जातात. त्यानुसार ५२६१ क्विंटलचे लाडू मागे (५२६१ x १६५/- = ८,६८,०६५/-) रु.८,६८,०६५/- मजूरीची रक्कम कमी होते.

लाडू वजनाचे तुलनेत पूर्वीचा दर रु.११०/- ऐवजी रु.१६५/- दर हजारी करावा लागणार आहे. याप्रमाणे दर वाढविल्यास संस्थानची पूर्वीचे दराने होणारी रक्कम व नवीन दराने होणारी रक्कम यात वाढ होणार नाही.

<u>उदा</u> :-

| एकुण साखर क्विंटल | प्रति क्विंटलचे ५० ग्रॅम प्रमाणे होणारे ४५०० नग लाडू प्रमाणे होणारी एकुण संख्या | पूर्वीचे दराने होणारी रक्कम |
|---|---|---|
| ५२६१ | २,३६,४७,५०० नग x ११०/- प्रति | २६,०४,१९५/- |

| | | |
|---|---|---|
| | क्विंटलचे ७५ ग्रॅम प्रमाणे होणारे ३००० नगा प्रमाणे | |
| ५२६१ | १,५७,८३,००० नग x १६५/- | २६,०४,१९५/- |

उपरोक्त प्रमाणे रु.१६५/- (प्रति हजारी, ७५ ग्रॅम लाडूसाठी) दरवाढ केल्याने संस्थानचे खर्चात वाढ होणारी नसून ठेकेदार यांचे मजूरीत घट होत असल्याने रु.११०/- ऐवजी रु.१६५/- प्रति हजारी लाडूस दर वाढवून देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.०५.२००५ चे सभेतील निर्णय क्र. २११ नुसार देण्यात येत असलेले प्रत्येकी ७५ ग्रॅम वजनाच्या दोन लाडू ऐवजी पूर्वीप्रमाणेच प्रत्येकी ५० ग्रॅम वजनाचे तीन प्रसादलाडू रुपये १०/- प्रती पाकिटास या दराने भक्तांना विक्री करण्यात यावी, तसेच ७५ ग्रॅम वजनाचे लाडू तयार करण्याचे फरकाची प्रस्तावित केलेल्या दराने रक्कम श्री माधव गंगाराम नाईकवाडी रा.अंदरसूल यांना अदा करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक प्रसादालय)

**विषय नं.२३. प्रायोगिक तत्वावर नगरसूल रेल्वेस्टेशन ते शिरडी संस्थान बस चालू करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५४.** आंध्र प्रदेशातून श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी रेल्वेने प्रवास करुन येणाऱ्या साईभक्तांचे सुख-सुविधांकरिता नगरसूल रेल्वेस्टेशन ते शिर्डी श्रीसाईभक्त घेऊन येणेकरिता दोन बसेस प्रायोगिक तत्वावर (ना नफा ना तोटा) अल्पदरात सुरु कराव्यात असे दिनांक १७.०४.२००५ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१५९ अनुसार ठरले आहे. सदर निर्णयानुसार उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपूर कार्यालय यांचेकडे वेळोवेळी बस सुरु करणेबाबत परमिट मिळणेकामी प्रत्यक्ष भेटी देवून पाठपुरावा केला होता. त्यानुसार सदर कार्यालयाकडून दिनांक ४.०७.२००५ चे पत्र प्राप्त झाले असून, सदर मार्गावर संस्थानच्या दोन बस सुरु करण्यासाठी खालील अटीवर परवाने मंजूर करणेत येत आहे असे कळविले आहे.

(०१) शिर्डी ते नगरसूल व नगरसूल ते शिर्डी या मार्गासाठी कॉन्ट्रॅक्ट कॅरेज धर्मार्थ (Charity Basis) या प्रयोजनासाठी परवाना मंजूर करण्यात येत आहे. मोबदला कमवणेची अपेक्षा नाही, कारण आपण या परवान्याचे प्रयोजन धर्मार्थ असे दिलेले आहे.

(०२) कर प्रती प्रवासी रक्कम रुपये ४००/- प्रती वर्षासाठी भरावा लागणार आहे.

(०३) पब्लिक सर्व्हिस व्हिकल या सदरात संस्थानचे संबंधित येणारे भक्त व कामगार यांच्या संस्थान प्रती आवश्यक कार्यासाठी हे परमिट लागू राहील. वरील अटी मान्य झाल्यास आपल्या संस्थेच्या बसेस नोंदणी कराव्यात.

वरील अटीनुसार संस्थानला बस चालविणेची झाल्यास खालील प्रमाणे खर्च येईल. सदरचा खर्च टॅक्स, विमा, घसारा, वाहन चालक व मदतनीस यांचा पगार इ.खर्च प्रत्यक्ष विचारात घेवून काढण्यात आलेला आहे.

शिर्डी ते नगरसूल हे अंतर ४५ कि.मी. असून सदर मार्गावर संस्थानच्या दोन बसेस चालविता येतील.

(०१) गाडी नं.एमएच-१७-के-९३७ :- २x३ आसन क्षमता ५७+१

| अ.नं. | प्रती दिन अचल खर्च | रक्कम रुपये | अ.नं. | प्रती दिन चल खर्च | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | टॅक्स | ७८१.०० | ०१. | इंधन खर्च (२ ट्रिपसाठी) | १,४१०.०० |
| ०२. | विमा | ८१.०० | ०२. | वाहन चालक पगार | २४०.०० |
| ०३. | घसारा | ६२६.०० | ०३. | वाहक मदतनीस पगार | १६०.०० |
| | एकूण- | १,४८८.०० | | एकूण- | १,८१०.०० |

प्रती दिन दोन ट्रिपसाठी येणारा चल व अचल एकूण खर्च-
(१,४८८.००+१,८१०.००) रुपये ३,२९८.००

(०२) गाडी नं.एमएच-१७-अे-७५९५ :- २x२ आसन क्षमता ३७+१

| अ.नं. | प्रती दिन अचल खर्च | रक्कम रुपये | अ.नं. | प्रती दिन चल खर्च | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | टॅक्स | ५०६.०० | ०१. | इंधन खर्च (२ ट्रिपसाठी) | १,४१०.०० |
| ०२. | विमा | ३२.०० | ०२. | वाहन चालक प गार | २४०.०० |
| ०३. | घसारा | ३५४.०० | ०३. | वाहक मदतनीस पगार | १६०.०० |
| | एकूण- | ८९२.०० | | एकूण- | १,८१०.०० |

प्रति दिन दोन ट्रिपसाठी येणारा चल व अचल एकूण खर्च रुपये २,७०२.००

अ) संस्थानने सध्या उपरोक्त दोनही बसेसचा पथकर भरलेला आहे. परंतू सदर मार्गावर बसेस चालू करावयाची झाल्यास परवाना अटींनुसार खालीलप्रमाणे प्रवासी कर भरावा लागेल.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | गाडी नं.एमएच-१७/के/९३७१-२X३ आसन क्षमता ५७ X४,००० | २,२८,०००.०० |
| ०२. | गाडी नं.एमएच-१७/अे/७५९५-२X२ आसन क्षमता ३७ X४,००० | १,४८,०००.०० |
| | भरावा लागणारा एकूण प्रवासी कर | ३,७६,०००.०० |

ब) वरीलप्रमाणे प्रति दिन दोनही बसेससाठी येणारा एकूण खर्च (प्रत्येकी दोन ट्रिप) रुपये ६,०००.००

सदरचा खर्च हा दोन बसेससाठी असल्याने दोनही बसमधून येणाऱ्या प्रवाशांची संख्या १८८ इतकी होईल. प्रत्येक बससाठी दोन ट्रिप होतील म्हणजेच रुपये ६००० ÷ १८८ = रुपये ३१.९१ प्रति प्रवासी खर्च येईल. परंतू एस.टी. बसचे भाडे प्रति सिट रुपये २७.०० असे आहे. परंतू; परिवहन कार्यालयाचे परवाना अटींचे पालन करुन एस.टी. बसचे प्रचलित दरात १०% सूट देऊन रुपये २५.०० प्रती सीट सेवा आकार घ्यावा लागेल.

तरी दोन बसेससाठी लागणारा प्रवासी कर रुपये ३,७६,०००.०० भरणेस व व प्रति प्रवासी रुपये २५.०० इतका सेवा आकार घेऊन बससेवा चालू करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.२४. स्कूल बस नं.एमएच-१७-ए-७५९४ चे इंजिन ओव्हर ऑल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५५.** वाहन विभागात वापरात असलेली बस नं. एमएच-१७ ए- ७५९४ चा वापर इंग्लिश मिडीयम स्कूलची मुले तसेच अवश्यकता भासल्यास श्रीसाईभक्तांना मंदीर परिसरात ने-आण करणेकरिता होत आहे.

सदर बस सन-१९९२ साली खरेदी केलेली आहे. आजपावेतो १३ वर्षांत १,७५,००० कि.मी. इतकी सेवा आपणास दिलेली आहे. तसेच आजपावेतो गाडीच्या इंजिनचे काम निघालेले नाही.

दिनांक २७.०६.२००५ रोजी इंजिनमध्ये पिस्टनचा आवाज येऊ लागल्याने इंजिन डिसमेंटलिंग केले असता एक नंबरचा पिस्टन रिंग ग्रुव्हमध्ये रिंगासह तुटलेला दिसला. त्यामुळे सर्व इंजिन खोलले असता पुढीलप्रमाणे स्पेअर पार्टस् खराब झाल्याचे आढळले असून ते बदलणे आवश्यक आहे. (१) मेन बेअरिंग (२) कनेक्टिंग बुश (३) कॅम शाफ्ट (४) पिस्टन, पिस्टन रिंगा (५) क्लच प्लेट (६) प्रेशर प्लेट (७) सिलेंडर हेडव्हाल्व इ. सदर स्पेअर्स अधिकृत डिलर कडून खरेदी करावे लागतील याकामी अंदाजे रुपये ३० हजार पर्यंत खर्च , तसेच वर्कशॉप कामाकरिता (क्रॅंक कटिंग, ब्लॉक , सिलेंडर रिबोअर, कनेक्टींग रॉड बुश मारणे, सिलेंडर हेड, व्हॉल्व रिंग नवीन टाकणे व्हॉल्व सीट घेणे इ.) अंदाजे रुपये १० हजार पर्यंत असा एकूण ४० हजार खर्च अपेक्षित आहे.

वरीलपैकी वर्कशॉपचा खर्च अंदाजे रुपये १० हजार मात्र रोखीने आदा करावा लागेल, त्याकामी ॲडव्हान्स घेऊन खर्च करता येईल व स्पेअर्स अधिकृत डिलर कडून क्रेडीटवर खरेदी करता येतील. तसेच वरीलप्रमाणे इंजिन फिटींगचे काम आपले वाहन विभागातील मेकॅनिक करणार आहेत.

तरी वरीलप्रमाणे बस नं. एमएच-१७ ए- ७५९४ चे दुरुस्तीकामी येणारे अंदाजे रुपये ४०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.२५. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र ऑगस्ट २००५ मधील प्रशिक्षणार्थी प्रवेशाबाबत.**

**निर्णय क्र.३५६.** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट २००५ चे सत्रापासून सुरू होणारे शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जून २००५ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पूर्वतयारी करणेसाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. विश्वस्तव्यवस्था यांचेकडून होणे आवश्यक आहे. मागील वर्षी मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक -२९/३०-५-२००४ रोजी झालेल्या सभेत विषय नं. ५५ निर्णय क्रमांक २६३ अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समिती यांचे निर्णयानुसार व शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दतीप्रमाणे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात येते. श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसायनिहाय जागांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | सुपर न्युमररी जागा | शिर्डी व शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टुल ॲण्ड डायमेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्ष | १६ | ०३ | १५ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्ष | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ३ | मशिनिष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्ष | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्ष | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्ष | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्ष | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्ष | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्ष | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | २२ | ०६ |
| १० | ट्रॅक्टर मेकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | ३० | ०८ |
| ऑगष्ट २००५ या सत्रामध्ये भरावयाच्या जागा | | | | १७६ | ३२ | १६४ | ४४ |

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वरील १० व्यवसायांचे प्रशिक्षणासाठी उमेदवारांना प्रवेश देण्यात येतो. सदरचे सर्व व्यवसायांसाठी शासनाची मान्यता मिळालेली आहे.

वरील तक्त्यात दर्शविलेल्या सुपरन्युमररीच्या अतिरीक्त जागा भरणेसाठी मागील दोन वर्षात प्रशिक्षण सोडून गेलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रमाणास अनुसरून शासनाकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाकडून मंजूरी मिळाले नंतर या अतिरीक्त जागा भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते. या जागा भरण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळेलच असे नाही.

प्रशिक्षणार्थ्यांचे प्रवेशासाठी वयोमर्यादेबाबत संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडील क्रमांक -२०सीटीएस/२००२ /६४२ दि.०८/१२/२००३ व शासन निर्णय क्र. आयटीआय १००४/१/व्यशि-२ दि.१७/०२/२००५ नुसार खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

१. सर्व साधारण उमेदवारांकरिता वयाची अट १४ ते ४० वर्ष

२. मागासवर्गीय / ओबीसीकरीता कमाल वयाची अट २८ वर्ष

३. माजी सैनिकांकरिता वयाची अट ४५ वर्ष

४. प्रकल्प ग्रस्तांकरिता वयाची अट ३६ वर्ष

५. अपंग व्यक्ती (स्त्री,पुरूष) तसेच विधवा, घटस्फोटीत महिलांसाठी कमाल वयाची अट ३५वर्ष

६. या व्यतिरीक्त महिलांसाठी स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था व सर्वसाधारण संस्थेत महिलांसाठी खास सुरू केलेल्या व्यवसायामध्ये कमाल वयाची अट लागू राहणार नाही. तथापि; सर्व साधारण औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून महिलांकरीता प्रवेशाची अट मुलांप्रमाणेच राहील.

सदर आदेश ऑगष्ट-२००५ च्या सत्रापासून लागू करण्यात यावेत.

तसेच मा. व्यवस्थापन मंडळाने संमत केलेल्या निर्णयानुसार शिर्डी व शिर्डीसह १५ कि.मी. त्रिज्येतील गावांमधील विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध जागांपैकी ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत २० % जागा या परिसरा बाहेरील विद्यार्थ्यांसाठी ठेवून प्रवेश देण्यात येतो. शिर्डीसह शिर्डीपासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गावातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा.

संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांसाठी विशेष बाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्यांना मिळालेल्या गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते मात्र ही सवलत, मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखादे कर्मचा-यास त्याचे सेवाकाळामध्ये एकदाच मिळते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मा.व्यवस्थापन समिती यांचे निर्णयानुसार व शासनाने केलेल्या सर्व नियमावलीनुसार प्रवेश पध्दती अवलंबविण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तीकेत सर्व बदल करण्यात येतो.

सत्र २००२ पासून शासनाने प्रवेश प्रक्रियेत खालीलप्रमाणे बदल केलेले आहेत व त्यास मा. व्यवस्थापन मंडळाकडून मान्यता मिळालेली आहे.

१. अपंग उमेदवारांसाठी ३ % आरक्षण.

२. ट्रॅक्टर मेकॅनिक या व्यवसायासाठी किमान शैक्षणिक अर्हता इयत्ता ८ वी उत्तीर्ण.

३. वेल्डर या व्यवसायासाठी किमान शैक्षणिक अर्हता इयत्ता ८ वी उत्तीर्ण.

४. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स या व्यवसायासाठी इयत्ता १० वी शास्त्र विषयासह उत्तीर्ण.

५. महिलांसाठी व्यवसाय निहाय २५ % आरक्षण.

६. तांत्रिक विषयासह परीक्षा पास उमेदवारांना व्यवसाय निहाय २५ % आरक्षण
७. निवडपत्र व संधीपत्र पाठविण्यात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकृतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते व गुणवत्ता यादीनुसार उमेदवारांना आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येतो.
८. उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात येते.

प्रत्येक उमेदवारास प्रत्येक वर्षाकरीता शैक्षणिक शुल्क रू. १५००/- व अनामत रक्कम रू. ३००/- एवढे आकारण्यात येते.

तसेच प्रवेशासाठी द्यावयाचे माहिती पुस्तक व प्रवेश अर्जाची किंमत पुर्वी रू. ५.०० होती व पोष्टाने प्रवेश अर्ज माहिती पुस्तक पाठविल्यास त्याची किंमत रू. १०.०० होती.

चालू शैक्षणिक वर्षात माहिती पुस्तक व प्रवेश अर्ज चांगल्या दर्जाचे छपाई करणेस व त्याची किंमत रू. १०.०० व पोष्टाने रू. २०.०० ठेवणेस मा. अध्यक्ष महोदय यांनी मान्यता दिलेली आहे व त्यानुसार कार्यवाही सुरू करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावीत केल्याप्रमाणे सन २००५ या सत्राची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी तसेच यापुढे चालू सत्रात शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तिका व प्रवेश अर्जामध्ये त्याप्रमाणे उचित बदल करण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-प्र.प्राचार्य,आयटीआय)

**विषय नं.२६. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र ऑगस्ट, २००५ ते जूलै,२००६ साठी प्रशिक्षणार्थी डांगरी खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५७.** श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरवर्षी संस्थेमार्फत डांगरी तसेच मुलींसाठी ॲप्रॅान देण्यात येतात. औ.प्र.केंद्रात एकुण १० व्यवसायाच्या प्रत्येकी दोन तुकडयांप्रमाणे एकुण वीस तुकडया आहेत. प्रत्येक व्यवसायात अनुक्रमे १२ व १६ प्रशिक्षणार्थी प्रवेशासंबंधी मंजूरी देण्यात आलेली असून वाढीव जागा भरणेसाठी अनुक्रमे २ व ३ प्रशिक्षणार्थी संख्या गृहीत धरुन डांगरी/ॲप्रॅान खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात एकूण ३५० प्रशिक्षणार्थ्यांत २५ टक्के महिला आरक्षणानुसार ८७ मुली होतात परंतु , प्रत्यक्षात दरवर्षी सरासरी ३२ पर्यंत मुली प्रवेश घेतात. त्यामुळे ८७ ऐवजी ३२ ॲप्रॅान खरेदी करणे आवश्यक आहेत.

उपरोक्तकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.क | डांगरी/ॲप्रॅान तपशिल | साईज | आवश्यकता | उपलब्ध | खरेदी आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुलांसाठी डांगरी निळे ड्रिल कापड | ४४ इंच<br>४२ इंच | २१८ नग<br>१०० नग | ३० नग | १८८ नग<br>१०० नग | रु.१२५/-<br>रु.१२०/- | रु.२३,५००.००<br>रु.१२,०००.०० |
| ०२ | मुलींसाठी ॲप्रॅान निळे ड्रिल कापड | जनरल | ३२ नग | १५ नग | १७ नग | रु.१००/- | रु. १,७००.०० |
| | | | | | | एकुण.... | रु.३७,२००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी कोटेशन्स मागवून आवश्यकतेनुसार डांगरी/ॲप्रॅान खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३७,२००/- चे खर्चास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- प्र.प्राचार्य आयटीआय/खरेदी अधिकारी)

**विषय नं.२७. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे लॅबसाठी दोन ए.सी. खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.३५८.** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,नाशिक व एम.एस.सी.आय.टी. हे संगणकाचे कोर्सेस चालू आहेत. सदरील कोर्सेसला साधारणत: २०० प्रशिक्षणार्थी व औ.प्र.केंद्राचे जवळपास ३०० प्रशिक्षणार्थी संगणकाचे प्रशिक्षण घेत आहेत.एका तासाला तेथे २० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत असतात.

सदरील प्रशिक्षण हे एका क्लासरुममध्ये संगणक बसवून क्लासरुमच्या खिडक्या बंद करुन त्या रुममध्ये दोन जुने एअर कंडीशनर्स बसविण्यात आलेले होते. सदरील एअरकंडीशनर्स पुर्वीचे संगणक विभागाकडून घेणेत आले होते व ते बरेच वेळा दुरुस्त करुन चालविले आहेत सदरील एअर कंडीशनर जुने असल्याने ते आता दुरुस्त होत नाहीत.

औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील संगणक क्लासरुमचे वरील ए.सी.बंद असल्याने रुममध्ये अत्यंत गरम होते व उष्णता निर्माण होते त्यामुळे तेथे बसविण्यात आलेले संगणक खराब होणेची शक्यता नाकारता येत नाही. संगणक क्लासरुम मध्ये एक व आय.टी.ॲण्ड ई.एस.एम.या व्यवसायाच्या लॅबमध्ये एक असे २ टनीचे दोन नग वॉलमाऊटेंड+ स्प्लीट एअर कंडीशनर्स बसविणे आवश्यक आहे.

सदरील ०२ टनी दोन नग वॉलमाऊटेंड स्प्लीट एअर कंडीशनर्स खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु.८०,०००/- खर्च अपेक्षित आहे. व्होल्टास,सॅमसंग,गोदरेज व ब्लूस्टार वगैरे नामांकित कंपनीचे ०२ टनीचे दोन नग एअर कंडीशनर्स खरेदी करणेत येतील.

तरी वरील प्रमाणे दोन एअर कंडीशनर्स कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.८०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली .

(कार्यवाही-अधिक्षक खरेदी विभाग/ प्र.प्राचार्य,आयटीआय)

**विषय नं.२८.** **श्रीसाईबाबा कन्या विद्यामंदिराकडे इ.१० वी ची दुसरी तुकडी सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५९.** श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या शाळेत मागील वर्षी २००४-०५ मध्ये तसेच या वर्षी इ.५ वी ते इ.९ वी पर्यंतच्या वर्गासाठी प्रत्येकी दोन तुकड्या आहेत. सन २००४-२००५ मध्ये इ.९ वी च्या दोन तुकड्यांत शिकत असलेल्या १०५ विद्यार्थ्यीनींपैकी ९८ विद्यार्थीनी उत्तीर्ण झालेल्या आहेत. या ९८ विद्यार्थीनी सध्या २००५-०६ या शैक्षणिक वर्षात एकाच वर्गात बसत आहेत. या सर्व विद्यार्थीनी एकाच वर्गात बसणे कठीण जात असल्याने या वर्गातील विद्यार्थीनी दोन स्वतंत्र वर्ग तुकड्या करुन बसविता येतील. या इ.१० वी च्या वर्गाच्या दोन वर्गतुकड्या केल्याने १.५ शिक्षकाचे पद निर्माण होईल. संस्थानचा स्टाफींग पॅटर्न शासनाने मान्य केल्यानंतर सदरचे नव्याने निर्माण होणारे पद भरता येईल. तात्पुरती व्यवस्था म्हणून कनिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्वावर नियुक्त करावयाचे शिक्षकांना या वर्गाचे अतिरिक्त काम उपलब्ध करुन देऊन त्यांचेकडून या नवीन वर्गास अध्यापनाचे कार्य तासिका तत्वावर करुन घेता येईल. कनिष्ठ महाविद्यालयातील तासिका तत्वावरील शिक्षकांना ४० मिनिटांच्या तासिकेसाठी रुपये ४५/- प्रती तासिका प्रमाणे मानधन देण्यात येणार आहे. माध्यमिक विभागाच्या कामासाठी याच शिक्षकांना ३० मिनिटांच्या तासिकेसाठी रुपये ३०/- प्रती तासिका प्रमाणे मानधन देता येईल.

तरी सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून इ.१० वीच्या दोन तुकड्या करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-अधिक्षक आस्थापना/मुख्याध्यापिका, कन्याशाळा)

**विषय नं.२९.** **इयत्ता ११ वी व १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यासाठी आकारणी करावयाचे शैक्षणिक शुल्काबाबत.**

**निर्णय क्र.३६०.** संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयमध्ये सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापर्यंत फक्त विज्ञान शाखेची इयत्ता ११ वी व १२ वी ची प्रत्येकी एक तुकडी होती व या वर्गांमध्ये फक्त मुलींनाच प्रवेश देण्यात आलेले आहेत. आता,सन.२००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून नव्याने कला व वाणिज्य या शाखेची इयत्ता ११ वीची प्रत्येकी एक तुकडी नव्याने सुरु करण्याचा तसेच सदरचे तीनही शाखांकडे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ या वर्गांमध्ये मुलींसह मुलांनाही प्रवेश देणेबाबत निर्णय झालेला आहे.

शासकीय धोरणानुसार मुलींसाठी इयत्ता १२ वी पर्यंत मोफत शिक्षण आहे.मात्र,प्रवेश घेणाऱ्या फक्त मुलांसाठी किमान शैक्षणिक शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र. एसएसएन /२१०३ /(५०-०३) माशि-२ मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ३२ दिनांक २७ मे २००३ मध्ये शैक्षणिक शुल्क आकारणी बाबत खालील प्रमाणे तरतूद आहे.

अ) मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक व इतर शुल्क संबंधित शाळेचे व्यवस्थापन निश्चित करील.

ब) व्यवस्थापनाने निश्चित केलेल्या शुल्कांच्या दराबाबत नफेखोरी होत असल्याची तक्रार पालक शिक्षक संघाने संबंधित शिक्षण उपसंचालकाकडे केल्यास,संबंधित उपसंचालक आवश्यक ती तपासणी करुन,मान्य खर्चाच्या बाबीवरील खर्चांचे निर्धारण करुन त्यानुसार सदरील शुल्क किती असावे याबाबत ते व्यवस्थापनाला निर्देश देतील आणि तसे निर्देश व्यवस्थापनावर बंधनकारक राहतील.ई.बी.सी. /बी.सी.सवलत धारक विद्यार्थ्यासाठी शासकीय नियमानुसार खालील
प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येते.

| अ.नं. | वर्ग | शुल्क रक्कम |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१. | इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी कला,वाणिज्य व विज्ञान | रु.३३०-०० |

संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात सन.२००५-२००६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान तसेच नव्याने इयत्ता ११ वी कला,वाणिज्य या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. सदर वर्गांमध्ये प्रवेश घेणाऱ्या फक्त मुलांसाठी मा. अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने शासकीय धोरणानुसार उपरोक्त प्रमाणे इ.बी.सी./बी.सी.सवलत धारक विद्यार्थ्यांसाठी असलेले शुल्क आकारणी करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक शुल्क आकारणी प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्राचार्या- कन्या विद्या मंदिर )

**विषय नं.३०. फिजीशियन, सर्जन, व भूलतज्ञ पदावर नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६१.** संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयासाठी या आधीचे व्यवस्थापन मंडळाचे काळात खालील प्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

| अ.नं | पदांचे नांव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| ०१. | फिजीशियन | १००००-१५२०० | ०२. |
| ०२. | जनरल सर्जन | १००००-१५२०० | ०३ |
| ०३. | भूलतज्ञ | १००००-१५२०० (एम.डी )<br>८०००-१३५०० (डी.ए.) | ०४ |

याआधी फिजीशियन या पदावर डॉ.संतोष दिघोळकर हे दि.०१/०६/१९९० पासून व डॉ.भाऊसाहेब साबळे हे दि.०७/०२/१९९२ पासून कार्यरत होते पैकी डॉ.दिघोळकर यांनी दि.०५/०७/२००४ पासून संस्थान सेवेचा राजीनामा दिलेला आहे.तेव्हापासून सदरचे पद रिक्त आहे.

जन.सर्जन या पदावर डॉ.नेमीनाथ पाटील,डॉ.राम नाईक व डॉ.रितेश नायक हे तिघे कार्यरत होते.पैकी डॉ.पाटील यांनी दि.१५/०२/२००३ पासून राजीनामा दिल्याने तेव्हापासून सदरचे पद रिक्त आहे.

भूलतज्ञांची चार पदे भरण्यासाठी संस्थानने या आधी दि.३१/१०/२००२, ०२/०५/२००३, २४/०३/२००४ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन उमेदवारांकडून अर्जाची मागणी केली होती तथापि,पात्रताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्याने सदरचे पदांवर वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती होऊ शकली नाही.सध्या डॉ.मृणालिनी गोंदकर व डॉ.सोनिया नायक ह्या कार्यरत असून दोन पदे रिक्त आहेत.त्यामुळे पेशंटचे ऑपरेशनसाठी बाहेरुन ऑन कॉल भूलतज्ञ बोलावून कामे करुन घेण्यात येत आहेत.

सध्या संस्थान रुग्णालयातील दैनंदिन ओ.पी.डी.संख्या सरासरी ८०० ते १००० असून,एकूण चार कक्षाकडे असलेल्या ८ ऑपरेशन टेबलवर होणारी दैनंदिन मेजर,मायनर ऑपरेशन संख्या २५ ते ३० एवढी आहे.

संस्थानचे रुग्णालयातील दैनंदिन ओपीडी,ऑपरेशन्स संख्या विचारात घेता,अत्यंत निकडीची गरज म्हणून रुग्णालय आस्थापनेवरील
(०१) फिजीशियन :- ०१.(०२) जनरल सर्जन :-०१. (०३) भूलतज्ञ :- ०२. ही पदे तातडीने भरणे आवश्यक आहे.असा प्रस्ताव वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.२४/०५/२००५ रोजी केला होता.या प्रस्तावात त्यांनी संस्थानकडे अर्ज केलेल्या खालील उमेदवारांची नेमणूकीसाठी शिफारस देऊन कळविले होते.
नेमणूका द्यावयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचा तपशील खालील प्रमाणे :

| अ.नं. | नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूकीचा हुद्दा |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ.अमोल आर.हारटळकर | एम.डी.(जनरल मेडीसीन) | वैद्यकीय अधिकारी (फिजीशियन) |
| ०२. | डॉ.मोहम्मद वाय.शहा | एम.एस.(सर्जरी) | वैद्यकीय अधिकारी (जनरल सर्जन) |
| ०३. | डॉ.अभय व्ही.अनुरकर | एम.डी (ॲनेस्थेशिया) | वैद्यकीय अधिकारी (ॲनेस्थेशिया) |

वरील उमेदवारांच्या संदर्भात संस्थान रुग्णालयाचे वरिष्ठ प्रशासक, डॉ.टाकळकर यांनी संबंधित प्रस्तावावर खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"डॉ.हारटळकर, एम.डी.मेडीसीन,पुणे यांची फिजीशियन पदासाठी व डॉ अनुरकर एम.डी.(ॲनेस्थेसीया) यांची भूलतज्ञ पदासाठी मुलाखत घेतलेली असून, दोन्हीही उमेदवार नेमणूक

देण्यास पात्र आहेत." तसेच डॉ.मोहम्मद युनूस शहा,यांची दि.२९/०१/२००५रोजी रुग्णालय समितीचे समोर झालेल्या मुलाखतीमध्ये "सर्जिकल रजिस्ट्रार" या पदासाठी निवड झालेली आहे. डॉ शहा यांनी या आधी महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स, सेवाग्राम, वर्धा यांचे मार्फत संस्थान रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा केलेली असून त्यांचे काम समाधानकारक आहे. कायम स्वरुपी वैद्यकीय अधिकारी म्हणून त्यांना प्राधान्याने नेमणूक देण्यास हरकत नाही.

संस्थान रुग्णालयात नेमणूक देण्यासाठी दि.२९-३० जानेवारी २००५ रोजी निवड केलेल्या इतर वैद्यकीय अधिकारी यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु करतांना नियुक्त्या देण्याविषयी विचार करता येईल.

"श्री साईनाथ रुग्णालयासाठी तातडीची गरज म्हणून डॉ.हारटळकर,एम. डी. फिजीशियन, डॉ.एम.वाय.शहा, एम.एस.सर्जरी व डॉ.अभय व्ही अनुरकर, एम.डी. अनेस्थेशिया यांना पदावर तात्काळ नियुक्ती देऊन कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करावा.

रुग्णालय निवड उपसमितीचे मा. अध्यक्ष डॉ.तिवारी व मा.सदस्य डॉ.गोंदकर यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा झालेली असून सदरहू तीनही संबंधितांना नेमणूकी देण्याबाबत त्यांनी मान्यता दिलेली आहे." असे अभिप्राय वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी दिलेले आहेत.

संस्थान रुग्णालयातील वाढलेली दैनंदिन कामाची व्याप्ती, मोठया प्रमाणातील ओ.पी.डी.व ऑपरेशन संख्या विचारात घेता, तसेच रुग्णालयातील सेवा ही रुग्णांशी निगडीत असल्यामुळे व तातडीच्या सेवा रुग्णांना वेळीच उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे रुग्णालयात पुरेसा वैद्यकीय स्टाफ कार्यरत असणे आवश्यक आहे. हे विचारात घेऊन वैद्यकीय अधिक्षिका, रुग्णालय यांचा प्रस्ताव, वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांचे अभिप्राय तसेच रुग्णालय उपसमितीचे मा.अध्यक्ष डॉ.तिवारी व मा. सदस्य डॉ.गोंदकर यांची सदरहू उमेदवारांना नेमणूका देण्याबाबतची मान्यता इत्यादी विचारात घेऊन मा.अध्यक्ष सो.यांच्या पूर्व मान्यतेने खालील तपशीलात नमूद केलेल्या उमेदवारांना तात्पुरत्या एक वर्षांचे कालावधीसाठी नेमणूका देण्यात आलेल्या असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूकीचा हुद्दा | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ.अमोल आर.हारटळकर | एम.डी.(जनरल मेडीसीन) | वैद्यकीय अधिकारी (फिजीशियन) | १०,०००-१५,२०० |
| ०२. | डॉ.मोहम्मद वाय.शहा | एम.एस.(सर्जरी) | वैद्यकीय अधिकारी (जनरल सर्जन) | १०,०००-१५,२०० |
| ०३. | डॉ.अभय व्ही.अनुरकर | एम.डी (ॲनेस्थेशिया) | वैद्यकीय अधिकारी (ॲनेस्थेशिया) | १०,०००-१५,२०० |

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना )

**विषय नं.३१.** **शिर्डी नगरपंचायत शिर्डी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कराबाबत.**

**निर्णय क्र.३६२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३२.** **सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनायझेशन यांना सुलभ प्रसाधनगृह येथील एस.टी.डी. सेवेस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.३६३.** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२१-०४-२००४ चे सभेतील निर्णय क्र.२८४ नुसार दि. ०२/०८/२००४ चे कार्यालयीन आदेशाने सुलभ इंटरनॅशनल सोशियल ऑर्गनायझेशन ब्रॅंच ऑफीस, मुंबई यांना दि. ०८/०६/२००४ पासून ११ महीने कालावधी करीता सुलभ प्रसाधनगृह, शिरडी येथे काऊंटरवर एस.टी.डी.सुविधा चालविणेसाठी परवानगी देण्यात आलेली होती रक्कम रु.५०००/- मात्र डिपॉझीट फी तसेच रुपये १२१०/- मात्र मासिक परवाना फी व मिटर रिडींग प्रमाणे विद्यूत बील वेगळे यानुसार ११ महिने कालावधी करिता लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर एस.टी.डी बुथ चालविणेस सदरची परवानगी देणेत आली आहे.

सुलभ इंटरनॅशनल सोशियल ऑर्गनायझेशन यांना संस्थान जागेत एस.टी. डी. चालविणेसाठी देणेत आलेल्या परवान्याची मुदत दि.०७-०५-२००५ रोजी संपल्याने दि.०८-०५-२००५ रोजीपासून पुढील ११ महीने मुदतीकरीता मुदतवाढ मिळावी व संस्थानचे शर्ती, अटी आम्हांस मान्य राहतील. अशी त्यांनी ( दूरध्वनी वरुन ) विनंती केलेली आहे.

तरी त्यांना पुढील म्हणजेच दि.०८-०५-२००५ रोजीपासून ११ महीने कालावधी करीता सुलभ प्रसाधन गृह शिरडी काऊंटरवर एस.टी.डी. चालविणे बाबत मुदतवाढ पुर्वीचेच अटी/शर्तीवर व परवाना फी मध्ये १० % वाढ करून म्हणजेच मासिक परवाना फी रुपये १३३१/- मात्र आकारुन

मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.३३.** **श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्यावसायिक संस्था लि. बाभळेश्वर यांना श्रीराम आईस्क्रीम व दूग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी संस्थान परिसरात बुथ (स्टॉल)ठेवणेसाठी जागा देणेबाबत.**

**निर्णय क्र.३६४.** श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संध लि.,बाभळेश्वर यांचा दिनांक २४/०५/२००५ रोजीचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला असून त्यात त्यांनी त्यांचे संस्थेमार्फत " श्रीराम आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थाचे दर्जेदार उत्पादन केले जाते. सदर दुग्धजन्य पदार्थ आपले संस्थानचे प्रसादालय ( भोजनालय ) आवारात, ५०० रुमचे आवारात व २०० रुमचे आवारात बुथ (स्टॉल ) द्वारे विक्रीसाठी प्रत्येक ठिकाणी १०x१० या साईजची जागेची आवश्यकता असल्याचे इकडेस कळविले असून सदरचे जागेचे नियमाप्रमाणे जागा भाडे व इतर कागदपत्रांची पूर्तता करून देण्यास त्यांची तयारी आहे. तरी संघास साई भक्तांची सेवा करण्यासाठी वरील ठिकाणी जागा देऊन सहकार्य करावे "अशी विनंती त्यांनी अर्जात केली आहे.

श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्यावसायिक संघ यांची ३ ठिकाणी जागा मिळणेबाबत मागणी आहे मात्र संस्थान जागेतील पूर्वी चालू असलेल्या इतर व्यवसायांचा विचार करता नवीन भक्तनिवास ५०० रुम्स परिसर, २०० रुम परिसर किंवा प्रसादालय परिसर या ठिकाणापैकी एका परिसरात संस्थानचे सोयीने १०x१० ची जागा प्रस्तूत दूध संघास त्यांचे विनंतीस अनुसरून उपलब्ध करुन देता येईल. लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर ११ महिन्यांसाठी देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव.संघ लि., बाभळेश्वर ही सहकारी संस्था असल्यामुळे त्यांना संस्थानचे भक्तनिवास इमारत परिसरात एक गाळा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी रुपये ८००/- प्रती माह भाडे व डिपॉझीट रुपये १०,०००/- एका स्टॉलसाठी आकारून लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देणेत यावा असें ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.३४.** **जिल्हा परिषद शाळा, शिर्डी हस्तांतर प्रकरणी दाखल झालेल्या न्यायालयीन रिट अर्ज क्रमांक ३९५१/२००५ प्रकरणाबाबत.**

**निर्णय क्र.३६५.** शिरडी येथील प्राथमिक शाळेची जागा ही श्री साईबाबा मंदीरा जवळ असल्यामुळे भक्तांचे सोईसाठी धर्मशाळा, पार्किंग, कमर्शिअल कॉम्प्लेक्स असे बांधकाम प्रस्तूत जागेवर करता येईल या उद्येशाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संस्थानने जा. नं एसएसएस/वशी-०२/१५/०९/९८ रोजीच्या पत्राने कळविले आहे.या बाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ०२/१०/१९९८ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं. २२३ झालेला आहे.

जिल्हा परिषद शाळेची जमीन संस्थानकडे हस्तांतरित करून संस्थानने शॉपिंग सेंटरचे गाळे बांधून नगरपंचायतीस दीर्घ मुदतीच्या पटटयाने दयावे, पिंपळवाडी टपरीधारकांचे पुनर्वसन नियोजित गाळयात व्हावे. असा प्रस्तुतचा ठराव असून हस्तांतरानंतर जिल्हा परिषदेची शाळेची जागा संस्थानचे मालकीची झालेवर त्या जागेच्या मोबदल्यात शाळेसाठी पर्यायी खोल्या संस्थानने बांधून देणेचे ठरले होते.

त्यानंतर प्रकरणी जिल्हा परिषद ,अहमदनगर यांचेशी विचार विनिमय करण्यात आला. तसेच नव्याने बांधकाम करणेत यावे याकरिता प्राथमिक शाळा सध्याच्या जागेवरून साईउद्यान इमारतीत स्थलातंरित करणेत यावी तसेच शाळेच्या जागेवर बांधावयाचे दुकान केंद्र आणि वरचे मजल्यावर संस्थानच्या उपयोगाकरिता असलेली इमारतीचे नकाशे बनविणेसाठी प्रस्ताव आर्किटेक्ट निवड याबाबतची कार्यवाही करणेबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ४-६/०७/२००१ रोजी झालेल्या सभेत निर्णय पारीत करण्यात आला आहे.

शिरडी विकास योजनेतील तरतुदीप्रमाणे प्राथमिक शाळेच्या सध्याचे जागेवर नियोजित प्रकल्पाच्या अनुषंगाने फेरबदल शासनाकडून मंजूर होणे आवश्यक होते तसेच शाळा इमारत ज्या जमिनीवर बांधून दयावयाची आहे ती आरक्षण क्र ८ मधील जमीन भू संपादनाने प्राप्त होणे या दोन्ही बाबी संबंधी आवश्यकता विचारात घेऊन त्याबाबतची पूर्तता झालेवर शाळा साईउद्यान इमारतीत स्थलांतरित करण्यात यावी. अशा आशयाचा मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २-३/३/२००२ रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे संबंधीताकडे त्या प्रमाणे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना टीपीएस/१६०१/११४४/प्रक ३८/०२ /नवि ९ दिनांक ०६/०८/२००३ अन्वये आरक्षण क्रमांक ८ ( शाळेसाठी ) ची विकसन यंत्रणा शिरडी नगर पंचायत ऐवजी श्री साईबाबा संस्थान, शिरडी असा फेरबदल झालेला आहे.त्याप्रमाणे संस्थानने २१ खातेदारांची आरक्षण क्रं. ०८ सर्व्हे नं ६ मधील क्षेत्र हेक्टर ० आर ४५.१४ खरेदीने घेतलेली आहे. तसेच ४ खातेदारांचे क्षेत्र हेक्टर ०

आर ११-५१ जमीन भू-संपादनाने घेणेबाबत कार्यवाही चालू आहे. तसेच एक खातेदाराची १ आर क्षेत्र वाटाघाटीने घेणेचेही काम चालू आहे. असे एकुण क्षेत्र हेक्टर ० आर ५७.६५ होत आहे.

शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील निर्णय क्रमांक विसप्र/२००२/प्रक्र ४७५/पंरा/०९ (४८) दिनांक १४/०८/२००२ चे निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषदेची शाळेची जागा श्री साईबाबा देवस्थान परिषद शिरडी यांना हस्तांतरित करणेची शासनाने मंजूरी दिली आहे.

शिरडी नगर पंचायतीच्या दि. २९/०५/२००३ चे प्रस्तावास अनुसरून पिपंळवाडी रस्ता व मंदिर परिसरालगत इतर रस्त्यावर असलेल्या अतिक्रमित टपरीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी अ) सध्याचे जिल्हा परिषद शाळेच्या जागेवर बेसमेंट,तळमजला व पहिला मजला असे बांधकाम करणेसाठी नगर पंचायत यांना परवानगी देणेस व फक्त दुसरा मजला संस्थान उपयोगासाठी ठेवणेस आणि ब) आरक्षण क्रमांक ८ खालील क्षेत्राचे शाळेसाठी संस्थान तर्फे भू-संपादन करून त्यावर नवीन इमारत बांधून देणे,या संपूर्ण ( अ) व (ब) प्रस्तावास संस्थानचे दि १३/०७/२००३ चे सभेत मान्यता देणेत आली. मा. धर्मादाय आयुक्त यांची पूर्वपरवानगी मिळणेचे अटीवर सदर प्रस्तावास मान्यता देणेत आली. त्याप्रमाणे प्रस्ताव जा.नं.एसएसएस/वशी-बांधकाम/७१३९/ २००३ दिनांक २६/०८/२००३ अन्वये मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. त्याला दि. ०८/०९/२००३ रोजी मा. धर्मादाय सहआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनीही मंजूरी दिली आहे.

सध्या रेकॉर्डप्रमाणे जिल्हा परिषद शाळेकडे असलेले क्षेत्र खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | सर्व्हे नंबर | एकूण क्षेत्र हेक्टर आर | पैकी जिल्हा परिषद शाळे कडे असलेले क्षेत्र हेक्टर आर प्रतिआर | ७/१२ वर कोणत्या जमिनधारकाचे नांव आहे |
|---|---|---|---|---|
| ०१ | १/१ | ०१-४२ | ०-४१ | ( ग्रामपचांयत शिरडी ) शिरडी ग्रामपंचायत,शिरडी |
| ०२ | १/६ | ००-०६ | ०-०६ | जिल्हा परिषद,अहमदनगर प्राथमिक शाळा ,शिरडी |
| ०३ | १/१७ | ००-०५ | ०-०५ | शाळागृह |
| ०४ | गावठाणपैकी | ००-०५-१३ | ००-०५-१३ | डिस्ट्रीक्ट लोकल बोर्ड |
| ०५ | गावठाणपैकी | ००-०५-१३.६ | ००-०५-१३.६ | डिस्ट्रीक्ट लोकल बोर्ड |
| ०६ | गावठाणपैकी | ००-०२-०४ | ००-०२-०४ | शाळागृह |
| ०७ | गावठाणपैकी | ००-०१-०२ | ००-०१-०२ | क्रिडागंण |
| | | एकूण | **००-६५-३०.०८** | |

गा.नं . ७/१२ वरील कब्जेदार सदरी असलेल्या नावांप्रमाणे या क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| नगरपंचायत शिर्डी यांचे नांवे क्षेत्र हे. आर. प्रति आर | जिल्हा परिषदेचे नांवे असलेले क्षेत्र हे. आर. प्रति आर | शाळेकडे असलेले एकूण क्षेत्र हे. आर प्रति आर |
|---|---|---|
| ०-४१-०० | ०-२४-३०.०८ | ००-६५-३०.०८ |

शासनाच्या दिनांक १४/०८/२००२ च्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांचे नांव ७/१२ चे उता-यावर लावावे. म्हणून तहसिलदार, राहाता यांचेकडे १०/०९/२००४ रोजी अर्ज केला आहे. त्यावर कामगार तलाठी; शिरडी यांनी गांवी फेरफार नं १६४७० ने नोंद घेतली आहे. सदर नोंदीबाबत मा.तहसिलदार,राहाता यांचेकडून निर्णय प्राप्त होणे अद्याप बाकी आहे.

दिनांक ०१/०९/२००४ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय कमांक ४ (ड) खालील प्रमाणे झालेला आहे.

"यावर चर्चा होऊन,सध्या चालू असलेली जिल्हा परिषद शाळा साईउद्यान इमारतीत स्थलातंरित करावी परंतु; नगर पंचायतीचे माध्यमातून दुकान केंद्र बांधणे बाबत सविस्तर माहिती व कायदेशीर सल्ला घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले "

त्याप्रमाणे श्री.पी.डी.गुजराथी, ॲडव्होकेट यांचेशी सल्लामसलत केली त्यांनतर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २१/१०/२००४ चे सभेतील निर्णय क्र.३४ खालील प्रमाणे झालेला आहे."

याबाबत सविस्तर चर्चा होऊन जिल्हा परिषद शाळेच्या (आरक्षण क्रं ९, १० व १२ मीटर रस्ता) जागेस श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिरडी) ची मालकी हक्काची नोंद करणेसाठी आवश्यक कार्यवाही करणेत यावी. तसेच सदरहू जागेवर शिरडी नगर पंचायत यांचे मार्फत तळमजला व पहिल्या मजल्यावर दुकान केंद्र,दुस-या मजल्यावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिरडी)

उपयोगासाठी बांधकाम करणेसाठी मान्यता देणेत आली. त्यासाठी शाळा संस्थानचे साईउद्यान इमातीत तात्पुरती स्थलांतरित करणेत यावी. "

शासन,ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक जिपसा/२००५/१९ /प्रक २१०८७/ पंरा ९/ दिनांक १२/०४/२००५ झालेला आहे. त्यामध्येही साईउद्यान इमारतीमध्ये सदर शाळा तातडीने स्थलांतरित करणेत यावी असे नमूद केलेले आहे.याबाबत पुढील यथायोग्य कार्यवाही चालू होती.

परंतु याबाबत उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ ओरगांबाद येथे १) श्री. उत्तमराव रंभाजी शेळके २) श्री.बाबासाहेब शिवाजी कोते यांनी महाराष्ट्र शासन व इतर ७ यांचे विरुध्द रिट पिटीशन क्र. ३९५१/२००५ दाखल केले आहे.त्यामध्ये उच्च न्यायालयाने दिनांक २०/०६/२००५ रोजी सदर शाळा स्थलांतरित करणेस मनाई हुकूम दिलेला आहे त्यानंतर पुढे (स्टे टू कंटिन्यू) स्थगिती पुढे चालू राहिलेली आहे. त्यामुळे सध्याची जिल्हा परिषदेची जागा साईउद्यान इमारतीमध्ये स्थलांतरित झालेली नाही.खालील मुद्दे रिट पिटीशनमध्ये नमूद केले आहेत.

०१) एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थानची मालमत्ता हस्तांतरीत करणेसाठी ज्या गोष्टी विचारात घेऊन परवानगी दयावी लागते. श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (कलम १७) याबाबी शासनाने विचारात न घेता दि १२/०४/२००५ चा निर्णय घेतलेला आहे.

०२) जिल्हा परिषदेच्या ताब्यातून मिळकत सुमारे दीड एकर ही मुल्यवान असून संस्थानच्या जवळ आहे. सदर मिळकत जिल्हा परिषद,अहमदनगर यांना हस्तांतर करणे शासन भाग पाडीत आहे.

०३) जिल्हा परिषद कायदा व नियम १९६४ यांच्या तरतुदी विचारात न घेता जागेचे हस्तांतर होत आहे.

०४) अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन केले जात आहे. ही गोष्ट कायद्यास धरून नाही शिरडी येथील जागेचा दर प्रत्येक चौ.मी. ला रुपये ३,०००/- आहे. शासन जिल्हा परिषदेची मिळकत अतिक्रमण धारकांना देत आहे. सदरची बाब केवळ आमदार व त्यांचे सर्मथक यांना खुश करणेसाठी करण्यात येत आहे. सदरची बाब सार्वजनिक हिताच्या विरोधात आहे.

०५) शाळेचे स्थलांतर करणे व शाळा बांधून देणे हे काम करणे प्रतिवादी नं ७ (श्री साईबाबा संस्थान) यांचे कार्यकक्षेत येत नाही.

०६) साईउद्यानमध्ये शाळेचे स्थलांतर करणेचा ठराव हा विद्यार्थ्यांच्या आरोग्य कल्याण, जीवन,सुरक्षितता यांचेशी घातक आहे. शाळेची इमारत बांधणेसाठी लाखो रुपये खर्च करणे हा सार्वजनिक द्रव्याचा अपव्यय करण्यासारखे आहे.

**सदर रिटपिटीशन मध्ये अर्जदाराने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.**

अ) जिल्हा परिषदेची शाळेची जागा श्री साईबाबा संस्थान यांना हस्तांतर करणेबाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग,यांचे उपसचिव यांचे सहीने निघालेला शासन निर्णय विसप्र २००२/प्रक४७५/पंरा९ (४८ ) दिनांक १४/०८/२००२ चा रद्य करण्यात यावा.

ब) जिल्हा परिषदेच्या स्थलांतर करणे, सामनेवाले क्रमांक ७ (श्री साईबाबा संस्थान) यांना बांधकामासाठी जागा देणेबाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे कार्यासन अधिकारी यांचे सहीने निघालेला दिनांक १२/०१/२००५ चा रद्य करणे.

क) दिनांक ०१/०९/२००४ रोजी प्रतिवादी नं. ०७ ने ( श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी ) मंजूर केलेला ठराव रद्य करणे

ड) शासन,ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे दिनांक १४ ऑगस्ट २००२ व १२ एप्रिल २००५ चे झालेला निर्णय कि ज्यामध्ये सध्या असलेली प्राथमिक शाळा साईउद्यान इमारतीमध्ये हलविणेबाबत झालेला निर्णय यांस सदर केसची सुनावणी चालू असेपर्यंत व केसचा निकाल लागेपर्यंत स्थगिती आदेश देणेत यावा.

इ) सामनेवाले क्रं ०१ ते ०४, त्यांचे हाताखालचे अधिकारी, प्रतिनिधी किंवा नोकर यांनी जिल्हा परिषदेची असलेली जागा दुकानदारांचे पुनर्वसन करणेसाठी महाराष्ट्र शासनाचे दिनांक १४/०८/२००२ व १२-४-२००५ चे निर्णयाचे आधारे सदरचे केसची सुनावणी चालू असेपर्यंत आणि केसचा निकाल लागेपर्यंत हस्तांतरण करण्यास अंतरिम मनाई हुकूम देणेत यावा.

उपरोक्त रिटपिटीशन संदर्भात दिनांक १५/०७/२००५ रोजी संस्थानचे ॲड. श्री. आर.एन. धोर्डे यांचेशी समक्ष भेट घेऊन त्यामध्ये खालील मुद्यांवर चर्चा केली .

०१) सध्याची प्राथमिक शाळा मोडकळीस आलेली असून मंदिराचे जवळ आहे.ती इमारत शाळेसाठी योग्य नाही.

०२) साईउद्यान बिल्डींगमधील स्थलांतर हे तात्पुरते स्वरुपाचे आहे.कायम स्वरुपाचे नाही.

०३) सध्याचे प्राथमिक शाळेचे जागी शिरडी नगरपंचायती मार्फत दुकान गाळे असावे असे पूर्वीपासून संस्थानचे मत आहे यापूर्वी तसे ठरावही झालेले आहेत.

०४) सध्याचे प्राथमिक शाळेचे जागेवर नियोजित शॉपिंग कॉम्प्लेक्स वरील मजल्यावर संस्थानसाठी बांधकाम व्हावयाचे आहे.

०५) व्यवस्थापन मंडळाचे दि. ४-६/०७/२००१ निर्णय क्र ३०० अन्वये प्राथमिक शाळेच्या सध्याचे जागेवर तळमजल्यावर दुकान केंद्र आणि त्यावरील मजल्यावर संस्थान मालकीचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव संस्थानला मान्य असलेचे शिरडी नगरपंचायत, शिरडी यांना कळविणेत यावे असे ठरले. त्याचप्रमाणे दिनांक १२-१३/०७/२००३ रोजी झालेल्या सभेत अशा आशयाचा ठराव क्रं २५५ झालेला आहे.

आरक्षण क्रमांक ८ सर्व्हे नं. ०६ मध्ये शाळा बांधून जिल्हा परिषदेला हस्तांतरण करणेसाठी तसेच सध्याची जिल्हा परिषदेची असलेल्या शाळेची जागा संस्थानचे ताब्यात आलेवर दुकान गाळे व इतर बांधकाम करणेसाठी नगरपंचायत शिरडी यांना हस्तांतरित करणेसाठी शासनाची लेखी परवानगी आवश्यक आहे. याबाबत शासनाची लेखी परवानगी घेणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

तरी सदर प्रकरणी यापूर्वी मा.व्यवस्थापन मंडळाने वेळोवेळी केलेले ठराव विचारात घेऊन मा.धर्मादाय सहआयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी दिनांक ०८/०९/२००३ रोजी संस्थानच्या प्रस्तावास दिलेली मंजूरी विचारात घेऊन वर नमूद केलेल्या विषयांबाबत शपथपत्र वरील मुद्यांसह दाखल करता येईल.

तसेच आरक्षण क्रमांक ८ सर्व्हे नं. ६ याठिकाणी सध्या जिल्हा परिषद शाळेसाठी अंदाजे खर्च २.७५ कोटी बांधकामासाठी येणार आहे. सदरचा खर्च संस्थान करणार आहे. त्या मोबदल्यात आरक्षण क्रमांक ९ व १० मध्ये सध्याचे जिल्हा परिषद शाळेचे ठिकाणी बांधण्यात येणा-या दुकान गाळयाच्या वरच्या मजल्याचे बांधकाम व दर्शन रांगा व पहिल्या मजल्यावरील ५ दुकाने इ. चे बांधकाम करून ते संस्थानला देणेबाबत चा प्रस्ताव नुकताच नगरपंचायतीने दिलेला आहे. त्यांच्या प्रस्तावात वर नमूद केलेल्या बांधकामाचे बाजारमूल्य अंदाजे २.७६ कोटी होत आहे असे त्यांनी पत्राद्वारे संस्थानला कळविलेले आहे. तसेच त्यांच्या सदरच्या प्रस्तावास नगरपंचायतीच्या सर्व साधारण सभेपुढे विषय ठेऊन त्यास मान्यता घेण्यात येणार आहे असे त्यांनी नमूद केले आहे व त्याप्रमाणे/अनुषंगाने शपथपत्रात आपणांस आपले म्हणणे देता येईल.

वरील सर्व मुद्दे विचारात घेऊन संस्थानचे शपथपत्र सादर करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.३५. जिल्हा परिषद शाळा आरक्षण क्र.९/१० येथील दुकानकेंद्र बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.३६६.** शिर्डी विकास योजना आरक्षण क्र. ९ व १० मधील जिल्हा परिषद शाळेच्या जागेबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी संस्थानकडे यापुर्वी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केले होते.

अ) शिरडी नगरपंचायत यांनी जा.नं. नपं/ बांध/कावि-०५/४१२/२००२ दिनांक०७/०८/२००२ चे पत्राने उपरोक्त फेरबदलातील विकसन यंत्रणा श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी ऐवजी शिर्डी नगरपंचायत ठेवणे आवश्यक असल्याचे कळविले होते. नगरपंचायतीच्या दिनांक ०५.०१.२००२ रोजीच्या सर्वसाधारण बैठकीतील विषय नं. ९ वरील निर्णयानुसार विकसन यंत्रणा शिर्डी नगरपंचायत ठेवणेस सर्वानुमते मंजूरी मिळाली असल्याचे सदर पत्रात नमूद केले होते. तसेच त्याबाबत संस्थानचे म्हणणे सादर करण्याची विनंती केली होती. याबाबत दिनांक १५-१६/१०/२००२ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाचे सभेत संमत करण्यात आलेल्या निर्णय क्र. ४७९ नुसार शिरडी नगरपंचायत यांनी सादर केलेला सदरचा प्रस्ताव मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ठरले. या निर्णयानुसार मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाच्या प्रस्तावासाठी सदर आरक्षणाचे जागेवर बांधावयाचे नियोजित इमारतीचा प्राथमिक आराखडा व त्यामध्ये संस्थानचे उपयोगासाठी दर्शविलेला बांधकामाचा तपशील शिरडी नगरपंचायत, शिरडी यांचेकडून मागविण्यात आला होता.

ब) त्यानंतर शिरडी नगरपंचायत, शिरडी यांनी त्यांचे जा.नं. ६२२ दिनांक ०८/०५/२००३ व जा.नं. ७१२ दिनांक २९/०५/२००३ चे पत्राव्दारे खालील प्रस्ताव पाठविला होता.

१. आरक्षण क्र. ९ व १० चे फेरबदलाचे प्राथमिक आराखड्यामधील दुस-या मजल्यावरील हॉलचा संस्थानकरीता वापर दर्शविण्यात येत असून सदर आराखडे आपले कार्यालयाकडे सादर करण्यात येत आहेत. तथापि शासनाकडून ज्याप्रमाणे फेरबदल प्रस्ताव मंजूर होईल त्यानुसार अंतिम आराखड्यात सदर दुरुस्ती करणे आवश्यक राहील या अटीवर वापर दर्शविण्यात आला आहे.

शिरडी नगरपंचायत शिरडी यांनी सादर केलेल्या आराखड्यामध्ये खालीलप्रमाणे बांधकाम दर्शविलेले होते.

| अ.नं. | बांधकाम | क्षेत्रफळ | तपशील |
|---|---|---|---|
| ०१ | तळघर | २०२१.२५ चौ.मी. | तळघरामध्ये दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पार्किंग |
| ०२ | तळमाळा | ११०७.३२ चौ.मी. | १३५ दुकान गाळे, बगीचा, बस पार्किंग व दर्शन रांगेकरीता एक हॉल. |
| ०३ | पहिला माळा | ११४९.४३ चौ.मी. | पहिल्या मजल्यावर १३९ दुकानगाळे, दर्शनलाईन करीता एक हॉल |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (संस्थानच्या सध्याच्या दर्शन लाईनकडे जाणारा मार्ग ) |
| ०४ | दुसरा माळा | १७७८ चौ.मी. | बैठक व विधि कार्यक्रमासाठी हॉल, टॉयलेट ब्लॉक व ६ हॉल्स दर्शविलेले आहेत. |

तळघर वगळता याकामी एकूण ४०३४.७५ चौ.मी. एवढे बांधकाम क्षेत्रफळ दाखविले आहे.

०२. शिरडीतील दुकानदारांचे मोठ्या प्रमाणात पूनर्वसन करणे आवश्यक असल्याने बेसमेंट, तळमजला व पहिल्या मजल्याचे बांधकाम नगरपंचायतीकडे असणे आवश्यक आहे. पिंपळवाडी रस्ता १५.०० मीटर रुंदीचा पूर्ण विकसित करण्याचे योजिले असल्याने तेथील दुकानदारांचे पुनर्वसन या दुकान गाळे केंद्रात करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मारुती मार्केट मधील दुकानदारांचेही पुनर्वसन करावे लागेल. याकामी फक्त तळमजल्यावरील दुकानात पुनर्वसन करता येईल. शहरातील एकूण अतिक्रमणांची संख्या लक्षात घेता तळमजला व पहिल्या मजल्यावर दुकाने असणे आवश्यक आहे, असे शिरडी नगरपंचायत यांनी कळविले होते. तसेच शिरडी नगरपंचायतीस प्रस्तावित बांधकामातील बेसमेंट, तळमजला व पहिला मजला असे बांधकाम शिरडी नगरपंचायतीकडे ठेवणेसाठी संस्थानचे व्यवस्थापन मंडळात सुधारित ठराव करणेबाबत त्यांनी विनंती केली होती.

शिरडी नगरपंचायत यांचे उपरोक्त प्रस्तावावर दिनांक १२-१३/०७/२००३ रोजी निर्णय क्र. २५५ अन्वये शिरडी येथे झालेल्या व्यवस्थापन मंडळाचे सभेत सविस्तर चर्चा होउन पिंपळवाडी रस्ता व मंदीर परिसरालगत इतर रस्त्यांवर असलेल्या अतिक्रमित टपरीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी (अ) सध्याचे जिल्हा परिषद शाळेचे जागेवर बेसमेन्ट, तळमजला व पहिला मजला असे बांधकाम करणेसाठी नगरपंचायत यांना परवानगी देणेस व फक्त दुसरा मजला संस्थान उपयोगासाठी ठेवणेस आणि (ब) आरक्षण क्र. ८ खालील क्षेत्राचे शाळेसाठी संस्थानतर्फे भू- संपादन करुन त्यावर नवीन इमारत बांधून देणे, या संपूर्ण प्रस्तावास मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पूर्व परवानगी मिळण्याचे अटीवर सदरहू सभेतील निर्णय क्र. २५५ अन्वये मान्यता देण्यात आली.

सदरचा प्रस्ताव मा. धर्मादाय सह आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे जा.नं. एसएसएस/वशी-बांध/७१३९/२००३ दिनांक २६/०८/२००३ अन्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा. धर्मादाय सह आयुक्त यांनी दिनांक ०८/०९/२००३ चे आदेशान्वये मान्यता दिली असून संस्थानने कायदेशीर टेंडर्स मागवावीत व त्यांची खात्री करुन घ्यावी असे नमूद केले आहे.

दिनांक ०३/०५/१०/२००३ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.४४७ अन्वये आरक्षण क्र. ९ व १० साठी विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान, शिरडी ऐवजी शिर्डी नगरपंचायत करणेसाठी संस्थानची ना-हरकत कळवावी आणि त्यासाठी सदरहू जमिनीवरील नियोजीत दुकान केंद्र इमारतीमध्ये संपूर्ण दुसरा मजला व नकाशात दर्शविल्याप्रमाणे इतर भाग हा संस्थानचे कायम स्वरुपी मालकी उपयोगासाठी ठेवणेची अट घालावी, या आशयाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार जा.नं. ८५७७ दिनांक ३०/०८/२००४ चे पत्राने शिर्डी नगरपंचायत यांना संस्थानची ना- हरकत कळविण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.टीपीएस-१६०१/१९२०/प्रक्र/१२७/०३/नवि-९, दिनांक २४ ऑगष्ट,२००४ अन्वेय शासनाने प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेनुसार मौजे शिर्डी येथे आरक्षण क्र.९ व १० मध्ये दुकान केंद्र ऑडिटोरिअम दर्शन रांग व काही क्षेत्रावर बगीचा असे फेरबदल मंजूर करण्यात आले आहेत. या आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण शिर्डी नगरपंचायत दर्शविण्यात आले आले.

दिनांक १.०९.२००४ रोजी झालेल्या व्यवस्थान समितीचे बैठकीत सध्या चालु असलेली जिल्हा परिषद शाळा साईउद्यान इमारतीत स्थलांतरीत केल्यास नगरपंचायतीचे माध्यमातून दुकानकेंद्र इमारतीचे बांधकम त्वरीत सुरु करता येईल याबाबत चर्चा झाली. तसेच सध्या चालू असलेली जिल्हा परिषद शाळा साईउद्यान इमारतीत स्थलांतरीत करावी परंतू नगरपंचायतीचे माध्यमातून दुकानकेंद्र बांधणेबाबत सविस्तर माहिती व कायदेशीर सल्ला घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे सदरहू सभेतील निर्णय क्र.०४(ड) अन्वये ठरले होते.

त्यानुसार श्री.पी.डी.गुजराथी ॲडव्होकेट,कोपरगाव यांचेकडून उपरोक्त प्रस्तावाबाबत कायदेशीर सल्ला मागविला असता त्यांनी दिनांक ११/०९/०४ चे पत्राद्वारे कायदेशीर सल्ला दिलेल आहे. या व्यवहारा संबंधी नगरपंचायत व संस्थान यामध्ये प्रत्यक्ष काही लेखी करार झालेला दिसत नाही. सबब जिल्हा परिषद शाळेचे जागेचे हस्तातंरण करावयाचे झाल्यास व्यवस्थापन समितीचे त्या संदर्भात स्पष्ट ठराव करुन नगरपंचायतीकडून हस्तांतरणाच्या शर्ती स्पष्टपणे ठरवून घ्याव्यात. नव्यानेच अमलात आलेल्या श्रीसाईबाबा संस्थान ट्रस्ट (शिर्डी) २००४ चे कलम १७(०३) अन्वये संस्थानचे स्थावर मिळकतीचे हस्तांतरणास शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या व्यवहारासंबंधीचे विद्यमान व्यवस्थापन समितीचे मत शासनापुढे मांडता येईल, त्यासाठी हस्तांतरणास शासनाची परवानगी मिळणेसाठी अर्ज करावा असे मत श्री.पी.डी.गुजराथी, ॲडव्होकेट,कोपरगाव यांनी वरील पत्राद्वारे कळविले आहे.

श्री.पी.डी.गुजराथी, ॲडव्होकेट यांचे उपरोक्त पत्राबाबत दि.२१/१०/२००४ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा होउन, सदरहू जिल्हा परिषद शाळेच्या (आरक्षण क्र. ९,१० व १२ मीटर रस्ता) जागेस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ची मालकी हक्काची नोंद करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदरहू जागेवर शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत

तळमजला व पहिल्या मजल्यावर दुकानकेंद्रे, दुस-या मजल्यावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) उपयोगासाठी बांधकाम करणेसाठी मान्यता देण्यात आली. त्यासाठी शाळा संस्थानचे साईउद्यान इमारतीत तात्पुरती स्थलांतरीत करण्यात यावी असे सदरहू सभेतील निर्णय क्र. ३४ अन्वये ठरले.

जिल्हा परिषद शाळेसाठी नवीन इमारतीचे बांधकाम करणेकरीता शिर्डी सर्व्हे क्र.६ (आरक्षण क्र. ८) मधील ४५ आर १४ चौ.मि. इतके क्षेत्र संस्थानतर्फे खरेदी करण्यात आले असून उर्वरीत १२ आर ५१ चौ.मि. क्षेत्रासाठी भूसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. भूसंपादनाबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे मार्फत पुढील कार्यवाही चालू आहे.

आता शिर्डी नगरपंचायत यांनी दिनांक ११/०५/२००५ चे पत्राव्दारे कळविले आहे की, शासनाने मंजूर केलेल्या फेरबदल प्रस्तावानुसार आरक्षण क्र. ९ व १० (स.नं.१) मधील नगरपंचायतीच्या मालकीच्या जागेत दुकान केंद्राचे बांधकाम नगरपंचायतीने करावयाचे आहे. नियोजीत बांधकाम आराखडे मा. सहाय्यक संचालक नगररचना, अहमदनगर यांचेमार्फत मा. संचालक, नगररचना, पुणे यांचेकडे मंजुरीसाठी सादर केलेले आहे. सदर बांधकामापैकी दुसरा मजला श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी यांना देण्याचे यापुर्वी निश्चित झालेले आहे. दुस-या मजल्याचे बांधकाम व दर्शन रांगा , तळमजल्यावर ०५ दुकाने व पहिल्या मजल्यावरील १० दुकाने यांचे बाजार मूल्य अंदाजे ३.०२ कोटी इतकी होत आहे. आरक्षण क्र.८, स.नं.६ या ठिकाणी जिल्हा परिषद शाळा विकसीत करुन इमारतीच्या विकासाची अंदाजीत किंमत रु. २.७५ कोटी मोबदल्यात शिरडी नगरपंचायत वरील बांधकाम हस्तांतरण करण्यास तयार आहे.

याबाबत शिर्डी नगरपंचायतीच्या सभेपुढे ठरावास मान्यता घेण्यात येईल. तरी सदर प्रस्तावाचा सहानुभूती पूर्वक विचार करुन नगरपंचायतीस सहकार्य करावे अशी विनंती शिरडी नगरपंचायत यांनी केलेली आहे.

शिरडी नगरपंचायत यांनी कळविल्याप्रमाणे संस्थानकडे हस्तांतरण करावयाचे बांधकाम व त्याचे मूल्य यांचा तपशील खालीप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | क्षेत्रफळ चौ.मि. | बांधकामाचा दर प्रती चौ.मि | बाजारभावा प्रमाणे दर प्रती चौ.मी. | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | बांधकाम मूल्य | बाजार मूल्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ३= ३x४ | ७=३x५ |
| ०१ | ऑडीटोरीअम, बहुउद्देशीय हॉल | १४८९ | ७०००/- | १५०००/- | १०४२३०००/- | २२३३५०००/- |
| ०२ | दर्शनरांग | ३२५ | ७५००/- | १५०००/- | २४३७५००/- | ४८७५०००/- |
| ०३ | तळ मजल्यावरील ५ दुकाने व पहिल्या मजल्यावरील १० दुकाने एकूण १५ दुकाने | ८२.५० | ७०००/- | २०००००/- (प्रती दुकान दोन लाख प्रमाणे ) | ५७७५००/- | ३००००००/- |
| | | | | एकूण रक्कम | १३४३८०००/- | ३०२१००००/- |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) यांचेतर्फे आरक्षण क्र. ८ (सर्व्हे क्र.६) येथील जमिनीवर शाळा इमारत बांधकामासाठी करण्यात येत असलेल्या अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | एकूण ४५ आर १४ चौरस मिटर क्षेत्र खरेदीसाठी रुपये ५५,०००/- प्रती आर भावाने खरेदी केलेल्या जमिनीची एकंदर किमंत | ३१,१८,५००.०० |
| ०२ | भूसंपादनाची कार्यवाही चालू असलेल्या १२ आर ५१ चौ.मि. क्षेत्रासाठी अपेक्षित खर्च रुपये ३,००,०००/- प्रती आर प्रमाणे | ३७,५३,०००.०० |
| ०३ | शाळा इमारतीचे बांधकाम करणेसाठी अपेक्षित खर्च | २,०१,३०,८६०.०० |
| | एकूण अपेक्षित अंदाजे खर्च | २,७०,०२,३६०.०० |

जिल्हा परिषद शाळा इमारत विकसीत करणेसाठी संस्थानला वरीलप्रमाणे अंदाजे रुपये २.७० कोटी इतका खर्च येणार आहे. त्याचे मोबदल्यात नियोजीत दुकानकेंद्र बांधकामापैकी दुस-या मजल्याचे बांधकाम, दर्शनरांगा व पहिल्या मजल्यावरील पंधरा दुकाने हस्तांतरण करण्याची तयारी शिर्डी नगरपंचायत यांनी दर्शविलेली आहे. या बांधकामाचे बाजारमूल्य अंदाजे रुपये ३.०२ कोटी इतके होत असल्याचे नगरपंचायतीने नमूद केले आहे.

दि. २१/१०/२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३४ अन्वये जिल्हा परिषद शाळेच्या जागेस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे मालकी हक्काची नोंद करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि; जिल्हापरिषद व नगरपंचायत यांनी यास हरकत घेतलेली आहे. नगरपंचायत यांनी कळविलेल्या बाजारमूल्याबाबत तज्ञ आर्किटेक्ट/व्हॅल्युअरचा सल्ला घेणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी उच्च न्यायालय खंडपीठ; औरंगाबाद येथे उत्तम रंभाजी शळके व इतर विरुध्द दि.

स्टेट ऑफ महाराष्ट्र व श्री साईबाबा संस्थान शिर्डी रिट पिटीशन क्रमांक ३९५१/२००५ दाखल झालेला आहे. त्यामध्ये शासन परिपत्रक दिनांक १४/०८/२००२ व १२/०४/२००५ ला आव्हान केले असून जिल्हा परिषदेची शाळा साईउद्यान इमारतीमध्ये स्थलांतरीत करणे तसेच आरक्षण क्रमांक ८ सर्व्हे नं. ६ मध्ये शाळेचे बांधकाम करणे इत्यादी बाबींना आव्हान केलेले आहेत. तसेच त्यांनी खालीलप्रमाणे ना. कोर्टास विनंती केली आहे.

१. जि.प. शाळेच्या जागेचे हस्तांतरण करणे बाबत दिनांक १४/०८/२००२ चा शासनाचा आदेश रद्द करणे.

२. शासन निर्णय १२/०४/२००५ रद्द करणे.

३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१/०९/२००४ रोजी झालेला निर्णय चार (ड) रद्द करणे. सदर निर्णयामध्ये सध्या असलेली जि.प. शाळा साईउद्यान इमारतीमध्ये स्थलांतर करण्याचा निर्णय झाला आहे.

४. जिल्हा परिषदेचे शाळेचा ताबा प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दुकानदारांचे पुनर्वसन करणेसाठी (शासनाचे निर्णय दि. १४/०८/२००२ व १२/०४/२००५ अन्वये ) स्थगिती देणेत यावी.

याबाबत मा.ना. कोर्टाने साईउद्यान इमारतीमध्ये जि.प. शाळा स्थलांतरासाठी स्थगिती आदेश दिलेला असून तो (स्टे टू कन्टीन्यू) चालू आहे. सदर रिट पिटीशन मध्ये नगरपंचायत शिरडी यांना पक्षकार केले नाही. नगरपालीकेने वर सूचविलेला प्रस्ताव दि.११/०५/२००५ हा नगरपंचायत, संस्थान व जि.प. यांची आपसातील बाब आहे. नगरपंचायत शिर्डी व जि.प. शासन यांचेमध्ये झालेल्या पत्रव्यवहाराची माहिती घेवून पुढील कार्यवाही करता येईल.

सदरची बाब न्याय प्रविष्ट आहे तसेच शाळा स्थलांतरासाठी स्थगन आदेश आहे. स्थगन आदेश उठल्यानंतर जि.प. , नगरपंचायत व शासन यांचेशी विचार विनीमय करुन पुढील भूमिका ठरविण्यात येईल. दरम्यान स्थगन आदेश उठविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच नगरपंचायत यांनी कळविल्याप्रमाणे रु.३,०२,१०,०००/-मात्र रकमेचे बांधकाम संस्थानकडे हस्तांतरण करावयाचे कळविले आहे. सदर बांधकामाचे मुल्यांकन संस्थान आर्किटेक्ट यांचेकडून करुन घेण्यात यावे. या अटीवर वरील नमूद केलेले बांधकाम हस्तांतर करणेस मान्यता देणेत आली.

सत्य प्रत

प्रशासकीय अधिकारी,
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/विधी अधिकारी)

**विषय नं.३६.** **दरखास्त क्र.१/९० श्री साईबाबा संस्थान शिर्डी विरुध्द महाराष्ट्र शासन व दरखास्त क्र. ५/९० सय्यद रतनभाई विरुध्द महाराष्ट्र शासन /संस्थान वगैरे प्रकरणी रिट पिटीशन क्र.५८४९/२००४ मध्ये संस्थानतर्फे दाखल करण्यात आलेल्या शपथपत्रास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.३६७.** श्री साईबाबा संस्थान,शिरडीने महाराष्ट्र शासनाकडे मोफत सर्व्हे नं ०१ पैकी ३० गुंठे जागेचीमागणी केलेनंतर सदर जागा महाराष्ट्र शासनाने दि ०१/०७/१९७४ चे आदेशान्वये ग्रामपचांयत शिरडी यांचेकडून संस्थानला देणेसाठी काढून घेतली.

उपरोक्त जागा संस्थानला प्रत्यक्षात प्राप्त होणे अगोदरच त्या जागेमधील दुकानदार श्री. सय्यद रतनभाई वगैरे यांनी महाराष्ट्र शासन, तहसिलदार यांचे विरुध्द मे. सिव्हिल जज्ज, सिनिअर डिव्हीजन, अहमदनगर यांचे कोर्टात रे.मु.नं ६००/७६ चा दावा दाखल केला व त्यामध्ये संस्थान पक्षकार म्हणून सामिल झाले. प्रस्तुत दाव्यात वादीना प्रतिवादींनी जागेतून बेकायदा काढू नये व ते भाडेकरू असल्याचे जाहीर व्हावे अशी विनंती केली होती. परंतु प्रस्तुतचे दाव्यात वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दि २८/०८/१९७९ रोजी सुलेनामा होऊन त्या जागेमध्ये असलेल्या १०१ दुकानदारांची व्यवस्था खालीलप्रमाणे करण्याचे ठरले.

| | | |
|---|---|---|
| ०१ | स.नं.१ मधील जागेचा ताबा संस्थानला मिळालेनंतर संस्थानने बांधून द्यावयाची | ४५ दुकाने |
| ०२ | स.नं. १७० मध्ये संस्थानने बांधलेल्या गाळयात करावयाची. | ३१ दुकाने |
| ०३ | मा.जिल्हाधिकारी यांनी २५ दुकानांसाठी जागा द्यावी | २५ दुकाने |
| | एकूण | १०१ दुकाने |

उपरोक्त प्रमाणे सुलेनामा झालेनंतर त्यांची अंमलबजावणी होणेसाठी श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांचेतर्फे कोपरगांव येथील मे. सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन, यांचे कोर्टात दरखास्त क्र. १/९० श्री साईबाबा संस्थान विरुध्द सय्यद रतनभाई दाखल करण्यात आली आहे व त्यामध्ये

सुलेनाम्याची अंमलबजावणी करून मागितली आहे. म्हणजेच या सुलेनाम्याची अंमलबजावणी होण्यास त्यावेळी संस्थानची सहमती होती.

संस्थानने दरखास्त क्र. १/९० दाखल केल्यानंतर श्री. सय्यद रतनभाई वगैरे यांनी महाराष्ट्र शासन व संस्थानचे विरोधात मा. सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन, यांचे कोर्टात दरखास्त ५/९० दाखल केलेली आहे. त्यामध्ये संस्थानने कैफियत देतांना बदलेले परिस्थितीनुसार उचित अशी वेगळी भूमिका घेतली आहे. आता स. नं. १ ची जमीन शिर्डी विकास आराखडयात बगीचासाठी आरक्षित दर्शविलेली असल्यामुळे बदललेल्या परिस्थितीमुळे सुलेनाम्याची अंमलबजावणी करणे शक्य नसल्याचे संस्थानने कैफियतीमध्ये आपले म्हणणे दिलेले आहे.

मध्यंतरी सन २००२-२००३ साली शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी प्रस्तुतचे स.नं १ च्या जमीन क्षेत्रावरील आरक्षण क्र. १३ नुसार बगीचा व दुकान गाळयांबाबत विकसन यंत्रणा संस्थान ऐवजी शिरडी नगरपंचायत असावी अशी विनंती संस्थानला केली. त्यानंतर दिनांक २९/०२/२००२ रोजीचे संस्थानचे ठरावाप्रमाणे आरक्षण क्र.१३ करिता दुकान गाळयासाठी विकसन यंत्रणा शिरडी नगरपंचायत असावी, असा प्रस्तावास मान्यता देणेत आली.

सन २००२-२००३ मध्ये नगरपंचायती मार्फत तसेच दुकानदारांमार्फत प्रस्तुत जागेवर बांधावयाच्या दुकानांबाबत प्लॅन्स बनविण्यात आले.टाऊन प्लॅनिंगचा सल्ला-तथा - मान्यता याकामी लागणार होती, परंतु सदर प्रकरणी पुढे चालना मिळाली नाही.

त्यानंतर शासनामार्फत शिर्डी येथे अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली त्यामध्ये सर्व्हे नं १ मधील ३० गुंठे जागेतील दुकानांचे बाबत " जैसे थे परिस्थिती " ठेवण्याचा आदेश दि १९/१२/२००३ रोजी दरखास्त क्र ५/९० वर ) (श्री.रावसाहेब मुरलीधर गोंदकर यांनी सादर केलेल्या अर्जावर) मा. सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन कोर्टाकडून देण्यात आला. त्यानंतर दिनांक २१/०५/२००४ रोजी याच अर्जावर मा. कोर्टाने सविस्तर आदेश देतांना पर्यायी जागा दिल्याशिवाय ४५ दुकानदारांना काढून टाकू नये, ५६ दुकानदारांना मात्र सुलेनाम्याप्रमाणे हक्क राहिलेला नाही कारण ते संस्थानने बांधलेल्या गाळयात गेले नाहीत अशा आशयाचा आदेश केला.

दि.१९/१२/२००३ रोजी मा. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे "स्टेटस को" निकालानंतर संबंधीताकडून "स्टेटस को " ( जैसे थे ) स्थितीचे पालन व्हावे या करिता श्री. रावसाहेब मुरलीधर गोंदकर यांनी मध्यंतरीचे ( दि १९/१२/२००३ ते १०/०५/२००४ ) काळात मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्रं २९५९/०४ देखील दाखल केले होते. त्याबाबत " Writ petition has before Division Bench Petitioners to circulate this petition before Division Bench as and when required,if necessary " असा मा. उच्च न्यायालयाने निकाल दिला.

त्यानंतर मा.जिल्हा न्यायालय, मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयामध्ये खालील प्रमाणे प्रकरणे प्रामुख्याने ५६ दुकानदारामार्फत दाखल करणेत आले परंतु मा. कोर्टाने त्यांचे म्हणणे मान्य केलेले नाही

१) श्री नुरा छगनभाई व इतर विरुध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट्र अपिल क्रं ३७/२००४ दिनांक २८/०५/२००४ रोजी सदर अपील फेटाळण्यात आलेले आहे.

२) रिट पिटीशन नं ३८१३/२००४ दाखल तारीख ३१/०५/२००४ चांदमल गोपालचंद लोकचंदानी विरुध्द १) दि स्टेट ऑफ महाराष्ट्र ३) साईबाबा संस्थान शिरडी सदर रिट पिटीशन मा. कोर्टाने दिनांक १९/०७/२००४ रोजी फेटाळले आहे.

३) लेटर पेटेंट अपील नं १०४/०४ दाखल तारीख १९/०७/२००४ चांदमल गोपालचंद लोकचदांनी विरुध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट्र ३) श्री साईबाबा संस्थान,शिरडी सदर लेटर पेटेंट अपील मा. कोर्टाने दिनांक ०१/०२/२००५ रोजी फेटाळले आहे.

४) रिव्ह ॲप्लिकेशन नं ४५३५/२००५ चांदमल गोपाळचंद लोकचंदानी विरुध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट्र

५) स्पेशल लिव्ह पिटीशन नं २०९८/२००५ चांदमल गोपाळचंद लोकचंदानी विरुध्द स्टेट ऑफ महाराष्ट्र ३) श्री साईबाबा संस्थान दाखल तारीख १९/०७/२००४

मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर प्रकरण दिनांक २८/०२/२००५ रोजी फेटाळले आहे.

त्यानंतर महाराष्ट्र शासनामार्फत दिनांक २०/०४/२००५ रोजी संबधित ५६ दुकानदारांची दुकाने काढून टाकणेत आलेली आहेत. व उर्वरित ४५ दुकानदांराचे संदर्भात रिट पिटीशन क्र ५८४९/२००४ मा. उच्च न्यायालयात दाखल केले आहे सदर रिटपिटीशन मध्ये खालील प्रमाणे विनंती मा. कोर्टास केलेली आहे.

०१. दुकानदारांचे समवेत झालेला सुलेनामा ( २०-०८-७९ ) रद्य व्हावा.

०२. ४५ दुकानदारांनी त्यांचे जागेचा ताबा विकास आराखडयाचे अंमलबजावणीसाठी द्यावा.

०३. नगरपंचायतीने दुकानदारांची सर्व्हे नं १७० मध्ये व्यवस्था करावी.

०४. मा. कोपरगांव कोर्टाचे दि २१/०५/२००४ चे आदेशास स्टे मिळावा.

उपरोक्त रिट पिटीशनचे बाबत संस्थानचे शपथपत्र दिनांक २८/०६/२००५ चे दाखल केले आहे.प्रशासकीय अधिकारी श्री.आर.एस.साबळे यांचे सहीचे सदरचे शपथपत्र दाखल आहे.

सदरचे शपथपत्रातील माहिती पूर्वीचे शपथपत्र (रिट पिटीशन३८१३/२००४चांदमल लोकचंदानी विरुध्द संस्थानमधील शपथपत्राप्रमाणे आहे व त्यात प्रामुख्यांने खालील बाबी नमूद आहेत. सदर शपथपत्र माहितीसाठी व मान्यतेसाठी सादर

०१. सर्व्हे नं १-१/अ-१/अ क्षेत्र ३० गुंठे जागा शासनाची आहे सदरची जागा त्रिकोणी आहे.

०२. सुलेनामा सन १९७९ मध्ये होऊनही संबंधित दुकानदार प्रस्तुतचे जागेवर राहिले संस्थानने शेवटी दरखास्त नं. ०१/९० दाखल केली आहे काही दुकानदारांनी त्यांची दुकाने हस्तातंरीतही केली आहेत.

०३. टाऊन प्लॅनिंग ॲक्टचे अंमलबजावणी शिरडी येथे झाली आहे.विकास आराखडयाप्रमाणे प्रस्तुत जागेतून ९ मिटर रस्ता जातो त्याप्रमाणे सदर रोडचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. सुलेनाम्याचे आधार घेऊन दुकानदारास दुकाने मागण्याचा अधिकार नाही .डेव्हलपमेंट प्लॅनमुळे सुलेनामा निरर्थक झालेला आहे.

०४.पालखी रस्त्यासाठी संस्थानने रक्कम रुपये १,२३,४२२६५/- अदा केले आहेत. त्याबाबतचे भूसंपादनास रिट पिटीशन २१८३/२००३ मध्ये आव्हान दिले होते,

परंतु सदर रिट पिटीशन फेटाळणेत आले.

०५.सार्वजनिक कामासाठी आता प्रस्तुतचे क्षेत्र दर्शविलेले आहे.

०६. शिर्डी येथे येणारे भक्तांचा ओघ लक्षांत घेता सदर जागा दुकानदारांकडून मोकळी होणे आवश्यक आहे. बाकीचे रस्त्याचे भागावरील दुकाने या अगोदरच काढली आहेत.

०७. वरील बाबीचा विचार करता सिव्हिल जज्ज, सिनिअर डिव्हीजन, कोपरगांव यांचा दिनांक २१/०५/२००४ चा या दुकानदारांना संरक्षित केलेला आदेश रद्द व्हावा.

अशा आशयांचे उपरोक्त शपथ पत्र दिनांक १७/०६/२००५ रोजी सादर केलेले आहे. माहितीसाठी व मान्यतेसाठी सादर

उपरोक्त रिट पिटीशनमध्ये नगरपालिकेने व शासनाने पुनश्च ॲफिडेव्हीट दाखल केलेले असून आरक्षण क्रमांक १३ ऐवजी आता १३ अे बगीचा साठी व १३ ब दुकान गाळयासाठी आरक्षण आहे विकसन यंत्रणा संस्थान आहे. शिरडी विकास आराखडयाप्रमाणे ९ मिटर रस्ता व नगर-मनमाड रोड यांचे प्रस्तुत विषयांकित सर्व्हे नं. ०१ पैकी ३० गुंठे जागेपासूनचे अंतर विचारात घेता त्या ठिकाणी दुकानगाळे बांधकाम करणे शक्य होणार नाही असे ॲफिडेव्हीट म्हणणे दाखल केले आहे.

प्रकरणी ५ आठवडया नंतर तारीख ठेवणेत आली आहे. मूळ जागा सर्व्हे नं १ पैकी ३० गुंठे शासनाची आहे व रिट पिटीशनही शासनामार्फत दाखल आहे अशा परिस्थितीत प्रकरणी शासनाशी विचार विनिमय करून पुढील कार्यवाही करता येईल त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.३७. प्रशासकीय बाबी आणि/किंवा विश्वस्तनिधीच्या विनियोगाबाबत शासनाची विहीत पूर्व मंजूरी घेणेबाबत**

**निर्णय क्र.३६८. (अ)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी ) अधिनियम, २००४ नुसार दिनांक २३ ऑगष्ट, २००४ चे अधिसूचने अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समितीने पहाणेस सुरुवात केलेली आहे. या अधिनियमातील कलम १७ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार व कलम २१ मध्ये विश्वस्तनिधीचा विनियोग यांबाबत मार्गदर्शक तत्वे-तथा-नियम दिलेले आहेत. या व इतर कलमांतील तरतुदीनुसार काही बाबींमध्ये, धोरणात्मक प्रशासकीय कार्यपध्दती / नियमावली आणि / किंवा विश्वस्तनिधीच्या विनियोगास शासनाची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त विविध तरतुदींन्वये विश्वस्तव्यवस्थेच्या विविध विभागांमार्फत महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे एकूण ४३ प्रस्ताव मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ०१ प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी पाठविण्यांत आला होता. शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे आतापर्यन्त सादर प्रस्तावांपैकी ०२ प्रस्तावांना मान्यता मिळालेली आहे. इतर प्रस्ताव अद्याप मान्यतेसाठी विचाराधीन आहेत.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ मधील विविध तरतुदींना अनुसरुन, महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाने दिनांक १३ मे, २००५ चे संदर्भीय गोपनीय पत्रानुसार पुढील प्रमाणे सुचित केले आहे. या पत्राची छायांकित प्रत, सहपत्रासह सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आली होती ती **सोबत परिशिष्ट "अ"** म्हणून ठेवण्यात आलेली आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

"मा.उच्च न्यायालयाने, सोमनाथ जे.उबाळे विरुध्द उपसंचालक, शिक्षण विभाग, पुणे यांच्या महाराष्ट्र लॉ जर्नल ९४९, या २००५ (१) या दाव्याच्या निकालातील निष्कर्षांनुसार, विश्वस्तव्यवस्थेने प्रशासकीय कामकाजास आणि/किंवा विश्वस्तनिधी विनियोगाबाबत केलेल्या कार्यवाहीस, कार्योत्तर मंजूरी देणे शासनास कायदेशीररित्या शक्य होणार नाही. याकरीता अशा प्रस्तावांच्या बाबतीत, अधिनियमातील तरतुदींनुसार, नियमानुसार जेथे शासनाच्या पूर्व मंजुरीची आवश्यकता असेल, असे प्रस्ताव शासनाकडे न चुकता पूर्व मंजुरीसाठी पाठविण्यात यावेत. या निर्देश तथा मार्गदर्शनाची आस्थेवाईकपणे नोंद घेण्यात यावी."

उपरोक्त परिच्छेदातील विवेचनानुसार व संदर्भीय पत्रातील निर्देशांनुसार, अधिनियमातील विविध तरतुदींनुसार आवश्यक असेल त्या प्रकरणी शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक असून, कार्योत्तर मंजूरीसाठी यापुढे प्रस्ताव पाठविणे अप्रस्तुत राहील, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- सर्व विभाग प्रमुख)

**विषय नं.३८.** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे अधिनियम, नियम, विनियम या संबंधात तरतूदी सुचविणे व तदनुसार प्रारुप तयार करणेचे कामी मा.श्री सुधाकर जोशी, आय.ए.एस. ( निवृत्त), पुणे यांची कन्सल्टंट म्हणून नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६९.** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई-३२,दि.२३/०८/२००४ चे राजपत्राने, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ क्रं.एम.सी.एच.सी.१००३(१६) का.१७ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ (२००४ चा महा.१४) चे कलम ५ मधील पोटकलम(१) आणि त्या सोबत पोटकलम (२) अन्वये, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करुन त्याप्रमाणे कारभारही दि.२३/०८/२००४ पासून सुरु झालेला आहे.

दि.०१/०९/२००४ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये प्रचलित कार्यपध्दती योजना व विकासकामे पुढील निर्देश होईपर्यंत सुरु ठेवणे बाबतची सर्वसाधारण चर्चा होवून आवश्यक ते नियम/विनियम तयार होईपर्यंत राज्य शासनाकडून विशिष्ट बाबींमध्ये निर्देश होईपर्यंत अथवा व्यवस्थापन समितीकडून वेळोवेळी अंतिम निर्णय/निर्देश होईपर्यंत तूर्त प्रचलित कार्यपध्दतीने कामकाज तथा योजना विकासकामे आदी सुरु ठेवणेबाबत मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त अधिनियमातील ११ (६) चे तरतुदीनुसार समितीस आपल्या कार्यपध्दतीचे नियमन करण्यासाठी व कामकाज चालविण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्यातील नियमांशी सुसंगत होतील असे विनियम करता येतील,असे आहे.

अधिनियमातील तरतूद १८ (१) नुसार सल्लागार परिषद असेल व १८(४) नुसार सल्लागार परिषदेचे कार्य व कर्तव्ये ही विनियमात निर्धारीत करुन दिल्याप्रमाणे असतील. सल्लागार परिषद आपल्या बैठकींमध्ये कामकाज पार पाडण्याबाबतची (गणपूर्तीसह) विनियमांव्दारे निर्धारित करुन देण्यात येईल, अशी कार्यपध्दती अनुसरील.

भक्तमंडळाबाबत १९(१) नुसार समारंभ,उत्सव,पूजा इ. ची शिफारस करण्यासाठी आश्रयदाते, आजीव सदस्य,सर्वसामान्य सदस्य,सन्मान्य सदस्य,सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल. सदस्यत्वाचा प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

कलम २१(२) नुसार छाननी समितीचे कामकाजासाठी मुंबई उच्च न्यायालयाने श्री.केवल आर. सेमलानी, मुंबई यांच्या प्रकरणातील रिट विनंती अर्ज क्रं.२००३ चा २७६४ यामध्ये दिलेले निर्देश आणि मार्गदर्शक तत्वे यांना अनुरुप अशी मार्गदर्शक तत्वे तयार करुन ती प्रकाशित करील, अशी तरतूद आहे.

उपरोक्त विषयी विनियम तयार करणेसाठी मा.श्री.सुधाकर जोशी, आय.ए.एस.(निवृत्त) (महाराष्ट्र अर्बन रिसर्च ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन ॲकॅडमी) यांचा सल्ला व मार्गदर्शन घेणेबाबत समक्ष झालेल्या चर्चेनुसार दि.०२/०४/२००५ रोजी पुणे येथे त्यांना संबंधीत कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

मा.श्री.सुधाकर जोशी यांनी सदर कामकाजासंदर्भात दि. ९ व १० जून २००५ रोजी संस्थानच्या बहुतांशी विभागांना समक्ष भेटी देऊन पाहणी केली आहे व मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात प्रशासकीय अधिकारी व सर्व अधीक्षक/विभाग प्रमुख यांचेशी चर्चा करुन मार्गदर्शन केले आहे.

दि.१७/०६/२००५ च्या पत्राने खालील अटी शर्तीवर त्यांनी सदर कामकाज हाती घेण्यास संमती कळविली आहे.

१) अधिनियम दुरुस्ती.
२) नियमावली दुरुस्ती.
३) सभा कामकाज नियमावली.
४) सल्लागार समिती नियमावली.
५) छाननी समिती नियमावली.
६) भक्त मंडळ सभा विनियम.
७) भक्त मंडळ सदस्यत्वाच्या अटी/शर्ती.
८) बांधकामे व भांडार खरेदी नियमावली.
**९)** कर्मचारी सेवा नियम.
१०) अधिकारी कर्मचारी आकृतिबंध.

**ही कामे दोन टप्प्या मध्ये हाती घेण्यात यावी.**

✧ टप्पा १) ... अ.क्र. १ ते ७ व

✧ टप्पा २) ... अ.क्र. ८ ते १०.

✧ **टप्पा क्र. १ संबंधी देकार खालील प्रमाणे -**

➢ कार्यपध्दती- संस्थानच्या अधिकाऱ्यांशी, विश्वस्तांशी समक्ष चर्चा करणे. संस्थानच्या कामकाजाचे परिनिरीक्षण करणे. प्रारुप प्रस्तावा संबंधी विश्वस्त मंडळ, सल्लागार समिती, छाननी समिती,भक्तमंडळ इत्यादीच्या सभांमध्ये विचार विनिमय करणे.

➢कालावधी - संस्थान कडून होकार प्राप्त झाल्या पासून ४ महिने.

➢कार्य शुल्क - रु.१,००,०००/-(रुपये १ लक्ष फक्त).

➢अदायगी - कामाच्या प्रगती प्रमाणे.

➢सुविधा - संस्थानकडून - आम्ही व आमचे प्रतिनिधी यांची सुयोग्य निवास व भोजन व्यवस्था संस्थानच्या खर्चाने करण्यात यावी.

अन्य सर्व खर्च जसे वाहतूक, तज्ञांचे सहाय्य,कार्यालयीन सहाय्य इ. आमच्या कडून करण्यात येईल.

✧ **टप्पा क्र. २ संबंधी देकार कामाची व्याप्ती अजमावून काही कालाने देण्यात येईल.**

श्री सिध्दी विनायक मंदिर न्यास,प्रभादेवी, मुंबई यांनी सदर ट्रस्ट शासन नियंत्रणाखाली गेलेनंतर न्यासाच्या कर्मचाऱ्यांचे सेवानियम करणे, कर्तव्ये व जबाबदारी निश्चित करणे, नियुक्ती बाबतचे नियम करण्याचे काम मा.श्री.सुधाकर जोशी,पुणे यांचेवर सोपविले होते व त्याप्रित्यर्थ रु.१,००,०००/-(रु.एक लक्ष मात्र) फी त्यांना मंजूर केलेली आहे. श्री सिध्दी विनायक न्यासाच्या मानाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) न्यासाचे कामाचा व्याप, विभागांची संख्या,विविध सेवा-सुविधा या बाबी विचारात घेता. श्री साईबाबा संस्थानचे नियम/विनियमाचे काम मोठया प्रमाणावर आहे. नव्याने अधिनियमांतर्गत घटीत झालेल्या संस्थानच्या सुकर व्यवस्थापनासाठी अधिनियमामध्ये महत्वाच्या दुरुस्ती करण्याची, तसेच व्यवस्थेच्या शासनाने प्रस्तावीत केलेल्या प्रारुप नियमामध्ये जरुर त्या तरतूदींचा समावेश करुन दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याने तसेच अधिनियमांतर्गत तरतूदी प्रमाणे विनियम व नियम करण्याचीही आवश्यकता असलेने सदर काम वरील प्रस्तावानुसार मा.श्री. सुधाकर जोशी, पुणे यांचेवर सोपविणेबाबत व त्यांना त्यांचे प्रस्तावातील सोई सवलती तसेच पहिल्या टप्प्याचे कार्यशुल्क रु. एक लाख देणेस मान्यता असावी. टप्पा क्रं २ बाबत त्यांचेकडून देकार व प्रस्ताव आलेवर त्यावेळी विचार करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्याच बरोबर सदरचे काम तातडीचे असल्याने लवकरात लवकर पूर्ण करुन देण्याची त्यांना विनंती करावी, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक, दप्तर विभाग/अधिक्षक,आस्थापना/मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.३९.** **श्री एस.बी.पटणे, माजी प्राचार्य, आय.टी.आय. यांचे न्यायालयीन प्रकरणाबाबत.**

**निर्णय क्र.३७०.** श्री.शिवलींग बसवण्णपा पटणे यांची नेमणूक दि.०९-०९-१९९१ पासून श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिरडी येथे प्राचार्य या पदावर करणेत आलेली होती. श्री.पटणे हे सेवेत असतांना त्यांचे विरुध्द खालील गैरवर्तनाबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२६३/९७ दि. २४/०३/१९९७ नुसार आरोपपत्र ठेवून, त्यांना चौकशीकामी कामावरुन तात्पुरते निलंबीत करण्यात आले होते.

०१. व्यवस्थापनास अंधारात ठेवून स्वतःचे अधिकारात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नासिक यांचेकडील कोर्सेसला प्रवेश दिला. रिक्त रहात गेलेल्या जागांबद्दल व्यवस्थापन मंडळास माहीती दिली नाही.

०२. व्यवस्थापन मंडळाची मान्यता न घेता स्वतःचे अधिकारात विद्यापीठाकडून मिळणारे मानधन स्वतःला व संबंधीत निदेशकांना वाटप केले.

०३. विद्यापीठाकडून प्राचार्यांच्या नांवे आलेले ड्राफ्टस् लेखाशाखेकडे न देता, स्वतःचे सहीने संस्थानचे बँकेतील खात्यात भरले.

०४. विद्यापीठ, बँका इत्यादी संस्थांशी विशिष्ट परवानगीशिवाय पत्रव्यवहार केला.

०५. विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या रक्कमेचा विनियोग व्यवस्थापन मंडळाचे पूर्व परवानगीशिवाय केला.

०६. अत्यावश्यक्ता नसतांना रजा राखीव निदेशक पद निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजूर करुन घेतला. त्यामुळे संस्थानला नाहक कायमस्वरुपी, आर्थिक अधिक बोजा पडला.

०७. सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात सेवेत असणारे गट निदेशक सर्वश्री आभाळे व शिंदे यांचेबाबत मुलाखतीचे वेळी व्यवस्थापन मंडळासमोर प्रतिकूल अहवाल सांगून मर्जीतील निदेशकांना बढती देण्याचे कारस्थान करुन व्यवस्थापन मंडळाची दिशाभूल केली.

०८. सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळविणेसाठी माहिती पुस्तिका तयार करतांना शासकिय नियमांचे बंधन व नियमातील तरतूदी लक्षात न घेता व्यवस्थापन मंडळाची दिशाभूल करुन पुस्तिका तयार केली. तसेच प्रवेश अर्जाचा नमूनाही विशिष्ट हेतू ठेवून तयार केला.

०९. शिरडी येथील रहिवाशी नसतांनाही शिरडी येथील रहिवाशी आहेत हे दर्शविण्यासाठी पुराव्यांची कागदपत्रे तयार करुन घेऊन सन १९९६-९७मध्ये औद्योगीक प्रशिक्षण संस्थेमध्ये काही विद्यार्थ्यांना जाणून बुजून नियमबाहय प्रवेश दिला.

१०. कर्मचा-यांमध्ये गटबाजी निर्माण करुन त्याचा फायदा स्वतःच्या स्वार्थासाठी करवून घेतला.

११. सन १९९६ - ९७ साली श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश देण्यासाठी गुणवत्ता यादी जाहीर करण्याची तारीख निश्चित केलेली असतांनाही त्यादिवशी जाहीर केली नाही.

१२. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नासिक यांचेकडील कोर्सेसला प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क म्हणून जमा करण्यात आलेल्या रकमांचा व कागदपत्रांचा तपशील ठेवला नाही.

१३. संस्थानच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या ट्रेडसाठी घेण्यात येणा-या मशिनरी खरेदीबाबत व विशेषतः " टुल ॲन्ड डाय मेकींग " ट्रेड सुरु करण्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी व टुल्स खरेदीकामी अभ्यासक्रमामध्ये नमूद केलेली मशिनरी व टुल्स विकत घेतांना व्यवस्थापन बोर्डाची दिशाभूल केली. अनावश्यक खर्च करण्यासाठी प्रस्ताव ठेवला व त्यामध्ये काही अनावश्यक महागडी मशिनरी घेण्याची शिफारस केली व त्यामुळे व्यवस्थापन मंडळाची दिशाभूल केली आहे.

१४. दि.०९-१२-१९९६ रोजी नोटीसीला दिलेले उत्तर पाहून श्री.पटणे यांनी वरिष्ठांचे इन सबोर्डीनेशन केले आहे. तसेच हे उत्तर उध्दटपणाचे वरिष्ठांचा अपमान करणारे अपशब्द असलेले व वरिष्ठांच्या अधिकाराला आव्हान देणारे आहे. तसे करणे सेवानियमाचे विरुध्द आहे.

सदरचे आरोपपत्रातील आरोपांची खातेचौकशी कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२३-०३-१९९७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८ नुसार प्रथमतः ॲड. श्री.बी.वाय.काळवाघे,कोपरगाव व श्री.एस.ए.कुलकर्णी, प्राचार्य, श्री संजीवनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोपरगाव व श्री.ल.श.द्रविड, (श्री.पटणे यांचे प्रतिनिधी) यांची चौकशी समिती नेमणेत आली. तथापि, सदरचे चौकशी समितीचे गठन स्कुलकोडमधील तरतुदीनुसार झालेले नसल्याचा मुद्दा चौकशीमध्ये उपस्थित झाल्याने मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०५-०७-१९९७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५६ नुसार ॲड.श्री.काळवाघे यांचे ऐवजी श्री.सोपान मा.धोर्डे, तत्कालीन विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान , शिरडी, श्री.दिनकर शंकर टेकणे,राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक, भेंडा तसेच श्री.भाऊ परबती बोलगे, (श्री.पटणे यांचे प्रतिनिधी) असे त्रिसदस्यीय चौकशी समितीचे गठन करण्यात आले. तथापि, प्रकृती अस्वस्थतेमुळे श्री.सोपान मा.धोर्डे, तत्कालीन विश्वस्त यांनी चौकशी समितीचे निमंत्रक म्हणून काम करणेस असमर्थतः व्यक्त करुन राजीनामा दिला. त्यामुळे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१८-०१-१९९८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६ नुसार ॲड.श्री.एस.एम.धोर्डे, तत्कालीन विश्वस्त यांचे ऐवजी ॲड.श्री.आर.डी. सोनी, तत्कालीन विश्वस्त यांची चौकशी समितीचे निमंत्रक म्हणून नेमणूक करणेत आली.

उपरोक्त चौकशी समितीने श्री.पटणे यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची चौकशी पूर्ण करुन त्यांनी त्यांचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल दि.२४-०७-२००२ रोजी संस्थानला सादर केला. खातेचौकशीमध्ये श्री.पटणे यांचे विरुध्द ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झाल्याने श्री.पटणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११७७०/२००२ दि.२०-१२-२००२ चे आदेशान्वये सेवेतून कमी (टर्मिनेट) करण्यात आले.सदरचे टर्मिनेशन आदेशासंदर्भात श्री.पटणे यांनी संस्थानचे विरुध्द मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण सोलापूर यांचे कोर्टात अपील क्र.४/२००३ दि.१८-०१-२००३ रोजी दाखल केले होते.

सदर अपील क्र.४/२००३ मध्ये मा.पिठासन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, पुणे विभाग, सोलापूर यांनी दि.२०-०९-२००३ रोजी खालीलप्रमाणे अंतिम आदेश ( जज्जमेंट )दिलेले आहेत.

Appeal No.4/2003

Judgement

**ORDER**

1. Appeal allowed with costs.
2. The recommendations of enquiry committee dt.-24-07-2002 and the decision of management to terminate appellant's service vide termination order dated 20-12-2002 is hereby quashed and set- aside.
3. The appellant shall be deemed to be continious service from the date of his termination till today and till he is actually reinstated in service by virtue of present order.
4. Appellant will be entitle to benefits of contituation of service including backwages from the date of suspension till he is reinstated in service by virtue of present order.
5. The management is directed to comply this order within a period of 90 days. However appellant shall be deemed to have joined the service as Principal after period of 60 days and there after he shall be entitle to full payment of salary (although he is not actually reinstated in the service by management and management shall start paying salary to the appellant).

6. The payment made during the suspension towards substance allowance and monthly payments as per this Tribunal's order while granting interim relief and payment made as per Hon'ble High Courts direction shall be taken into consideration while making payment of backwages.
7. Inform parties accordingly.

Date- 20/09/2003

( S.S.Wadkar)
Presiding Officer,
Addl.School Tribunal for
Pune Region , at Solapur

उपरोक्तप्रमाणे अपील क्र.०४/२००३ मध्ये मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांनी दि.२०-०९-२००३ रोजी दिलेले जज्जमेंट/अंतिम आदेशास स्थगिती मिळावी व सदरचा आदेश बेकायदेशीर ठरवून, रद्दबादल होऊन मिळावा म्हणून संस्थानने श्री पटणे यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे १६ ऑक्टोबर २००३ मध्ये रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ दाखल केले.

सदरचे रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.२८-०४-२००४ रोजी खालील प्रमाणे अंतरीम आदेश केलेला आहे.

WP No.4723/03
Coram A.B. Naik, J

**Rule**

Respective Parties waive Service,
It is made clear that there will be stay to the back wages from the date of filing appeal before the school Tribunal, till the date of decision which is challenged in this petition.

Sd/-
28/04/2004

उपरोक्त आदेशा संदर्भात संस्थानने श्री.एस.बी.पटणे यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दि.०७-०६-२००४ रोजी लेटर्स पेटंट अपील क्र.९४/२००४ दाखल केलेले आहे.

लेटर्स पेटंट अपील क्र.९४/२००४ संदर्भात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथील मा.न्यायाधिश श्री.ए.पी.देशपांडे व श्रीमती व्ही.ए.नाईक यांचे डिव्हीजन बेंचने दि. २९-०६-२००५ रोजी आदेश करुन सदर लेटर्स पेटंट अपील क्र.९४/२००४ रिजेक्ट (Reject) केले असून संस्थान विरुध्द निर्णय दिलेला आहे.

श्री.एस.बी.पटणे यांना मागील काळातील वेतनासह (बॅक वेजेससह) पुर्ववत कामावर हजर करुन घेण्यात यावे आणि मा.उच्च न्यायालय व अतिरीक्त शाळा न्यायाधिकरण यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. तथापि,संस्थानला जर मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे दिनांक २९-०६-२००५ रोजीचे हुकूमा विरुध्द स्थगिती (स्टे) मिळणे कामी मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे अपील दाखल करावयाचे किंवा कसे याबाबत संस्थानने निर्णय घ्यावयाचा आहे.असा लेखी कायदेशीर अभिप्राय संस्थानचे हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे,औरंगाबाद यांनी दिला आहे.

सबब, मा.अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांचे दि.२०-०९-२००३ रोजीचे आदेशास अनुसरुन व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे दि.२९-०६-२००५ रोजीचे निर्णयास अनुसरुन श्री.एस.बी.पटणे यांना श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्राचार्य या पदावर पुर्ववत कामावर हजर करुन घ्यावयाचे झाल्यास त्यांना मागील काळातील वेतन फरकापोटी सुमारे रु.६,२५,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख पंचवीस हजार मात्र ) एवढी रक्कम तसेच कोर्ट खर्चाची रक्कम आदा करावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.एस.बी.पटणे यांना श्री.साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्राचार्य या पदावर पुर्ववत कामावर हजर करुन घ्यावे व दिनांक २४.०३.१९९७ पासून कामावर हजर करुन घेईपर्यन्तचे कालावधीतील वेतनापोटी त्यांना देय होणारी फरकाची रक्कम व कोर्ट खर्चाची रक्कम मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर व मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे हुकमानुसार आदा करण्यात यावी. तसेच या कार्यवाहीमध्ये अन्य मुद्यांदाखल गरज भासल्यास सोलापूर न्यायालयात सदर केसमध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडव्होकेट अशोक पाटील यांचा सल्ला घेण्यात येऊन, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना/कामगार अधिकारी)

**विषय नं.४०. सामुदायीक श्री साईसच्चरित पारायण सोहळयास परवानगी मिळणेबाबत नाट्य रसिक संच शिर्डी यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.३७१.** अध्यक्ष, नाटय रसिक संच,शिरडी यांनी दिनांक ०८/०७/२००५ चे पत्रानुसार सालाबादप्रमाणे ११ वा श्री साईसच्चरित सामुदायिक पारायण सोहळा शनिवार दि.०६/०८/२००५ ते रविवार दि.१४/०८/२००५ अखेर ९

दिवस संस्थान परिसरात साजरा करण्याचे योजिले असून मागीलवर्षी १३०२ साईभक्त सहभागी झाले होते यावर्षी ही संख्या १५०० पर्यंत वाढणेची शक्यता आहे. तरी आपण पारायण घेण्यास परवानगी द्यावी व खालील बाबतीत सहकार्य करावे अशी विनंती केली आहे.

०१) मंदीर परिसरात पारायण मंडप व व्यासपीठ उभारण्यास परवानगी द्यावी आणि सदरचा मंडप संस्थानमार्फत पुरविण्यात यावा.
०२) मंडपात लाईट , लाऊड स्पिकर व फॅनची व्यवस्था व्हावी.
०३) बाहेरगांवच्या कलाकार, कीर्तन, प्रवचनकार, भजनी व भारुड मंडळे यांची निवासाची व भोजनाची मोफत सोय व्हावी.
०४) समाप्तीचा प्रसाद प्रसादालयातून तयार करुन मिळावा (प्रसादासाठी लागणारा शिधा पारायणार्थीकडून संकलीत केला जातो).
०५) मंडपात ताडपत्री, सतरंजीची बिछायत मिळावी.
०६) संरक्षण, स्वच्छता, चौकशी व निवासस्थानाकडील बैठक व्यवस्था, ध्वनीक्षेपण या कामाकरीता लागणार जादा कर्मचारीवृंद संस्थानमार्फत पुरविण्यात यावा.
०७) प्रवाचक म्हणून एका पूजा-याची नेमणूक व्हावी.
०८) साईलीला मासिकामध्ये प्रसिध्दी दिल्यास बाहेरगांवच्या साईभक्तांनाही यांचा लाभ घेता येईल व त्यांनाही पारायणाचा आनंद मिळेल. तरी साईलीलामध्ये प्रसिध्दी द्यावी.

तरी गेल्या वर्षाप्रमाणे यावर्षी दिनांक ०६/०८/२००५ ते दिनांक १४/०८/२००५ या कालावधीत श्री साईसच्चरित पारायण सोहळयास परवानगी मिळावी,

संस्थान परिसरात नाट्य रसिक संच, शिरडी यांना श्री साईसच्चरित पारायण सोहळा शनिवार दिनांक ०६.०८.२००५ ते रविवार दिनांक १४.०८.२००५ अखेर ०९ दिवस साजरा करणेस परवानगी मिळणेबाबत व त्याकामी येणा-या रु.५५,०००.०० (अक्षरी रु. पंचावन्न हजार मात्र) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नाटय रसिक संच, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था यांचे संयुक्त विद्यमाने शनिवार दि.०६/०८/२००५ ते रविवार दि.१४/०८/२००५ अखेर ९ दिवस संस्थान परिसरात साजरा करण्यास मान्यता देण्यात यावी. या कार्यक्रमात श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था हे मुख्य असतील व नाट्य रसिक संच, शिर्डी हे दुय्यम असेल. श्री साईसच्चरित पारायण सोहळ्याचे नियोजन मा.कार्यकारी अधिकारी व मा. स्थानिक विश्वस्त यांचेशी सल्लामसलत करुनच करण्यात यावे असें ठरले.

(कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.४१. श्री साईबाबांचे टपाल तिकीट काढणेबाबत.**

**निर्णय क्र.३७२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. जादा वैद्यकीय बीलांबाबत.**

**निर्णय क्र.३७३.** संस्थान कर्मचारी व त्यावर अवलंबीत असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने मंजूर होतो. पण ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी केलेली रक्कम (रुपये ) | शिफारशीनुसार परताव्याची मान्य केलेली रक्कम (रुपये ) |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ.आशा श्रीराम पेंडसे | ३४०.०० | ३४०.०० |
| ०२. | श्री मनोज निवृत्ती वैद्य | १८,९३९.०० | --- |
| ०३. | श्री अविनाश मल्हारराव अदलिंग | ८,७६२.६६ | ६,५२४.०० |
| ०४. | श्री साईप्रसाद सुरेश जोरी | २३,३९३.२० | २२,८८७.०० |
| ०५. | श्रीमती योगिता अजय गरुड | २,३३०.०० | २,३३०.०० |
| ०६. | श्री निवृत्ती शंकर शिंदे | ९,७७४.११ | ८,६९९.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. श्रीसाईनाथ रुग्णालयासाठी लिनन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३७४.** श्रीसाईनाथ रुग्णालयातील लिनन दैनंदिन वापराने खराब झालेले आहे. तसेच सध्या वापरात असलेले बरेचसे लिनन जिर्ण झालेले आहे. त्यामुळे रुग्णालयात दररोजच्या वापरास लिनन कमी पडत आहे. तसेच दररोज वाढणारी रुग्ण संख्या, ऑपरेशन सख्या, ऑपरेशन थिएटर स्टाफ, डॉक्टर स्टाफ या सर्व विभागाचे दैनंदिन वापराकरिता लिनन आवश्यक आहे. याबाबत अधिसेविका कार्यालयाने लिनन खरेदी करुन मिळणेची मागणी केलेली आहे.

यापूर्वी सन २००० मध्ये लिनन खरेदी करण्यात आले होते. सदर लिनन मधील बरेच लिनन नित्याच्या वापराने निरुपयोगी झालेले आहेत.

दिनांक ०१/०६/२००५ चे मंजूर टिपणी मा.विश्वस्त, डॉ.एकनाथ बी. गोंदकर व मा. डॉ.पी.एल. तिवारी यांचे अवलोकनार्थ ठेवणेत आली होती. त्यावर त्यांनी अशी शिफारस केली आहे की, रुग्णालयासाठी लिनन खरेदी करणे अत्यावश्यक असल्याने सदर विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर ठेवून त्वरीत खरेदी विभागाकडून खरेदी करुन घेणेत यावी.

रुग्णालयासाठी खालीलप्रमाणे लिनन खरेदी करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ३,३२,५००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | लिनन प्रकार | रंग | साईज | आवश्यक लिनन | प्रत्येकी अंदाजे किंमत | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्रीरुग्ण पेटीकोट व ब्लाऊज | चॉकलेटी | एम.एल.ई. एल | ५०० नग | १६०/- | ८०,०००/- |
| ०२ | पुरुष रुग्ण शर्ट व पायजमा | हिरवा | एम.एल.ई. एल | २०० नग | २८०/- | ५६,०००/- |
| ०३ | पिलोकव्हर | पांढरे | - | १५० नग | ५५/- | ८,२५०/- |
| ०४ | ऑपरेशन गाऊन | हिरवा | १४ इंच नाडी | २०० नग | २००/- | ४०,०००/- |
| ०५ | मोठे होलशिट | हिरवा | - | १५०/- | १२५/- | १८,७५०/- |
| ०६ | लहान होलशिट | हिरवा | - | १५०/- | १००/- | १५०००/- |
| ०७ | डॉक्टर्स ऑपरेशन शर्ट व पायजमा | निळा | एम.एल.ई. एल बिना कॉलर | १५०/- | ३००/- | ४५०००/- |
| ०८ | आय टॉवेल | हिरवा | - | १०० नग | ६०/- | ६०००/- |
| ०९ | उश्या | रंगीत | - | ५० नग | ७०/- | ३५००/- |
| १० | ओं. टी. स्टाफ शर्ट व पायजमा | पारवा | एम.एल.ई. एल बिना कॉलर | २०० नग | ३००/- | ६०,०००/- |
| | | | | **एकूण रक्कम रुपये** | | **३,३२,५००/-** |

**(अक्षरी रुपये तीन लाख बत्तीस हजार पाचशे मात्र)**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक असणारे उपरोक्तप्रमाणे लिनन मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव यांचे सल्ल्याने खरेदी करणेत यावेत. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,३२,५००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कार्यालय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३.** **श्रीसाईबाबांच्या जीवनावर आधारित कॉम्पॅक्ट डिस्क (कॉम्प्यूटर सी.डी.रॉम) तयार करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३७५.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ निर्णयानुसार खालीलप्रमाणे सी.डी.तयार करुन घेणेस व त्याकामी येणारे अंदाजे रू. १,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | प्रती संचास अंदाजे खर्च रुपये पैसे | अपेक्षित अंदाजे मंजूर खर्च रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित कॉम्पॅक्ट डिस्क (कॉम्प्यूटर सी.डी.रोम ) | ५,००० नग | २०.०० | १,००,०००=०० |
| | | | एकूण खर्च - | १,००,०००=०० |

वरील तपशिलात नमूद केलेप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/६८७४/२००५दि.०२.०७.२००५ नुसार ११ निवडक कॅसेट/सी.डी.तयार करणा-या कंपन्यांना कोटेशन पाठवून ते दि. १२.०७.२००५ अखेर भरुन पाठविणेबाबत कळविण्यात आलेले होते.

| Sr. No | Name & Address | Sr. No. | Name & Address |
|---|---|---|---|
| 01 | A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai | 02 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03 | Dolby Music, Mumbai | 04 | Krunal Music Company, Mumbai |
| 05 | Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai | 06 | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai |
| 07 | Vandana Electronics, Mumbai | 08 | Audio Vision, Mumbai |
| 09 | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai | 10 | Sunrise Industries,Mumbai |
| 11 | S.S. Enterprises,Wadala- ( W ) Mumbai | | |

उपरोक्त पैकी खालीलप्रमाणे ५ सी.डी.निर्मात्यांकडून **दि.१२.०७.२००५ अखेर** कोटेशन्स प्राप्त झाली होती.

| Sr.No | Name & Address | Sr.No. | Name & Address |
|---|---|---|---|
| 01 | Sunrise Industries,Mumbai | 02 | Audio Vision, Mumbai |
| 03 | Vandana Electronics, Mumbai | 04 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 05 | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai | | |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असता, कोटेशनसादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | दर सर्व करांसहीत रुपये | ४% व्हॅट | सर्व करासहीत एकूण दर रुपये |
|---|---|---|---|---|
| 01 | Sunrise Industries,Mumbai | 15.25 | 00.61 | 15.86 |
| 02 | Audio Vision, Mumbai | 13.00 | 00.52 | 13.52 |
| 03 | Vandana Electronics, Mumbai | 12.75 | 00.51 | 13.36 |
| 04 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai | 12.90 | 00.51 | 13.41 |
| 05 | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai | 13.00 | 00.52 | 13.52 |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त तक्त्यातील मे.वंदना इलेक्ट्रॉनिक्स यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कॉम्प्यूटर सीडी रोम तयार करणेकामी आदेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. श्री.विकास मेहता,दिल्ली, लिखित चिल्ड्रेन्स श्रीसाईबाबा पुस्तक हिंदी भाषेत प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७६.** श्री.विकास मेहता,दिल्ली यांचे दि.०४.०७.२००५ चे फॅक्स पत्राव्दारे त्यांनी स्वत: लिहिलेले चिल्ड्रेन्स श्री साईबाबा हे हिंदी भाषेतील पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत प्रस्तूत केले असून, तत्संबंधित प्रकाशनाचे सर्व हक्क ते संस्थानला देणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

श्री.विकास मेहता,दिल्ली लिखित चिल्ड्रेन्स श्री साईबाबा हे हिंदी भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित केल्यास त्याचा लहान मुलांसाठी चांगला उपयोग होवून, मुलांना श्री साईबाबांविषयी ज्ञान व श्री साईबाबांची चित्रे गिरविण्याची सवय होणेसाठी उपयोग होवू शकेल.

तरी श्री.विकास मेहता,दिल्ली लिखीत चिल्ड्रेन्स श्री साईबाबा हे हिंदी भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत निर्णय होणेस व सदर पुस्तकाचे प्रथम प्रकाशन असल्याने ५,००० प्रती छपाई करून घेणेसाठी प्रती नगास अंदाजे रू.१००/- मात्र गृहीत धरून येणा-या रू.५,००,०००/- (अक्षरी रूपये पाच लाख) मात्रचे अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. चेंबर्स झाकणे खरेदी करणेबाबत**

**निर्णय क्र.३७७.** संस्थान परिसरामध्ये मंदिराचे बाजूस असलेल्या रोडमध्ये ड्रेनेज लाईन असून त्याठिकाणी ड्रेनेज लाईनचे चेंबरवर असलेली झाकणे ही छिंद्राची असल्याने त्या परिसरात साईभक्तांच्या वर्दळीच्या ठिकाणी दुर्गंधी येते त्यामुळे साईभक्तांच्या तक्रारी येतात. तेंव्हा तेथील चेंबरसाठी नवीन बंद झाकणे टाकणे गरजेचे आहे. तसेच नवीन धर्मशाळा (२०० रुम) परिसरात असलेली चेंबर झाकणे ही तुटलेली आहे. त्यामुळे तेथेही दुर्गंधी पसरते. तेथीलही झाकणे नवीन टाकणे आवश्यक आहे.

वरील दोन्हीही ठिकाणी २ फूट x २ फूट साईजचे कॉंक्रीट हेवी झाकणे फ्रेमसह अनुक्रमे १७ नग व १२ नग असे एकूण २९ नग झाकणे खरेदी करणे आवश्यक आहे. बाजारभावाप्रमाणे एका झाकणाची फ्रेमसह किंमत अंदाजे रुपये १,१३०/- मात्र असून एकूण २९ झाकणांसाठी अंदाजे रुपये ३२,७७०/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, २ फूट x २ फूट साईजचे कॉंक्रीट हेवी झाकणे फ्रेमसह एकूण २९ नग झाकणे कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३२,७७०/- चे खर्चास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. Request for allotment of land for constructing a Spiritual Arty Gallery-cum-Meditation Centre संदर्भात वर्ल्ड रिन्युअल स्पिरिचुअल ट्रस्ट १२१ महात्मा गांधी रोड, बॅंक ऑफ बरोडा, एफ.यु.ब्रॅंच, मुंबई-२३ यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.३७८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७.** **शिधा स्वरुपात देण्यात येणाऱ्या मदतीबाबत.**

**निर्णय क्र.३७९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८.** **दिनांक १४.०७.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक विश्वस्तसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.३८०.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९.०७.२००५ चे सभेत ठरलेप्रमाणे खालील खरेदीकामी निविदाधारकांनी/ कोटेशन्सधारकांनी देऊ केलेल्या दराबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय व मा.विश्वस्त श्री.पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांना देण्यात आले होते.

०१) सन २००५-२००६ प्रसादालय किराणा माल खरेदी
०२) सन २००५-२००६ प्रसादालयासाठी बासमती तांदूळ खरेदी
०३) सन २००५-२००६ विद्यूत, पाणीपुरवठा, स्वच्छता, बगीचा व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी
०४) आय.टी. विभागासाठी प्रिंटर्स खरेदी
०५) मुंबई कार्यालय, लेखाशाखा, साईनिवास, ध्वनीक्षेपण व रुग्णालय या विभागांसाठी ए.सी. खरेदी
०६) पाणीपुरवठा विभागाकडील पंपाकरिता पॅनेल बोर्ड खरेदी
०७) स्कूलबस व भक्तनिवासस्थान बसेसचे कुशनकाम, कलरकाम व कापडी कव्हर शिवणे
०८) महिंद्रा बोलेरो कॅम्पर व महिंद्रा मॅक्स पिकअप बॉडी बांधणेबाबत
०९) संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईबाबत
१०) एल.पी.जी. फायर हायड्रन्ट सिस्टिम लिकेजचे डिटेक्टर व गॅस फ्लो मिटरचे यंत्रणेबाबत.

त्यानुसार निविदाधारकांनी /कोटेशन्सधारकांनी देऊ केलेल्या दराची बंद पाकिटे उघडून निर्णय घेणेकामी सभा गुरुवार दिनांक १४.०७.२००५ रोजी दुपारी १.०० वाजता शिरडी येथे मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात आयोजित करण्यात आली होती.या सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या ते सोबत **परिशिष्ट " ब " म्हणून** ठेवण्यात आलेले आहे. त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/ विद्यूत विभागप्रमुख/अधिक्षक,प्रसादालय विभाग/वाहन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९.** **बासमती तांदूळ खरेदीबाबत. (सन २००५-२००६ प्रसादालय व कॅन्टीन माल वार्षिक खरेदीबाबत.)**

**निर्णय क्र.३८१.** सन २००५ सालामध्ये प्रसादालयासाठी आवश्यक ५००० क्विंटल तांदूळ खरेदीकामी इतर किराणा माल निविदेसोबतच सोना मसुरी, एच.एम.टी व सुंगधी चिन्नोर वाणाचे नमूने मागविण्यात आलेले होते. दिनांक ८.०५.२००५ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्रीसाईभक्तांना प्रसादभोजनात बासमती तांदूळाचा भात द्यावा असा निर्णय झालेने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करण्यात आलेली होती. त्यानुसार आलेल्या निविदा दिनांक८.०५.२००५ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेत आलेल्या आहेत. तसेच समक्ष नमूने बघून खात्री करुन पुढील निर्णय घेणेकामी मा.विश्वस्त श्री.पांडूरंग गमाजी अभंग, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे व श्री.शैलेश श्रीहरी कुटे यांची समिती नियुक्त करण्यात आली. त्यानुसार दिनांक १५.०७.२००५ रोजी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी बासमती तांदूळाचे आलेले नमूने समक्ष पाहून न्यूनतम दराचे खालीलप्रमाणे ०६ नमूने प्रत्येकी १०० ग्रॅम शिजवून खात्री केलेली आहे. त्यावेळी श्री.आर.एस. साबळे,प्रशासकीय अधिकारी, श्री.पी.बी.बोरावके,अधिक्षक,खरेदी, श्री.यू.पी.गोंदकर, अधिक्षक,भांडार, श्री.आर.बी.जोशी,लिपीक, खरेदी विभाग, श्री.आर.एम.कोते, वरिष्ठ लिपीक,प्रसादालय हे उपस्थित होते. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | प्रकार | १०० ग्रॅम शिजवून झालेले वजन | मूळ दर रुपये | शिजवून वजनानुसार येणारा दर रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.धनेश ट्रेडिंग कंपनी, अहमदनगर | श्री हॉर्स ग्रेन लॉग अखंड | ३०६ ग्रॅम | २१००.०० | ६८६.०० |
| ०२ | मे.गणेश एजन्सी, वैजापूर<br>समक्ष कमी केलेले दर | कोहिनूर फुटबॉल अखंड | ३३० ग्रॅम | २१११.००<br>२१०५.०० | ६४०.००<br>६३८.०० |
| ०३. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड दूरध्वनीवरुन कंपनीकडे संपर्क साधून दिलेले दर | कोहिनूर दुबार (ट्रॉफी) | ३२२ ग्रॅम | २१६६.००<br>२०९१.०० | ६७३.००<br>६४९.०० |
| ०४. | मे.कोचर ब्रदर्स, अमृतसर | डबल बुल नं.०१ आख्खा | ३०४ ग्रॅम | २२५०.०० | ७४०.०० |
| ०५. | मे.सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक | फ्लाईंग हॉर्स नं.०३ अखंड | ३१० ग्रॅम | २२८५.०० | ७३७.०० |
| ०६. | मे.सुपेकर प्रोव्हीजन स्टोअर्स,अहमदनगर | इंडिया गेट इंडिया फार्म, अखंड | २८५ ग्रॅम | ३२००.०० | ११२३.०० |

दिनांक ९.०७.२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेत कमीत कमी दरात चांगल्या प्रकारचा तांदूळ खरेदी करावा अशी चर्चा झालेली असल्याने वरीलपैकी मे.गणेश एजन्सी,वैजापूर यांचा कोहिनूर फूटबॉल ब्राण्ड अखंड रुपये २१०५.०० व मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड यांचा कोहिनूर दुबार (ट्रॉफी) रुपये २०९१.०० प्रती क्विंटल प्रमाणे विभागून खरेदी करावी, असे मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी सूचविलेले आहे.

त्यानंतर दिनांक १७.०७.२००५ रोजी मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, मा.विश्वस्त श्री. पांडूरंग गमाजी अभंग व श्री.कैलास गोविंदराव कोते यांनी वरील नमूने तसेच इतरही बासमती तांदूळाचे नमूने पुन्हा पहाणी करुन खालीलप्रमाणे नमुन्यांच्या प्रत्येकी एक ट्रक असा अंदाजे १५० क्विंटल तांदूळ प्रायोगिक स्वरुपात खरेदी करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | तांदूळाचा प्रकार | मूळ दर प्रती क्विंटल रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.धनेश ट्रेडिंग कंपनी, अहमदनगर | सुपर कोहिनूर बासमती दुबार | २५८०.०० |
| ०२ | मे.धनराज छगनलाल ॲण्ड कंपनी,वाशी | बासमती पिकरिक दुबार | २४५०.०० |
| ०३. | मे.कोचर ब्रदर्स, अमृतसर | डबल बुल नं.०१ | २२५०.०० |
| ०४. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड | सुपर कोहिनूर मिनी दुबार | २०२५.०० |
| ०५. | मे.गणेश एजन्सी, वैजापूर | कोहीनूर फुटबॉल | २०९९.५० (सुधारीत दर) |
| ०६. | मे.सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक | फ्लाईंग हॉर्स नं.०३ अखंड | २२८५.०० |

वरीलप्रमाणे आलेला माल प्रत्यक्ष वापरून खात्री करुन खरेदीबाबतचा पुढील निर्णय घेण्यात येईल अशा मा.अध्यक्ष महोदय यांनी सूचना दिलेल्या असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०. (अ) मौजे पिंपळवाडी, कोहकी ता.राहाता येथिल साठवण बंधा-याचे कामासाठी अनुदान देणेबाबत...**
**(ब)नियोजित असलेल्या विविध प्रकल्पांबाबत.**

**निर्णय क्र.३८२. (अ)** यापुर्वी जानेवारी, १९९८ ते जुन, २००२ या कालावधीत श्रीगणेश कारखान्या मार्फत संस्थानचे अनुदानातून एकूण आठ साठवण बंधा-यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यासाठी संस्थानने एकूण रु. ३७.८२ लक्ष मात्र इतके अनुदान अदा केलेले आहे. यामध्ये दगडी भिंत व गेटचा खर्च संस्थानने केलेला आहे व माती भराव, नाला खोलीकरण, रुंदीकरण तसेच पुढे नियमित देखभालीची कामे कारखान्याने केलेली आहेत. प्रत्यक्ष बांधकाम कारखान्याने केलेले असून कामाचे प्रगतीनुसार टप्प्या टप्प्याने झालेल्या खर्चाची प्रतीपुर्ती संस्थानने केलेली आहे.

यापुर्वी तत्कालीन व्यवस्थापन मंडळाचे दि. ३०/०६/२००२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३०१ अन्वये गणेश सहकारी कारखाना, गणेशनगर यांनी सादर केलेल्या खालील पाच बंधारे बांधणेकामी अनुदान देणेस मान्यता देण्यात आली होती.

| अ. नं. | बंधा-याचे नाव व स्थान | साठवण क्षमता द.ल.घ.फु. | एकुण अंदाजपत्रकीय किंमत रु. | दगडी भिंतीचा खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री गणेश बंधारा क्र.पिंपळवाडी १२ अ तुरकणे/सालपुरे शेताजवळ | ५.१० | १५,१४,८३१/- | १३,८२,५३१/- |
| ०२ | श्री गणेश बंधारा क्र.राहाता ३८ अ साकुरी-राहाता जोड रस्त्यावर | ३.२० | २१,७३,९१०/- | २०,८३,००२/- |
| ०३ | श्री गणेश बंधारा क्र.कोहकी -१६८ गायकवाड यांचे शेताजवळ | १.६० | ६,१७,०००/- | ३,९९,४००/- |
| ०४ | श्री गणेश बंधारा क्र.कोहकी -१६९ गायकवाड -बोंबे यांचे शेताजवळ | १.४८ | ५,६३,०००/- | ३,६५,८८०/- |
| ०५ | श्री गणेश बंधारा क्र.कोहकी -१७० सुराळे यांचे गट नं. ५७३ जवळ | ०.८० | ३,१७,०००/- | २,३२,५२०/- |
| | | **एकुण** | **५१,८५,७४१/-** | **४४,६३,३३३/-** |

कोहकी येथील बंधारे बांधकाम मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.धर्मादाय सह-आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. परंतू सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नाही. त्यामुळे व्यवस्थापन मंडळ निर्णयाबाबत कार्यवाही झालेली नाही. सदर पाच बंधा-यांचे बांधकाम करण्यात आलेले नाही तसेच संस्थानतर्फे अनुदानही देण्यात आलेले नाही.

याबाबत आजचे बैठकीत चर्चा होवून वरीलपैकी कोहकी व पिंपळवाडी येथील साठवण बंधा-यांचे कामासाठी अनुदान देणेस मान्यता देण्यात आली. नियोजीत बंधा-यांकरीता संस्थानतर्फे अनुदान

देण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१(२) नुसार शासनाची पुर्व मंजुरी घ्यावी असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचेतर्फे खालील प्रकल्प हाती घेण्याचे नियोजन असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. **नगर - मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे :-** संस्थानतर्फे सध्या शिर्डी हद्दीतील नगर- मनमाड रस्ता (लांबी - १६०५ मि.) रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम करण्यात येत आहे. सदर लांबीचे दक्षिणेकडील बाजूस शिर्डी - साकुरी हद्दीपर्यंत व उत्तरेकडे निमगांव- निघोज गांवठाणापर्यंत सदर रस्ता सध्या दुपदरी आहे. त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर काम संस्थानतर्फे हाती घेता येईल. सदर रस्ता जागतिक बँक प्रकल्प (सा.बां.)विभाग, अहमदनगर यांचे अधिपत्याखाली आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घ्यावी लागेल. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ अन्वये आवश्यक पूर्तता करावी लागेल.

०२ **स्वागत कमानी उभारणे :-**

संस्थानतर्फे नाशिक- शिर्डी रस्त्यावर सिन्नर येथे स्वागत कमान उभारणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नगर- मनमाड रस्त्यावर नगर व राहुरी/बाभळेश्वर येथे आणि नेवासा फाटा येथे आर.सी.सी. स्वागत कमान उभारण्याचे नियोजन आहे.

०३. **शिर्डी नगरपंचायतीचे दुकानकेंद्रासमोर सुशोभित कारंजा उभारणे :-**

नगर- मनमाड रस्त्यालगत पश्चिम बाजूस शिर्डी नगरपंचायतीचे दुकानकेंद्र आहे. ही जागा शिर्डीतील मध्यवर्ती व दर्शनी जागा आहे. या ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत सुशोभित कारंजा उभारल्यास परिसराचे सौंदर्यामध्ये भर पडणार आहे. सदर काम संस्थानतर्फे करता येईल. त्यासाठी नगरपंचायत यांचा प्रस्ताव घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ अन्वये पूर्तता करावी लागेल.

०४. **मंदिरातील कार्यक्रम व देणगीबाबतचे माहितीफलक तयार करणे**

श्री समाधी मंदिरातील आरत्या इत्यादी दैनंदिन कार्यक्रम व देणगी स्विकारणेविषयी संस्थानच्या योजना यांची माहिती साईभक्तांना सहजरित्या उपलब्ध होणेसाठी त्याची व्यापक प्रसिध्दी होणे गरजेचे आहे. त्यासाठी सदर माहिती दर्शविणारे अत्याधुनिक स्वरुपाचे माहिती फलक मंदिर परिसर, बस स्थानक, नगरपंचायत, भक्तनिवासस्थान, नगरसूल व मनमाड येथील रेल्वे स्थानके या ठिकाणी लावणे आवश्यक आहे. सदरहू फलक मराठी, इंग्रजी या भाषांमध्ये तयार करता येतील.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. मा.विश्वस्त श्री.के.सी.पाण्डेय यांचे दिनांक १५.०७.२००५ चे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.३८३.** मा.विश्वस्त श्री.के.सी.पाण्डेय यांनी त्यांचे दिनांक १५.०७.२००५ चे पत्रान्वये गुरुवार दिनांक १४.०७.२००५ रोजी श्रीसाईबाबांचे पालखी करिता शिर्डी येथे आले होते. पालखीचे वेळी श्रीसाईबाबांचे पादुकांसोबत ते हात लावून चालले असता एका व्यक्तीने त्यांना बाजूला लोटले व त्यांचा अपमान केला. याकरिता पालखीकरिता गावातील जे गावकरी आहेत त्यांची एकत्रित बैठक घेऊन मा.विश्वस्तांची ओळख करुन मंदीरातील प्रथेबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. पालखी मिरवणूकीत बरीच स्थानिक मुले सहभागी होतात व त्यांना अधिकार नसतानाही अधिकार गाजवित असतात. त्यांचा श्रीसाईबाबा संस्थानने बंदोबस्त करावा. तसेच यापुर्वी रामनवमी उत्सवात देखील त्यांना व त्यांचे सोबत असलेले मा.विश्वस्त श्रीमती रिम्पल लोहिया यांचे पती यांना तेथील तथाकथीत स्वंयसेवक म्हणून वावरणाऱ्या स्थानिक व्यक्तींनी अपमानीत केले होते, असे कळविलेले आहे.

सदर पत्राची नोंद घेत असताना मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेस असें सांगितले की, ज्याप्रमाणे विश्वस्तांना स्थानिक लोकांकडून अपमानीत केले जाते त्याप्रमाणे मला देखील काही स्थानिक लोकांकडून अपमानास्पद वागणूक देण्यात येत आहे. माझ्या विरुद्ध लाचलुचपत विभागाकडे गोपनीय पत्र पाठवून माझे संपत्तीची चौकशी करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्या चौकशीस मी केंव्हाही सामोरे जाण्यास तयार आहे. तसेच मा.विधी व न्याय विभागात माझ्याविरुद्ध एक गोपनीय खोटे पत्र व निनावी बोगस अर्ज पाठविण्यात आलेले आहे. तसेच दर्शनलाईनमध्ये साईभक्तांचे मोबाईल चोरीस गेले आणि दिनांक ३१.१२.२००४ रोजी लेंडीबागेत साईभक्तांची चेंगराचेंगरी झाली अशा घटनाबद्दल वर्तमानपत्रात अतिरंजित बातम्या एका स्थानिक पत्रकाराने दिल्या. त्याचप्रमाणे माझ्याबद्दल "लोकबोल" या साप्ताहिकामध्ये बातमी प्रसिद्ध झाली ती बातमी देण्यामागे व तो अंक प्रसिद्ध करण्यामागे संस्थानचेच एक विश्वस्त मा.श्री.अशोक भि.खांबेकर यांचाच हात असावा अशी शंका व्यक्त करुन ही बाब अतिशय खेदजनक असल्याचे म्हटले.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. "श्री साई भजन " कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र.३८४.** श्रीमती पुनम खन्ना, दिल्ली, यांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सवात साईभजनाचा कार्यक्रम करण्यास परवानगी मागितली आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी त्यांचा कार्यक्रम ठेवणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

श्रीमती खन्ना, स्वतः मानधन घेणार नाहीत, तथापि, त्यांचे सोबत येणारे वादक कलाकार यांचे मानधन व जाणे-येण्याचे खर्चासाठी रु. १५,०००/- त्यांना अदा करावे लागणार आहेत. त्याचप्रमाणे त्यांचे निवास व प्रसाद भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत करावी लागणार आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रम साईनगर येथील मैदानावरील स्टेजवर होणार आहेत. श्रीमती पुनम खन्ना यांचा कार्यक्रम समाधी मंदिरातील स्टेजवर मुख्य दिवशी, गुरुवार, दि.२१/०७/२००५ रोजी रात्री ८.०० ते ९.०० व ९.३० ते १०.०० या वेळेत ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग/प्रशासनशाखा-वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. श्री उल्हास अनंतराव वाळूंजकर, पुजारी, मंदिर विभाग यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३८५.** श्री उल्हास अनंतराव वाळूंजकर, पुजारी, मंदिर विभाग यांनी त्यांचे अर्जान्वये श्री साईबाबांचे आशिर्वादाने श्री साईबाबांचे जीवनावर आधारित एकपात्री प्रयोग मराठी व हिंदी भाषेत सादर करीत असतो.

श्री साईबाबांचे पुण्यतिथी उत्सव २४.०७.२००४ रोजी सायंकाळी ७.३० ते ९.३० यावेळेत " देखो साई का दरबार " हा एकपात्री नाट्यप्रयोग सादर केला होता. हा कार्यक्रम पहाण्यासाठी आलेल्या साईभक्तांमध्ये अमेरिकेतील साईभक्तांना हा कार्यक्रम खूपच आवडला व त्यांनी हा कार्यक्रम अमेरिकेत सादर करण्यासाठी मला आग्रहाचे निमंत्रण दिले असून सदर कार्यक्रम करणेसाठी अमेरिकेला जाणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

श्री वाळुंजकर यांचे अर्जावर मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय व मा.श्री.रमाकान्त गणेश कर्णिक यांनी शिफारस केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री वाळुंजकर यांना रजा घेऊन स्वतःचे खर्चाने अमेरिकेत कार्यक्रमास जाणेस परवानगी देण्यात यावी असें ठरले.

याचवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेस असे सांगितले की, श्रीसाईबाबांचे जीवन व कार्याचा प्रसार जगभर व्हावा या उद्देशाने त्यांना परदेशामध्ये जावयाचे आहे त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आस्थापना विभागप्रमुख/कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४. " लोकबोल" या साप्ताहिकात आलेल्या माहितीबाबत.**

**निर्णय क्र.३८६.** दिनांक ०६/०७/२००५ रोजी प्रकाशित झालेल्या " लोकबोल" या साप्ताहिकात मा.कार्यकारी अधिकारी यांचेबाबत चुकीची माहिती प्रसिध्द केली. तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांचेबाबत गलिच्छ व अपमानास्पद मजकूर प्रसिध्द केला. त्यामुळे मा.कार्यकारी अधिकारी यांची त्याच बरोबर संस्थानची बदनामी झालेली आहे. यामूळे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्त व शिरडी गावातील ग्रामस्थ यांचा गैरसमज करुन दिला गेला.

याप्रकरणी सभेने तीव्र नाराजी व्यक्त करुन असा प्रकार वारंवार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरहू साप्ताहिक प्रकाशित करणाऱ्या व्यक्तीवर वचक बसावा व त्या व्यक्तीवर कारवाई व्हावी या करिता सदर प्रकाशित झालेल्या साप्ताहिकाची प्रेस कौन्सील ऑफ इंडिया यांचेकडे अशी नोंदणी रद्द करणेकामी संस्थानतर्फे कायदेशीर सल्लागाराचा सल्ला घेऊन न्यायालयात दावा दाखल करण्यात यावा असें ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. कृषी उत्पन्न बाजारसमिती, कोपरगांव मतदार यादीबाबत.**

**निर्णय क्र.३८७.** कृषी उत्पन्न बाजार समिती, कोपरगांव यांचेकडे संस्थानने धान्य-भाजीपाला इ. खरेदीकामी "अ" वर्ग लायसेन्स क्र.५८२ घेतलेले आहे. लवकरच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका प्रस्तावित आहेत. तरी मा.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांची संस्थानचे वतीने मतदार म्हणून नोंद करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ गुरुपौर्णिमा उत्सवकाळातील दर्शन पास बाबत.**

**निर्णय क्र.३८८.** दिनांक १६.०७.२००५ चे दैनिक सार्वमतमध्ये गुरुपौर्णिमा उत्सवकाळात दर्शनपास बंद करावेत-सर्व पक्षीय ग्रामस्थांची मागणी अशी बातमी छापण्यात आलेली आहे.

रामनवमी उत्सवाप्रमाणेच गुरुपौर्णिमा उत्सवात ०३ दिवस आरती व दर्शन पास बंद ठेवावेत अशी सर्व पक्षीय ग्रामस्थांनी संस्थानचे अध्यक्ष,मा.श्री.जयंतराव ससाणे साहेब यांचेकडे मागणी केल्याचे म्हटले आहे.

मागणीपत्रकावर प्रमोद गोंदकर, सचिन शिन्दे, निलेश कोते, सुनिल गोंदकर, सुधाकर शिन्दे, उत्तमराव कोते, विशाल रजपूत, संदीप पारख, अभय शेळके, रमेश गोंदकर, घनश्याम जाधव, प्रकाश शेळके, यांच्या सह्या आहेत असेही नमूद केले आहे.

तरी या विषयावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, यावेळी गुरुपौर्णिमा उत्सव-२००५ हा दिनांक २०.०७.२००५ ते दिनांक २२.०७.२००५ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. श्रीसाईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. उत्सव काळात दर्शन सुलभ व्हावे याकरिता नियंत्रीत पासेस देण्यात यावेत.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

वरील निर्णय क्र. ३३२ ते ३८८ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

*Thursday25072005*

{10} 18.07.2005 Shirdi.